VOLUME 5 ISSUE 4 APRIL 2020

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous)**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra**

# *MODLIB*

## *E-Bulletin of Library and Information Centre*




**Published by :** Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.

**Editor :** Dr. Shantashree Sengupta, Librarian.

**Editorial Assistant :** Mrs. Sarika Sable

E-mail: librarian@moderncollegepune.edu.in

# Table of Contents


| Sr.No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 1 | Cover Story: | |
| | *Coronavirus disease (COVID-19)* | 3-4 |
| 2 | Webinars organized during April 2020 | |
| | *Webinar on 'Publication Ethics'* | 6 |
| | *Webinar on 'Introduction of IPR and Patent Filing'* | 7 |
| 3 | Work of Appreciation | |
| | *Department of Fashion Technology* | 8-9 |
| | *Department of Hindi* | 10 |
| | *National Service Scheme (NSS)* | 11 |
| 4 | Faculty Member Invited as Resource Person | |
| | *Dr. Shantashree Sengupta* | 12 |
| 5 | Newspaper Clippings | |
| | *Education* | 14-51 |
| | *Contribution of Progressive Education Society* | 52 |
| | *Contribution of SPPU, Pune* | 53-55 |
| | *Research* | 56-59 |
| | *Work of Appreciation* | 60 |

# Coronavirus disease (COVID-19)

Coronavirus disease (COVID-19) is an infectious disease caused by a newly discovered coronavirus. Most people infected with the COVID-19 virus will experience mild to moderate respiratory illness and recover without requiring special treatment. Older people, and those with underlying medical problems like cardiovascular disease, diabetes, chronic respiratory disease, and cancer are more likely to develop serious illness.

The best way to prevent and slow down transmission is be well informed about the COVID-19 virus, the disease it causes and how it spreads. Protect yourself and others from infection by washing your hands or using an alcohol based rub frequently and not touching your face.

The COVID-19 virus spreads primarily through droplets of saliva or discharge from the nose when an infected person coughs or sneezes, so it's important that you also practice respiratory etiquette (for example, by coughing into a flexed elbow).

At this time, there are no specific vaccines or treatments for COVID-19. However, there are many ongoing clinical trials evaluating potential treatments. WHO will continue to provide updated information as soon as clinical findings become available.

COVID-19 affects different people in different ways. Most infected people will develop mild to moderate illness and recover without hospitalization.

**Most common symptoms:**

- fever.
- dry cough.
- tiredness.

**Less common symptoms:**
- aches and pains.
- sore throat.
- diarrhoea.
- conjunctivitis.
- headache.
- loss of taste or smell.
- a rash on skin, or discoloration of fingers or toes.

**Serious symptoms:**

- difficulty breathing or shortness of breath.
- chest pain or pressure.
- loss of speech or movement.

Seek immediate medical attention if you have serious symptoms. Always call before visiting your doctor or health facility. People with mild symptoms who are otherwise healthy should manage their symptoms at home.

**Prevention:**

To prevent infection and to slow transmission of COVID-19, do the following:

- Wash your hands regularly with soap and water, or clean them with alcohol-based hand rub.
- Maintain at least 1 metre distance between you and people coughing or sneezing.
- Avoid touching your face.
- Cover your mouth and nose when coughing or sneezing.
- Stay home if you feel unwell.
- Refrain from smoking and other activities that weaken the lungs.
- Practice physical distancing by avoiding unnecessary travel and staying away from large groups of people.

***(Reference: World Health Organisation. https://www.who.int/health-topics/coronavirus#tab=tab_1 )***




Courtesy: https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019/advice-for-public

# *Webinars organized during April 2020*

# Webinar on 'Publication Ethics'

On the occasion of 'World Book and Copyright Day' on 23rd April 2020, Staff Academy, IPR Cell and Library and Information Centre of *Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 organised Webinar on ***'Publication Ethics'*** for faculty members of Modern College, Shivajinagar.

A very important topic for all researchers, teachers and students covering various concepts such as Research Ethics, Publication Ethics, Predatory Journals, Open Access, UGC CARE LIST, SPPU Centre for Publication Ethics etc. We are thankful to Dr. Shubhada Nagarkar, Assistant Professor, Department of Library and Information Science, SPPU Pune and Co-ordinator- Centre for Publication Ethics SPPU Pune for presenting the topic so beautifully and in simple way which was very well accepted and appreciated by our faculty members. The question answer session solved various doubts related to research publications. The Webinar was conducted on Cisco Webex Meet Platform.

We are thankful to all the Management Members of Progressive Education Society, Shivajinagar Pune-5; Principal Dr.R.S Zunjarrao Sir for supporting us and always motivating us to conduct such Webinars.

We are also thankful to Prof. Shamkant Deshmukh Sir, Secretary Progressive Education Society , Vice Principal and Head, Department of Computer Science ; Vice Principal Faculty of Science Prof.Sharad Chaudhari Sir ; Vice Principal Faculty of Commerce Prof.Dr.A.V.Kamble Sir and all teachers for participating in the Webinar and making it a successful one.

-Dr. Shantashree Sengupta
LIbrarian



# Webinar on ‘Introduction of IPR and Patent Filing’

Staff Academy and IPR Cell of *Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 organised Webinar on ***‘Introduction of IPR and Patent Filing'*** for faculty members of Modern College, Shivajinagar.

Prof. Ponnambalam Ilanangai, IPR Practitioner/ Patent Agent, Chennai delivered lecture on Introduction to Intellectual Propoerty Rights and covered various types of Intellectual Properties like Copyright, Patent, Trademark, Geographical Indication (GI) with several examples. Prof. Ilanangai also discussed the ***‘Patent Filing Procedure in India’*** in which she explained the various steps of how to file a patent and information regarding Regional Patent Offices.

The question answer session solved various doubts related to IPR and Patent Filing. The Webinar was conducted on Cisco Webex Meet Platform.

We are thankful to all the Management Members of Progressive Education Society, Shivajinagar Pune-5; Principal Dr. R.S Zunjarrao, all the Vice-Principals for supporting us and always motivating us to conduct such Webinars. We are thankful to all teachers for participating in the Webinar and making it a successful one.











# Work of Appreciation




*Great work for the society done by students under the able guidance of Department of Fashion Technology*



# Work of Appreciation

On 8th April 2020, ***Omkar Kalekar, student of Department of Fashion Technology*** received an order to stich 300 masks.



Congratulations !!!





# WORK OF APPRECIATION

## Department of Hindi

तृतीय वर्ष कला, हिंदी विशेष का अत्यंत गुणी और प्रबुद्ध छात्र ***पवन नागरे*** मराठी नाटकों में अपनी अभिनय कला को कुशलता से सिद्ध कर चुका है। उसके ***"तीन पैशांचा तमाशा"*** नाटक के पुणे और पुणे के बाहर अनेक मंचन हुए हैं। अब पवन नागरे सामाजिक जागृति का कार्य कर रहा है।

फिलहाल कोरोना के चलते पवन और उसके कुछ दृष्टिबाधित साथी समाज में कोरोना के संदर्भ में जागृति निर्माण करने के लिए अपने वीडियोज प्रसारित कर रहे हैं। ये सभी लोग दृष्टिबाधित होने के बावजूद जनसंचार माध्यमों का जनजागृति के लिए इस तरह सकारात्मक उपयोग उनके द्वारा किया जाना अत्यंत प्रशंसनीय है। पवन और उसके सभी साथियों की इस कार्य के लिए सभी ओर से प्रशंसा हो रही है।

***"सकाळ" समाचारपत्र ने भी इस खबर को महत्वपूर्ण स्थान दिया है।***

हिंदी विभाग और मॉडर्न महाविद्यालय की ओर से हमारे छात्र पवन नागरे का हार्दिक अभिनंदन।

— डॉ.प्रेरणा उबाळे
हिंदी विभागाध्यक्षा



Newsletter | आजचा ई-पेपर
बुधवार, जून 17, 2020
सकाळ eSakal.com

ताज्या | मुख्य | पुणे | मुंबई | महाराष्ट्र | देश | ग्लोबल | SRF | SPORTS | कोरोना | LIVE TV | आणखी..

Home > Pune > Awareness Of Society By Blind Artists In Pimpri

### पिंपरीत अंध कलाकारांनी केले डोळसपणे समाजप्रबोधन

सकाळ वृत्तसेवा | शुक्रवार, 17 एप्रिल 2020

महाराष्ट्रभरातील अंध कलाकार लॉकडाउनमध्ये अडकलेल्या अंध फेरीवाल्यांसाठी दूत ठरले आहेत. एवढ्यावरच न थांबता डोळसांनाही लाजवेल अशा पद्धतीने त्यांनी व्हिडीओच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले आहे.

BLIND-ACTOR

पिंपरी - आपल्या सगळ्यांच्याच आयुष्यात दृष्टी आणि आवाजाला खूप महत्त्व आहे. आवाज दृष्टीहिनांचे सामर्थ्य तर स्पर्श हे माध्यम. मात्र, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्पर्श हे माध्यम पण त्यांच्यासाठी व्यर्थ ठरले आहे. आपण सर्वजण सिनेमे, टीव्ही पाहू शकतो. सोशल मीडियावर रमू शकतो. खिडकीतून का होईना सूर्योदय आणि सुर्यास्ताचा आनंद घेऊ शकतो. किती बोअर झालोय यार असा सूर ही वारंवार आळवतो. मात्र, या सर्व अडचणींवर मात करत महाराष्ट्रभरातील अंध कलाकार लॉकडाउनमध्ये अडकलेल्या अंध फेरीवाल्यांसाठी दूत ठरले आहेत. एवढ्यावरच न थांबता डोळसांनाही लाजवेल अशा पद्धतीने त्यांनी व्हिडीओच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले आहे.

बातम्या ऐकण्यासाठी डाऊनलोड करा ई-सकाळचे ॲप

मुंबई, पुणे येथील हातावर पोट असलेल्या रेल्वेतील फेरीवाल्यांसाठी हे अंध धावले आहेत. बऱ्याच जणांनी अन्नधान्य स्वरूपात मदत केली आहे. "तीन पैशाचा तमाशा" यातील हे अंध कलाकार आहेत. या नाटकाचे तीन प्रयोग झाले आहेत. बाकी लॉकडाउनमुळे रद्द झाले आहेत. हे सर्व दृष्टिहीन कोरोनामुळे गावी आहेत. कोणी रोहा, हिंगोली, कोणी म्हाडा, कोणी निगडी व पुण्यातील आहेत. या सर्वांचं समाजभान जागृत आहे. यातल्या अनेक जणांनी आपली सामाजिक बांधिलकी जपत अंध फेरीवाल्यांसाठी निधी जमा केला आहे. अनेकांनी आपल्या पगारातला काही भाग त्यांच्यासाठी पाठवला आहे. या उपक्रमासाठी स्वागत थोरात, विना ढोले, ऋचा पाटील यांनी मदत केली आहे.

आम्हांला या सगळ्यांचा सार्थ अभिमान आहे. समाजाकडून ज्ञान आणि भान घेता-घेता देणारे हात तयार झाले आहेत. एक नवी पिढी घडते आहे, असे अंधांच्या सावी फाउंडेशनच्या रश्मी पांढरे यांनी सांगितले.

#### हे आहेत अंधांचे दूत

काकासाहेब पांडव, संतोष कसबे, सुंदर सोंडे, बेला सोंडे, वृषाली शेख, गौरव घायले, बिपीन वर्तक, अक्षय मोहिते, पवन नागरे, हेमांगी धामणे, अद्वैत मराठे, तृप्ती चौधरी, सौरभ चौगुले, प्रवीण पालके, विकी शेट्टी, तेजस्विनी भालेकर.

Congratulations !!!



# Work of Appreciation

## National Service Scheme (NSS)

NSS volunteers of *Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce worked at Vidyarthi Sahayak Samiti, Pune in collaboration with SPPU and NGOs distributing required essentials items to the poor and needy people during COVID-19 lockdown period.













# FACULTY MEMBERS INVITED AS RESOURCE PERSON

Dr. Shantashree Sengupta, Librarian was invited as Panelist for Online discussion on ***'Preparation for NAAC Metric 4.2: Library as a Learning Resource and Role of Librarians across 07 Criteria'*** on 29th April 2020. The online discussion was organized by NAAC Helpline LIS Group and was attended by 250 participants. The other members of Panel were:

1) Dr. Ranjeet Dharmapurikar, Information Scientist, Swami Ramanand Teerth marathwada University, Nanded.
2) Dr. Sachin Shastri, Librarian, V.K.Krishna Menon College, Bhandup(East), Mumbai.
3) Dr.Dattatray Kalbande, Librarian, J.W.Sadhubella Girl's College, Ulhasnagar, Mumbai.

Dr. S. Sengupta discussed on the Qualitative Metrics of 4.2: Library as a Learning Resource by explaining various documents related to the preparation of Self Study Report, AQAR and Files that are required to be prepared by the Librarian. Several metrics in which Librarian can contribute throughout the procedure of preparation of SSR and NAAC Peer Team visit preparation were also discussed.

The webinar discussions were applauded by all the attendees.






# News Paper Clippings During April 2020




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from* http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time.

As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. From July 2019- September 2019 Issue of *MODLIB Bulletin* has introduced E-newspaper Clippings Service through which it will have a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service.

The E-Newspaper Clippings Section is divided into ***Education, Work of Appreciation, Contribution of Institutions towards the Society, Health, Research, Sports, Miscellaneous .***

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# SPPU declares interim vacation till April 14

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) has declared interim vacation till April 14.

On Monday, SPPU Registrar Prafulla Pawar issued a notice stating that all faculty members, staff and students of the university including affiliated colleges and institutes are informed that university has declared interim vacation from April 1-14, in the view of prevailing corona-virus disease.

**SPPU Registrar Prafulla Pawar issued a notice stating that university has declared interim vacation from April 1-14, in view of prevailing COVID-19.**

If required, the faculty members may be called to carry out essential work as per the need of university/college/institute, stated the notice.

Pawar also stated in the notification that all non-vacation (non-teaching) staff of the university and its affiliated colleges/institutes will continue to work from home.

Sakaal Times: 1.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

## यंदा एकही नवीन कॉलेज नाही?

### प्रस्ताव सादर करण्याची 31 मार्चची मुदत संपली

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

नव्या शैक्षणिक वर्षात नवीन अभ्यासक्रम; तसेच नवीन कॉलेजांच्या मान्यतेचे प्रस्ताव ३१ मार्चपर्यंत विद्यापीठांना राज्य सरकारकडे सादर करावे लागतात. मात्र, यंदा लॉकडाउनमुळे हे प्रस्ताव सादर करणे अवघड झाले आहे. परिणामी यासाठी सरकारने कॉलेजांना मुदतवाढ द्यावी, अशी मागणी विद्यापीठांकडून होत आहे.

दर वर्षी बिंदूनामावलीप्रमाणे विद्यापीठांकडे नवीन कॉलेजांचे प्रस्ताव येतात. या कॉलेजांमध्ये स्थानीय माहिती समिती (एलआयसी) पाठवण्यात येते. या समितीच्या अहवालानुसार विद्यापीठ कॉलेजांना परवानगी द्यायची की नाही, याबाबत निर्णय होतो. यानंतर तो प्रस्ताव राज्य शासनाला सादर होतो. कॉलेजांमध्ये नवा अभ्यासक्रम सुरू करायचा असल्यास त्यांचेही प्रस्ताव विद्यापीठांकडे येतात. यानुसार विद्यापीठ विद्वत परिषद याबाबतचे प्रस्ताव सादर करून त्याची मान्यता घेते. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, २०१६नुसार विद्यापीठ स्तरावरील ही सर्व प्रक्रिया ३१ मार्चपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असते. मात्र, यंदा करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशात लॉकडाउन करण्यात आले आहे. परिणामी विद्यापीठांमध्ये हे प्रस्ताव ऑनलाइन सादर होत असले, तरी त्यावर पुढील कार्यवाही करण्यासाठी आवश्यक कर्मचारी उपलब्ध नाहीत. याचबरोबर समितीने ज्यांचे प्रस्ताव नाकारले आहेत, त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणेही या कालावधीत शक्य होणार नाही. यामुळे ही तारीख वाढवून द्यावी, अशी मागणी विद्यापीठांकडून शासनाकडे करण्यात येत आहे. मात्र, याला शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याचे सूत्रांकडून समजते.

Maharashtra Times: 1.4.2020

## 'करोना'शी लढ्यात प्राध्यापकांचाही सहभाग

### मुख्यमंत्री सहायता निधीत देणार एक दिवसाचे वेतन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'करोना' विरोधातील लढाईत राज्यातील प्राध्यापकही आपला वाटा उचलणार असून, यासाठी राज्यातील प्राध्यापकांचे एक दिवसाचे वेतन देण्याची घोषणा महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटीज अँड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशनने (एमफुक्टो) या संघटनेने केली आहे. त्याचबरोबर रयत शिक्षण संस्थेतर्फेही सुमारे दोन कोटी रुपयांचा निधी 'करोना'विरोधातील लढ्यासाठी दिला जाणार आहे. मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये हे योगदान दिले जाणार आहे.

'एमफुक्टो'चे अध्यक्ष डॉ. तपती मुखोपाध्याय आणि सरचिटणीस डॉ. एस. पी. लवांडे यांनी या बाबतचे निवेदन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिले आहे. राज्यातील ११ अकृषी विद्यापीठांमध्ये मिळून संघटनेचे सुमारे ३० हजार प्राध्यापक कार्यरत आहेत. या प्राध्यापकांच्या एप्रिलमधील वेतनातून सरकारने एक दिवसाचे वेतन घ्यावे, अशी विनंती या पत्रात करण्यात आली आहे. 'करोना'चा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत असतानाही राज्य प्रशासन, डॉक्टर, परिचारिका अहोरात्र मेहनत घेत 'करोना'बाधितांची सेवा करत आहेत. त्यांच्या या योगदानासाठी संघटनेने या पत्रात विशेष उल्लेख करून, त्यांचे आभार मानले आहेत.

### 'एक दिवसाचे वेतन देण्याचा निर्णय'

'करोना'च्या प्रादुर्भावाविरोधातील लढाईसाठी रयत शिक्षण संस्थेकडून दोन कोटींचा निधी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देण्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केली. संस्थेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन एकत्रित करून सुमारे दोन कोटींचा निधी धनादेशाद्वारे मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देण्याचा निर्णय बहुमताने घेतल्याचे पवार यांनी स्पष्ट केले.

Maharashtra Times: 1.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

लोकमत

# पुस्तकांच्या पीडीएफ पायरसीचीही साथ

## कोरोनाचा काळ : नियंत्रण कसे आणणार प्रकाशकांना पडला प्रश्न

नम्रता फडणीस ।
लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोना संचारबंदीच्या काळात होम क्वारंटाइन झालेल्या व्यक्तींसाठी पुस्तक वाचन हा मोठा विरंगुळा असला, तरी पुस्तकांच्या 'सॉफ्ट कॉपीज'ची 'पीडीएफ पायरसी' प्रकाशकांसाठी डोकेदुखी ठरली आहे. यामुळे पुस्तकविक्रीसह लेखकांची रॉयल्टी आणि प्रकाशकांना कॉपी राइटद्वारे मिळणारे उत्पन्न बुडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या 'पायरसीवर' नियंत्रण कसे आणणार, असा प्रश्न प्रकाशकांना भेडसावत आहे.

लॉकडाऊनमुळे घरात बसलेल्या व्यक्तींना मनसोक्त वाचनाची संधी उपलब्ध आहे. अनेकजण पुस्तकांसह ई-बुक्सकडे वळले आहेत. पण याच काळात जुन्या मान्यवर

> पुस्तकांच्या पीडीएफ पाठविणे हा पायरसीचाच प्रकार असून, हे वाङ्मयीन चौर्य आहे. त्या लोकांनी कुठून घेतल्या नि शेअर केल्या आहेत. या प्रकाशकांच्या वेबसाइटवरुन हॅक झाल्या आहेत का? याचा शोध घ्यायला हवा.
>
> **- अनिल कुलकर्णी**, प्रकाशक

लेखकांची पुस्तके 'पीडीएफ' स्वरुपात 'शेयर' करण्याचे प्रमाण वाढल्याचे निरीक्षण प्रकाशकांनी नोंदवले आहे.

मेहता पब्लिकेशनचे सुनील मेहता म्हणाले की, सध्या विविध वि. स. खांडेकर, व. पु. काळे, द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर आणि रणजीत देसाई यांसारख्या प्रसिद्ध लेखकांच्या पुस्तकांच्या पीडीएफ एकमेकांना पाठवल्या जात आहेत. हे अत्यंत आक्षेपार्ह आहे.

या कदाचित जुन्या पीडीएफ हॅक झाल्या असतील किंवा काही जणांना पुस्तकांच्या पीडीएफ करायचे ज्ञान असू शकते. पुस्तकांच्या तुलनेत ई-बुकचे पीडीएफ करण्याचे प्रमाण खूप कमी आहे.

यामध्ये ई-मेलवरुन कुठल्या लेखकाला, प्रिंटरला किंवा बाइंडरला ही पुस्तके पाठवत असताना त्या हॅक झालेल्या असू शकतात. त्या आता व्हायरल झाल्या आहेत आणि त्याचे रिझोल्युशन कमी करुन त्या सगळीकडे पाठवणे शक्य होत आहे. पुस्तकाची पीडीएफ ही २०-२५ एमबीची असते. आताच्या ज्या पीडीएफ येत आहेत. त्या केबीमध्ये आहेत. या पीडीएफ पायरसीचा फटका लेखक, प्रकाशक आदींना बसणार आहे.

पोलिसांच्या सायबर विभागाने यात लक्ष घालण्याची गरज आहे. काही वाचनप्रेमींचे, लेखकांचे व्हॉट्सअॅप ग्रुप्स असतात, त्यांच्या अॅडमीनने असे प्रकार होऊ न देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

उद्या जर एखाद्या प्रकाशकाने मनावर घेतले आणि तक्रार दाखल केली तर ज्या ज्या लोकांनी या पीडीएफ फॉरवर्ड केल्या आहेत त्यांच्यावरही गुन्हा दाखल होऊ शकतो.

पुस्तकांची पायरसी हा दखलपात्र गुन्हा आहे हे सायबर पोलिसांनी लोकांना समजावून सांगणे आवश्यक आहे. जी कलाकृती मग ती नाटक, सिनेमा असो वा पुस्तक असो, ती फॉरवर्ड करणे तातडीने थांबवले गेले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

Hello Pune
Page No. 4 Apr 01, 2020
Powered by: erelego.com

# Web traffic on SWAYAM, edu portals triples

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** Web traffic on the national online education platform 'SWAYAM' and other digital initiatives offered by the Ministry of Human Resource Development (MHRD) have seen a massive jump in the last seven days.

The ministry stated that the online hits have tripled as people are looking to utilise their time in a productive manner since the 21-day lockdown was imposed in the country.

About 50,000 people have accessed these online platforms since March 23.

This is in addition to the 25 lakh students/learners who are already enrolled in the 571 courses of the January 2020 semester of SWAYAM, stated HRD Minister Ramesh Pokhriyal 'Nishank'.

He has also appealed to the students to take advantage of these platforms and put their valuable time to good and optimum use.

Pokhriyal said that they witnessed the growth after the provision of free access to best teaching learning resources began at SWAYAM.

"Earlier, the courses on 'SWAYAM' were time-bound, for which, registration was needed in advance. Now, to utilise this lockdown period productively and to promote online learning, it can be viewed by any learner free of cost without any registration," the minister added.

**GLOBALLY ACCESSIBLE**

- SWAYAM has a repository of 1,900 courses which are being accessed by people from over 60 countries.
- The significant majority is from India and the other countries include the US, UAE, Germany, Nepal, Singapore, Canada, United Kingdom and Australia.
- The videos of SWAYAM Prabha DTH TV channels are viewed by around 50,000 people every day.
- The National Digital Library is now being accessed by about 43,000 people daily which is more than double of the usual number of persons accessing it.

Sakaal Times: 2.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

## विद्यार्थ्यांचा 'व्हॉट्सअॅप क्लास'

**पुणे, ता. २ :** 'कोरोना'मुळे वर्ग बंद झाले असले, तरी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध विभागांचे 'व्हॉट्सअॅप क्लास' रोज होत आहेत. विद्यार्थी प्रश्न विचारत असून, प्राध्यापक शंकांचे निरसन करत आहेत. तसेच स्वतः नोट्स लिहून विद्यार्थ्यांना पाठवत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासातील सातत्य कायम आहे.

अभ्यासक्रम कसा पूर्ण होणार असा प्रश्न विद्यार्थी, प्राध्यापकांना पडला होता. पुणे विद्यापीठाने प्राध्यापकांना 'वर्क फ्रॉम होम'चे आदेश दिले. त्यामध्ये संशोधन प्रकल्पाचे लिखाण, नोट्स काढणे, संदर्भ संग्रहित करणे अशी कामे केली जात आहेत. पदव्युत्तरच्या प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी व प्राध्यापकांचे स्वतंत्र व्हॉट्सअॅप ग्रुप तयार केले आहेत. त्यात रोज एका विषयाचे धडे प्राध्यापक पाठवत आहेत. रोज किमान दोन ते तीन तास संवाद होत आहे, अशी माहिती जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. राजेंद्र गच्चे यांनी दिली.



**परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची तयारी सुरू आहे. त्यांच्या शंका निरसन करण्यासाठी व्हॉट्सअॅप ग्रुप केला. त्यावर नोट्स शेअर केल्या जातात. काही वेळा मी स्वतः गणित सोडवून ते विद्यार्थ्यांना देतो. रोज किमान दोन तास अशा प्रकारे मार्गदर्शन सुरू आहे.**
**- प्रा. सचिन बल्लाळ,** गणित

### प्रॅक्टिकलची अडचण

लॉकडाउनच्या काळात विज्ञान शाखेचे थेअरीचे क्लास ऑनलाइन होत असले, तरी घरातून कोणालाही बाहेर पडता येत नाही. त्यामुळे थेअरी शिकली तरी विद्यार्थांना प्रॅक्टिकल करता येत नसल्याने काही प्रमाणात अडचण निर्माण होत आहे.

**Sakal: 3.4.2020**




Image Courtesy: Google Images

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

### पुणे विद्यापीठाच्या परीक्षा होणार



पुणे : कोरोना संसर्ग टाळण्यासाठी प्रशासनाने सर्व विद्यापीठांच्या परीक्षेत बदल केला आहे. विद्यापीठाच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा होणार आहेत. कोणतीही परीक्षा रद्द केली जाणार नाही. परंतु, परीक्षेच्या स्वरूपात बदल करण्यासाठी विद्यापीठ गांभीर्याने विचार करत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व प्रकारच्या परीक्षा १४ एप्रिल पर्यंत पुढे ढकलल्या आहेत. तर १ एप्रिल ते १४ एप्रिल हा कालावधी उन्हाळ्याच्या सुट्टया म्हणून ग्राह्य धरला जाणार आहे. तसा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे.

कोरोनाच्या संसर्गामुळे शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्याच्या पूर्वी विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान या तिन्ही शाखांच्या पदवीच्या परीक्षा सुरू झाल्या होत्या. तर पदव्युत्तर व व्यवसायीक अभ्यासक्रमाच्या परीक्षा अद्याप सुरू झालेल्या नाहीत. 'कोरोना'मुळे परीक्षेचे वेळापत्रक कोलमडल्याने प्रथम वर्षाच्या परीक्षा रद्द केल्या जाणार असल्याची चर्चा सुरू होती.

प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले, कोणत्याही अभ्यासक्रमाच्या परीक्षा रद्द केल्या जाणार नाहीत. सर्व परीक्षा नवीन वेळापत्रकानुसार घेतल्या जातील. पण या परीक्षा कशा पद्धतीने घेतल्या जाव्यात यासंदर्भात विद्यापीठाकडून प्राध्यापक, प्राचार्य यांच्याकडून सूचना व उपाय मागविल्या होत्या. त्यात १०० पेक्षा जास्त सूचना व उपाय विद्यापीठास प्राप्त झाले असून, त्यांची छाननी करून नवीन परीक्षा पद्धती ठरवली जाईल.

१३ ते १७ मार्च या कालावधीत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे काही पेपर झाले आहेत. तसेच त्यांना क्रेडिट सिस्टीम असल्याने या विद्यार्थ्यांचे द्वितीय वर्षा जाताना मूल्यांकन होणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांच्या एमसेक्यु किंवा कमी गुणांची यासह इतर प्रकारे परीक्षा होणार आहेत. याचा निर्णय लवकरच परीक्षा मंडळात घेतला जाईल. प्रथम वर्षाची परीक्षा रद्द होणार नाही, असे उमराणी यांनी सांगितले.

**Pudhari: 4.4.2020**

---

सकाळ

### पुणे विद्यापीठाच्या परीक्षा होणार; स्वरूप बदलणार

#### लॉकडाउनमधील १ ते १४ एप्रिलपर्यंतचा काळ सुट्ट्यांचा

**पुणे, ता. ३ :** 'कोरोना'मुळे विद्यापीठाच्या परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले असले, तरी भविष्यात सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा होणार आहेत. कोणतीही परीक्षा रद्द केली जाणार नाही. परंतु, परीक्षेच्या स्वरूपात बदल करण्यासाठी विद्यापीठ गांभीर्याने विचार करत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व प्रकारच्या परीक्षा १४ एप्रिलपर्यंत पुढे ढकलल्या आहेत. तर १ एप्रिल ते १४ एप्रिल हा कालावधी उन्हाळ्याच्या सुट्या म्हणून ग्राह्य धरला जाणार आहे.

पान ४ वर »

**लॉकडाउन संपल्यानंतर १० दिवसांनी परीक्षा**

लॉकडाउननंतर विद्यापीठाला परीक्षेसाठी तयारी करावी लागणार आहे. तसेच काही वर्गांचा अभ्यासक्रम किंवा प्रोजेक्ट, प्रॅक्टीकल सबमिशन राहिले असल्याने त्यांना वेळ देणे आवश्यक आहे. लॉकडाऊन संपल्यानंतर किमान १० दिवसांच्या कालावधीनंतर परीक्षा सुरू होतील, असे उमराणी यांनी सांगितले.

Pune, Main
04/04/2020 Page No. 1

---

सकाळ

### पुणे विद्यापीठाच्या परीक्षा होणार; स्वरूप बदलणार

» पान १ वरून

तसा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे.

'कोरोना' संक्रमणामुळे शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्याच्या पूर्वी विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान या तिन्ही शाखांच्या पदवीच्या परीक्षा सुरू झाल्या होत्या. तर पदव्युत्तर व व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा अद्याप सुरू झालेल्या नाहीत.

याबाबत प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले, ''कोणत्याही अभ्यासक्रमाच्या परीक्षा रद्द केल्या जाणार नाहीत. सर्व परीक्षा नवीन वेळापत्रकानुसार घेतल्या जातील. पण या परीक्षा कशा पद्धतीने घेतल्या जाव्यात यासंदर्भात विद्यापीठाकडून प्राध्यापक, प्राचार्य यांच्याकडून सूचना व उपाय मागविल्या होत्या. त्यात १०० पेक्षा जास्त सूचना व उपाय विद्यापीठास प्राप्त झाले असून, त्यांची छाननी करून नवीन परीक्षा पद्धती ठरवली जाईल.'

दरम्यान, १३ ते १७ मार्च या कालावधीत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे काही पेपर झाले आहेत. तसेच त्यांना क्रेडिट सिस्टीम असल्याने हे विद्यार्थी द्वितीय वर्षात जाताना मूल्यांकन होणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांच्या एमसेक्यु किंवा कमी गुणांची यासह इतर प्रकारे परीक्षा होणार आहेत. याचा निर्णय लवकरच परीक्षा मंडळात घेतला जाईल. प्रथम वर्षाची परीक्षा रद्द होणार नाही, असेही उमराणी यांनी सांगितले.

Pune, Main
04/04/2020 Page No. 4

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

## विद्यापीठाच्या परीक्षा नवीन वेळापत्रकानुसार होणार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** 'करोना'मुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व प्रकारच्या परीक्षा १४ एप्रिलपर्यंत पुढे ढकलल्या आहेत. तर, दि. १ ते १४ एप्रिल हा कालावधी उन्हाळ्याच्या सुट्ट्या म्हणून ग्राह्य धरला जाणार आहे. तसा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे. 'करोना' संक्रमणामुळे शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यापूर्वी विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान या तिन्ही शाखांच्या पदवीच्या परीक्षा सुरू झाल्या होत्या. तर पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा अद्याप सुरू झालेल्या नाहीत. 'करोना'मुळे परीक्षेचे वेळापत्रक कोलमडल्याने प्रथम वर्षाच्या परीक्षा रद्द केल्या जाणार असल्याची चर्चा सुरू होती.

दरम्यान, 'कोणत्याही अभ्यासक्रमाच्या परीक्षा रद्द केल्या जाणार नाहीत. सर्व परीक्षा नवीन वेळापत्रकानुसार घेतल्या जातील. पण, या परीक्षा कशा पद्धतीने घेतल्या जाव्यात यासंदर्भात विद्यापीठाकडून प्राध्यापक, प्राचार्य यांच्याकडून सूचना व उपाय मागविल्या होत्या. त्यात १०० पेक्षा जास्त सूचना व उपाय विद्यापीठास प्राप्त झाले असून, त्यांची छाननी करून नवीन परीक्षा पद्धती ठरवली जाणार आहे,' अशी माहिती सूत्रांनी दिली. दि.१३ ते १७ मार्च या कालावधीत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे काही पेपर झाले आहेत. तसेच त्यांना क्रेडिट सिस्टीम असल्याने या विद्यार्थ्यांचे द्वितीय वर्षात जाताना मूल्यांकन होणे गरजेचे असून त्यांच्या इतर प्रकारे परीक्षा होणार आहेत.

### लॉकडाउननंतर १० दिवसांनी वेळापत्रक

लॉकडाउननंतर विद्यापीठाला परीक्षेसाठी तयारी करावी लागणार आहे. तसेच काही वर्गांचा अभ्यासक्रम किंवा प्रोजेक्ट, प्रॅक्टिकल सबमिशन राहिले असल्याने त्यांना वेळ देणे आवश्यक आहे. लॉकडाउन संपल्यानंतर किमान १० दिवसांच्या कालावधीनंतर परीक्षेचे नवे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, असेही सूत्रांनी सांगितले.

प्रभात Sat, 04 April 2020 epaper.eprabhat.net/c/50625751

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education



# विद्यापीठ परीक्षा होणार की नाही?

## तोडग्यासाठी होणार कुलगुरूंची बैठक

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

करोनामुळे देशभरात लॉकडाऊन करण्यात आले. यामुळे शाळा व कॉलेज बंद ठेवण्यात आली. त्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. यावर काय तोडगा काढता येईल, याबाबत विचार करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे येत्या ७ एप्रिलला बैठक आयोजित करण्यात आल्याचे सूत्रांकडून समजते.

विविध राज्यांच्या शालेय शिक्षण विभाग तसेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने करोनाच्या पार्श्वभूमीवर पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात प्रवेश देण्याचा तर केंद्रीय शिक्षण मंडळाने नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांना सरासरी गुण देण्याचा निर्णय घेतला. मात्र उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा प्रश्न कायम राहिला आहे. यावर काय तोडगा काढणार, याबाबत चर्चा करण्यासाठी राज्य सरकारने ७ एप्रिलला कुलगुरूंची बैठक आयोजित केल्याचे सूत्रांकडून समजते. बैठकीत विद्यार्थ्यांची परीक्षा कधी घ्यायची, अभ्यासक्रमांचे आवश्यक शैक्षणिक तास पूर्ण झाले नसतील तर काय पर्याय असू शकतो, यावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

### परीक्षापद्धती भिन्न

राज्यातील वेगवेगळ्या विद्यापीठांमध्ये वेगवेगळी परीक्षा पद्धती अवलंबवली जाते. मुंबई विद्यापीठात पहिल्या व दुसऱ्या वर्षाची परीक्षा कॉलेजांत होते तर काही विद्यापीठांमध्ये केवळ पहिल्या वर्षांच्या परीक्षा कॉलेज स्तरावर होतात आणि उर्वरित दुसऱ्या व तिसऱ्या वर्षांच्या परीक्षा विद्यापीठाच्या माध्यमातून घेण्यात येतात. परिणामी या प्रश्नांवर नेमका काय तोडगा काढायचा हा प्रश्न आहे. यावर या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

### कोंडी फोडण्याची मागणी

परीक्षा होणार की नाही, झाली तर कधी होईल असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांना पडत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या परीक्षेची ही कोंडी फोडावी, अशी मागणी अखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षक महासंघाच्या बैठकीत करण्यात आली. यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा, असा आग्रह धरण्यात आला. शिक्षक महासंघाने पुढाकार घ्यावा, असे ठरविल्याचे महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रा. प्रदीप खेडकर आणि महासचिव डॉ. वैभव नरवडे यांनी स्पष्ट केले.

**Maharashtra Times: 4.4.2020**




Image Courtesy: Google Images

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# विद्यापीठ, प्रवेश परीक्षा रद्द नाहीत

### परीक्षांसाठी तज्ज्ञांची समिती, उदय सामंत यांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील 'करोना'चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजनेचा एक भाग म्हणून विद्यापीठ, महाविद्यालयीन आणि सीईटी परीक्षा कक्षाचे नियोजित वेळापत्रक पुढे ढकलण्यात आले असून, कोणत्याही परीक्षा रद्द नाहीत. विद्यार्थी आणि पालक यांच्यामध्ये परीक्षेसंदर्भात संभ्रम निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होऊ नये, या सर्व परीक्षेचे नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी जाहीर केले.

सामंत यांनी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये उच्च तंत्र शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, राज्यातील १३ विद्यापीठांचे कुलगुरू, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने, सीईटी सेलचे आयुक्त संदीप कदम, मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे संचालक राजीव मिश्रा सहभागी होते. सामंत म्हणाले, 'विद्यापीठ, महाविद्यालय आणि सीईटी सेलकडून पुढे ढकलण्यात आलेल्या परीक्षा रद्द होणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. या सर्व परीक्षेचे वेळापत्रक नव्याने जाहीर करून घेण्यात येतील. या सर्व परीक्षांचे नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, एसएनडीटी विद्यापीठांचे कुलगुरू शशिकला वंजारी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कुलगुरू देवानंद शिंदे, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने यांची समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती राज्यातील करोनाचा प्रादुर्भाव स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून महाविद्यालयीन परीक्षेचे वेळापत्रक नियोजन, शैक्षणिक वर्षाचे नियोजन असा अहवाल तयार करून उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव आणि मंत्री यांना सादर करतील त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल.'

### 'मल्टीपर्पज लॅब सुरू करा'

राज्यात 'करोना'च्या पार्श्वभूमीवर अकृषी विद्यापीठांमध्ये विविध प्रकारच्या आजारांबाबत चाचण्या घेता येतील, अशा स्वरूपाच्या मल्टिपर्पज लॅब विद्यापीठांमध्ये सुरू करण्याच्या सूचनाही सामंत यांनी दिल्या. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अशा प्रकारची लॅब सुरू केली आहे. यासाठी केंद्र, राज्य सरकार आणि आरोग्य विभागाच्या आवश्यक त्या सर्व परवानग्या तातडीने देण्यात येतील. याच पार्श्वभूमीवर राज्यातील इतर विद्यापीठांनी आपल्याकडे अशा प्रकारच्या लॅब सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी ग्वाही सामंत यांनी दिली.

### मदतीसाठी 'एनएसएस'चे विद्यार्थी

आरोग्य यंत्रणेला सहकार्य करण्यासाठी एनएसएस विद्यार्थ्यांचीही मदत घेता येईल का, याचा सर्व विद्यापीठाने विचार करावा. काही दिवसांपूर्वी सोलापूर विद्यापीठाने आरोग्य यंत्रणेला सहकार्य करण्यासाठी एक प्रयोग सुरू केला आहे. एनएसएसच्या विद्यार्थ्यांना आईवडिलांकडून परवानगी घेऊन त्यांना प्रशिक्षण देऊन आरोग्यसेवेच्या यंत्रणेसाठी सज्ज केले. याच धर्तीवर राज्यातील इतर विद्यापीठांमध्येसुद्धा 'एनएसएस'चे विद्यार्थी आरोग्य यंत्रणेच्या सेवेसाठी घेता येतील का, यासाठीचा अहवाल सादर करावा, अशा सूचनाही सामंत यांनी कुलगुरूंना केल्या. राज्यातील सर्व विद्यापीठातील कर्मचारी व अधिकारी त्यांचे एक दिवसांचे वेतन 'करोना'च्या निराकरणासाठी मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्याचे आवाहन सामंत यांनी केले आहे.

**Maharashtra Times: 7.4.2020**

# विद्यापीठ आणि सीईटी परीक्षांसाठी लवकरच नवे वेळापत्रक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**मुंबई :** राज्यातील करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय योजनेचा एक भाग म्हणून विद्यापीठ, महाविद्यालयीन व सीईटी परीक्षेचे नियोजित वेळापत्रक पुढे ढकलण्यात आले आहे. करोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता, विद्यार्थी आणि पालक यांच्यामध्ये परीक्षेसंदर्भात संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी सर्व परीक्षांचे नव्याने वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, त्यासाठी नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी एक कुलगुरू व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती करण्यात आली आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

उच्च शिक्षणमंत्री सामंत यांनी सोमवारी सकाळी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू यांच्याशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. त्यात त्यांनी राज्यातील करोना साथरोगामुळे निर्माण झालेली परिस्थिती व स्थगित केलेल्या परीक्षांबाबत आढावा घेतला.

विद्यापीठ, महाविद्यालय आणि सीईटी कक्षाकडून पुढे ढकलण्यात आलेल्या परीक्षा रद्द होणार नाहीत, त्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे सामंत म्हणाले.

या सर्व परीक्षेचे वेळापत्रक नव्याने जाहीर करण्यात येईल. त्यांचे नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुहास पेडणेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, एसएनडीटी विद्यापीठांचे कुलगुरू शशिकला वंजारी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ.अभय वाघ, उच्च शिक्षण विभागाचे संचालक धनराज माने यांची समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती राज्यातील करोनाचा प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून महाविद्यालयीन परीक्षेचे वेळापत्रक, शैक्षणिक वर्षाचे नियोजन असा अहवाल तयार करून उच्च व तंत्रशिक्षण विभागाला सादर करतील, त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल असे सामंत यांनी संगितले.

### विद्यापीठांत आजारांबाबत चाचणी प्रयोगशाळा

राज्यात करोनाच्या पार्श्वभूमीवर आकृषी विद्यापीठांमध्ये विविध प्रकारच्या आजारासंदर्भातील चाचण्या घेता येतील अशा स्वरूपाच्या बहुउद्देशीय प्रयोगशाळा (मल्टिपर्पज लॅब) विद्यापीठांमध्ये सुरू करण्याच्या सूचनाही सामंत यांनी दिल्या. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात अशा प्रकारची प्रयोवशाळा सुरू केली आहे. यासाठी केंद्र शासन, राज्य शासन आणि आरोग्य विभागाच्या आवश्यक त्या सर्व परवानग्या तातडीने देण्यात येतील. याच पार्श्वभूमीवर राज्यातील इतर विद्यापीठांनी आपल्याकडे अशा प्रकारच्या प्रयोगशाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, त्यासाठी राज्य शासनाकडून सर्व परवानग्या देण्यात येतील अशी ग्वाही त्यांनी दिली.

लोकसत्ता Tue, 07 April 2020
https://epaper.loksatta.com/c/50715891

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# मल्टीपर्पज लॅब सुरू करा

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांची विद्यापीठांच्या कुलगुरूंना सूचना

**पुणे, ता. ६ :** साथीचे आजार पसरत असताना त्याच्या चाचण्या घेण्यासाठी विद्यापीठांमध्ये मल्टीपर्पज लॅब सुरू कराव्यात अशी सूचना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी कुलगुरूंना दिली. राज्यात कोरोनाचे रुग्ण वाढत असताना संशयित रुग्णांच्या थुंकींच्या नमुन्यांची तपासणी करण्यासाठी पुरेशा लॅब नाहीत. त्यामुळे नुकतेच सरकारने खासगी लॅबमध्ये चाचणी घेण्यास परवानगी दिली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यासंदर्भात उदय सामंत यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक घेतली. विद्यापीठात विज्ञान विभागाच्या अनेक लॅब असतात, त्याचा उपयोग आजारांच्या चाचणीसाठी करता येऊ शकतो यावर चर्चा झाली.

सामंत म्हणाले, "नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने विविध आजारांची चाचणी घेण्यासाठी लॅब सुरू केली आहे. इतर विद्यापीठांनी याच पद्धतीने लॅब उभाराव्यात, यासाठी प्रस्ताव पाठविल्यास केंद्र सरकार, राज्य सरकार आणि आरोग्य विभागाच्या आवश्यक त्या सर्व परवानग्या तातडीने देण्यात येतील."

"आरोग्य यंत्रणेला सहकार्य करण्यासाठी काही दिवसांपूर्वी सोलापूर विद्यापीठाने प्रयोग राबविला, त्यात एनएसएसच्या २७ विद्यार्थ्यांना आईवडिलांकडून परवानगी घेऊन त्यांना आरोग्य सेवेचे प्रशिक्षण देऊन सज्ज केले. याच धर्तीवर राज्यातील इतर विद्यापीठांतील एनएसएसचे विद्यार्थी आरोग्य यंत्रणेच्या सेवेसाठी तयार असतील तर तसा अहवाल सादर करावा अशी सूचनाही सामंत यांनी दिली."

Sakal: 7.4.2020

# विद्यापीठ परीक्षांसाठी समिती

## लवकरच नवे वेळापत्रक; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन



सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ६ : राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यापीठे, महाविद्यालये आणि सीईटी परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सर्व परीक्षांचे नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी (ता. ६) जाहीर केले.

सामंत यांनी सोमवारी सकाळी ११ वाजता राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. विद्यापीठे, महाविद्यालये आणि सीईटी सेलने पुढे ढकललेल्या परीक्षा रद्द होणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन सामंत यांनी केले. या सर्व परीक्षांचे नवे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

ही समिती राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून महाविद्यालयीन परीक्षांचे वेळापत्रक, शैक्षणिक वर्षाचे नियोजन असा अहवाल सरकारला सादर करतील. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

**मल्टीपर्पज लॅब सुरू करण्याच्या सूचना**

कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अकृषी विद्यापीठांमध्ये विविध आजारांसंदर्भातील चाचण्या घेता येतील, अशा स्वरूपाच्या मल्टिपर्पज लॅब विद्यापीठांमध्ये सुरू करण्याच्या सूचना उदय सामंत यांनी दिल्या. नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने अशा प्रकारची प्रयोगशाळा सुरू केली आहे. त्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार आणि आरोग्य विभागाच्या आवश्यक परवानग्या तातडीने देण्यात येतील. राज्यातील इतर विद्यापीठांनी अशा प्रयोगशाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे ते म्हणाले.

Sakal: 7.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

सकाळ

## विद्यार्थ्यांच्या परीक्षेतही सोशल डिस्टन्सिंग

### शिक्षणमंत्री सामंत यांनी साधला कुलगुरुंशी संवाद; परीक्षा होणारच असल्याचे स्पष्टीकरण

सोलापूर, ता. ६ : कोरोनाच्या वैश्विक संकटाचा मुकाबला सुरू असतानाच आता केंद्र सरकारकडून लॉकडाऊन टप्प्याटप्प्याने उठविण्याचे नियोजन सुरु झाले आहे. केंद्र सरकारच्या सूचनांनुसार विद्यापीठांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करावे.



विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी परीक्षा होतीलच, त्यासाठी सोशल डिस्टन्सिंग व मास्कचा वापर करावा, असे आदेश उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी (ता. ६) सर्व कुलगुरुंना दिले. कोरोनाचा प्रादुर्भाव गर्दीच्या माध्यमातून वाढणार नाही, याची खबरदारी म्हणून केंद्र व राज्य सरकारने तत्काळ संपूर्ण देशभरात लॉकडाउन जाहीर केला. संभाव्य धोका ओळखून ३१ मार्चपर्यंतचा लॉकडाउन १४ एप्रिलपर्यंत वाढविला. त्यामुळे दहावीच्या विद्यार्थ्यांचा शेवटचा भूगोल विषयाचा पेपर काही दिवसांसाठी रद्द करावा लागला. तर मार्चच्या शेवटच्या आठवड्यापासून विद्यापीठांनी केलेले परीक्षांचे नियोजनही रद्द करावे लागले. आता १४ एप्रिलला लॉकडाउन संपेल या आशेवर विद्यापीठांनी २७ एप्रिलपासून परीक्षा घेण्याचे नियोजन केले आहे. मात्र, परीक्षा होतील की नाही, परीक्षा रद्द झाल्यास विद्यार्थ्यांना मागील सेमिस्टरच्या गुणांची सरासरी काढून गुण दिले जातील, या चर्चेला शिक्षणमंत्र्यांनी पूर्णविराम दिला. विद्यार्थ्यांना भविष्यात नोकरी तथा त्यांच्या करिअरमध्ये अडचणी येऊ नयेत, यासाठी परीक्षा होतीलच असे त्यांनी स्पष्ट केले.

Pune, Main
07/04/2020 Page No. 8

## परीक्षेच्या नियोजनासाठी कुलगुरुंची समिती !

### करोनाची व्याप्ती लक्षात घेऊन पुढील निर्णय

मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी) - राज्यातील करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजनेचा एक भाग म्हणून विद्यापीठ, महाविद्यालयीन आणि सीईटी परीक्षेचे नियोजित वेळापत्रक पुढे ढकलण्यात आले आहे. राज्यातील करोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता विद्यार्थी आणि पालक यांच्यामध्ये परीक्षेसंदर्भात संभ्रम निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होऊ नये, या सर्व परीक्षेचे नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी समिती गठित करण्यात आली आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

करोनाच्या संकटामुळे महाविद्यालयीन परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.



करोनाची व्याप्ती वाढतच चालली असून यावर नियंत्रण यायला अजून किमान महिना-दीड महिना लागेल, अशी चिन्हे आहेत. त्यामुळे परीक्षा केव्हा होणार? पुढील शैक्षणिक वर्षे कधी सुरू होणार? सामाईक प्रवेश परीक्षेचे काय? याबाबत संभ्रम असून विद्यार्थी व पालक चिंतेत आहेत.

या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरूंशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला.

विद्यापीठ, महाविद्यालय आणि सीईटी सेलकडून पुढे ढकलण्यात आलेल्या परीक्षा रद्द होणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. या सर्व परीक्षेचे वेळापत्रक नव्याने जाहीर करण्यात येईल. या सर्व परीक्षेचे नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर, कुलगुरू शशिकला वंजारी, कुलगुरू देवानंद शिंदे, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

ही समिती राज्यातील करोनाचा प्रादुर्भाव स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून महाविद्यालयीन परीक्षेचे वेळापत्रक नियोजन, शैक्षणिक वर्षाचे नियोजन असा अहवाल तयार करून उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव आणि मंत्री यांना सादर करतील त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल, असेही सामंत यांनी सांगितले.

प्रभात Tue, 07 April 2020
epaper.eprabhat.net/c/50717725

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# Princis want new degree colleges to reopen only in Oct

Yogita.Rao@timesgroup.com

**Mumbai:** College principals have recommended pushing the start of the next academic session (2020-21) for degree colleges to October-November, instead of June this year, after the Covid-19 outbreak disrupted the academic calendar.

The Association of Non-Government Colleges (ANGC), in a letter to the governor and the higher education minister, said that it will allow teachers to complete classes and conduct exams for the current term (2019-20) comfortably. To avoid confusion and uncertainty among students and parents, the principals have made an appeal to the government to take a careful decision regarding the academic calendar.

Many claim that not conducting exams and directly promoting students may have an adverse impact on the job prospects of final-year students. "There was a year, when final-year students from a public university in the state were promoted under unusual circumstances. That batch of students failed to make a mark in the industry. Therefore, not conducting exams may not be advisable, instead, we can postpone the term to June. Complete classes, conduct exams and then start the new session in October-November," said TA Shiware, chairman, ANGC.

Many colleges under the university have already completed exams for first and second year students. The remaining exams can be conducted in August-September, as the university will need around three months to conduct all 750 exams and announce results.

ANGC also said that admissions to professional colleges are likely to be affected too as a few HSC and MHT-CET exams were postponed. The delay, will anyway, have an impact on the beginning of the academic term. Such an arrangement should be made only for one year (2020-21) and the government can later plan to hold only an annual exam, said Shiware.

The governor, also the chancellor of public universities, will hold a meeting on Tuesday to chalk out a plan.

# University exams will be held, none cancelled: Minister

Hemali.Chhapia @timesgroup.com

**Mumbai:** Public universities across the state will hold the summer exam of 2020 though the timing is not specified. Also, universities will start lab facilities on campus to test for coronavirus.

At a videoconference with the higher and technical education minister Uday Samant, VCs and the CET Cell head cleared the air about exams. While exams of commerce, arts and science were stalled, those for professional courses usually start in May/June. Even the common entrance test will be held. "There has been confusion... Exams are postponed, not cancelled," said Samant.

Vice-chancellors told TOI that a common decision was taken that exams be held and various tentative plans will be drawn up to hold exams depending on when the lockdown is eased.

Samant urged that all varsity employees of the state to submit a day's salary to the CM fund being collected for Covid-19.

Times of India: 7.4.2020

पुढारी

# सीईटीसह विद्यापीठाच्या परीक्षा होणारच : सामंत

## परिस्थिती निवळताच वेळापत्रक जाहीर करणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

सर्व विद्यापीठे आणि त्याअंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयीन परिक्षेसह सीईटीची परीक्षा होणारच आहेत. मात्र, या सर्व परीक्षा कोरोनाची परिस्थिती आटोक्यात आल्यानंतरच होतील. या सर्व परीक्षांचे नियोजन व वेळापत्रक करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी दिली.

राज्यातील सर्व १३ विद्यापीठांच्या कुलगुरूंशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधत मंत्री सामंत यांनी विद्यापीठ व महाविद्यालयीन परिक्षांसह सीईटी परिक्षांबाबत आढावा घेतला.

यात विभागाचे सचिव सौरभ विजय, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने, सीईटी सेलचे आयुक्त संदीप कदम, मुंबईतील जे. जे. स्कुल ऑफ आर्टचे संचालक राजीव मिश्रा सहभागी होते.

सामंत म्हणाले, कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ, महाविद्यालय आणि सीईटी सेलकडून परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असल्या तरी त्या रद्द होणार नाहीत. या सर्व परीक्षा होणारच आहेत.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची खबरदारी सरकार घेईल. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, या सर्व परिक्षांचे वेळापत्रक नव्याने जाहीर केले जाईल. मात्र, कोरोनाची परिस्थिती निवळल्यानंतरच या परीक्षा घेतल्या जातील.

जर आगामी काळात कोरोनामुळे परिस्थिती आणखी चिघळली आणि आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाली तर त्याबाबत आमचा म्प्लॅन- बीफ तयार आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकांनी याबाबत मनात कोणताही संभ्रम बाळगण्याची गरज नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

Pune Edition
7 Apr, 2020 Page No. 4
Powered by : erelego.com

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

### HRD Minister chairs meet with V-Cs

*New Delhi:* Union HRD Minister Ramesh Pokhriyal Nishank on Saturday chaired a meeting with vice-chancellors of 40 central universities through video-conferencing. The minister directed all the universities to take care of the students, faculty and contractual staff amid the COVID-19 outbreak and ensure that they do not face any problem. During the meeting, E Suresh Kumar, Vice-Chancellor, The English and Foreign Languages University, explained to the minister the measures EFLU is implementing during the crisis, including online teaching, a fund to help out the society and a radio campaign to spread awareness. ENS

The Indian E

The Indian Express: 7.4.2020

### विद्यापीठ आणि महाविद्यालयीन परीक्षांच्या नियोजनासाठी कुलगुरूंची समिती

दहशत कोरोनाची

**मुंबई, (प्रतिनिधी)** राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय योजनेचा एक भाग म्हणून विद्यापीठ, महाविद्यालयीन आणि सीईटी परीक्षेचे नियोजित वेळापत्रक पुढे ढकलण्यात आले आहे. राज्यातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता विद्यार्थी आणि पालक यांच्यामध्ये परीक्षेसंदर्भात संभ्रम निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होऊ नये, या सर्व परीक्षेचे नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी ही माहिती दिली. कोरोनाच्या संकटामुळे विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. कोरोनाची व्याप्ती वाढतच चालली असून यावर नियंत्रण यायला अजून किमान महिना-दीडमहिना लागेल अशी चिन्हे आहेत. त्यामुळे परीक्षा केव्हा होणार? पुढील शैक्षणिक वर्षे कधी सुरू होणार? सामाईक प्रवेश परीक्षेचे काय? याबाबत संभ्रम असून विद्यार्थी व पालक चिंतेत आहेत. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी काल राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरुंशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला.

Kesari: 7.4.2020

# नियतकालिकांची परंपरा खंडित

## सुमारे दोनशेपेक्षा अधिक नियतकालिकांना 'करोना'चा फटका

म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि टाळेबंदी यामुळे विविध मराठी नियतकालिकांची छपाई आणि वितरण ठप्प झाले आहे. काही नियतकालिकांनी वेबसाइट तसेच व्हॉट्स ॲपद्वारे पाठवता येईल, असा डिजिटल अंक प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे. नियतकालिकांची समृद्ध परंपरा कशी टिकवायची आणि हजारो लोकांच्या रोजगाराचे काय, असे प्रश्न निर्माण झाले आहेत. 'करोना'चा फटका राज्यातील दोनशेपेक्षा अधिक नियतकालिकांना बसला आहे.

घरात किंवा कार्यालयात एखादे नियतकालिक असणे हे वैचारिक प्रगल्भतेचे लक्षण मानले जाते. महाराष्ट्राला नियतकालिकांची मोठी परंपरा असून, विविध नियतकालिकांनी महाराष्ट्राचे वैचारिक भरणपोषण केले आहे. मात्र, 'करोना'मुळे नियतकालिकांपुढे आव्हान निर्माण झाले आहे.

'टाळेबंदीमुळे प्रकाशन कार्यालये, कागदांची दुकाने, छपाईखाना अशी सर्वच यंत्रणा बंद झाल्याने नियतकालिकांची छपाई थांबली आहे. पोस्टाने विविध विभाग बंद केले असल्याने अंकांचे वितरण होऊ शकत नाही. यामुळे वाचक, वर्गणीदार तसेच जाहिरातदार यांची अडचण झाली आहे. नियतकालिकांना कार्यालय सुरू ठेवण्यासाठी व त्यांचे खासगी छपाईखाने सुरू ठेवण्यास पोलिसांची परवानगी नसल्याने अंक प्रसिद्ध करता येत नाही,' असे मराठी प्रकाशक-संपादक असोसिएशनचे अध्यक्ष भालचंद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

मराठी नियतकालिकांच्या या असोसिएशनमध्ये सहकार सुगंध, ग्राहकहित, व्यापारी मित्र, जडणघडण, अनुभव, विपुलश्री, एकता, मिळून साऱ्याजणी, साधना, माहेर, मेनका, ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका, तुम्ही आम्ही पालक, हिंदूबोध, ऋतुपर्ण, आम्ही सारे ब्राह्मण, चपराक, दृष्टीलक्ष्य, अर्थपूर्ण, विवेक, उत्तम कथा, प्रसाद, यशस्वी उद्योजक, धातुकाम, मधुमित्र, तारांगण, सांस्कृतिक वार्तापत्र, गारवेल, मुलांचे मासिक, सृष्टीज्ञान, जीवन शिक्षण, हॅपी थॉट्स अशा विविध दोनशेहून अधिक नियतकालिकांचा समावेश आहे.

> नियतकालिकांचे वितरण सवलतीचा दर असल्याने प्रामुख्याने टपाल खात्याद्वारे होते. पोस्टाच्या नियमांनुसार अंक छापला गेला नसल्यास त्या पुढील अंकाला सवलत मिळत नाही. जोडअंक काढण्यास वर्षातून एकदाच परवानगी मिळते. दिलेल्या तारखेस अंकांचे वितरण होणे आवश्यक आहे. टपाल खात्याने नियमांमध्ये सवलत देऊन सर्व व्यवहार सुरळीत झाल्यावर योग्य ते सहकार्य करावे. महाराष्ट्रातील प्रकाशकांना दिलासा द्यावा.
>
> - भालचंद्र कुलकर्णी, अध्यक्ष, मराठी प्रकाशक-संपादक असोसिएशन



> टाळेबंदीमुळे छपाईखाना आणि टपाल खाते यांचे कामकाज ठप्प आहे. त्यामुळे साधना साप्ताहिकाचे एप्रिलमधील तीन किंवा चार अंक फक्त ऑनलाइन आवृत्तीच्या स्वरूपात त्या त्या शनिवारी साधनाच्या वेबसाइटवर उपलब्ध होतील. वर्गणीदार वाचकांचे ई-मेल आयडी किंवा व्हॉट्स ॲप नंबर असतील त्या सर्वांना अंक डिजिटल स्वरूपात पाठवला जात आहे. परिस्थिती सुधारल्यानंतर या काळातील तीन ते चार अंकांच्या काही प्रती पाठवल्या जातील.
>
> - विनोद शिरसाठ, संपादक, साधना साप्ताहिक

Maharashtra Times: 7.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# विद्यापीठांच्या परीक्षा १५ मेपर्यंत नाहीच

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

करोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या

**राज्यपालांच्या कुलगुरूंसोबतच्या बैठकीत संकेत**



कुलगुरूंशी विविध विषयांवर चर्चा केली. सध्याच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांचे कुठलेही शैक्षणिक नुकसान होणार नाही, तसेच विद्यापीठांच्या उन्हाळी परीक्षा सामायिक पद्धतीने घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे, अशी सूचना राज्यपालांनी कुलगुरूंना केली. उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनीदेखील व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या या बैठकीत सहभाग घेतला. यावेळी विद्यापीठांच्या परीक्षा १५ मेपर्यंत होणार नसल्याचे संकेत देण्यात आल्याचे सूत्रांकडून समजते.

विद्यापीठांनी आपल्या आकस्मिक निधीचा वापर करोना परीक्षण प्रयोगशाळा सुरू करणे, मास्क व सॅनिटायझर निर्मिती तसेच इतर समाजोपयोगी साहित्य तयार करण्यासाठी करावा, अशीही सूचना राज्यपालांनी यावेळी केली. व्हर्च्युअल क्लासरूम तसेच तंत्रज्ञानावर आधारित इतर ऑनलाइन सुविधांच्या मदतीने विद्यापीठांनी अध्यापनाचे कार्य सुरू ठेवावे, अशीही सूचना राज्यपालांनी यावेळी केली. प्रत्येक विद्यापीठाने आपल्या परिसरात स्थलांतरित कामगार, बेघर व निराश्रित लोकांना भोजन सुविधा देण्याचा प्रयत्न करावा, तसेच विद्यापीठांच्या कुलगुरूंनी आपल्या वेतनाचा काही भाग सरकारला योगदान म्हणून देण्याबाबत विचार करावा, अशीही सूचना राज्यपालांनी केली.

## एमपीएससी परीक्षा आणखी लांबणीवर

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील करोनाचा दिवसेंदिवस वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, राज्यसेवा पूर्व परीक्षा आणि राज्यसेवा संयुक्त परीक्षा काही काळासाठी स्थगित करण्याचा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) जाहीर केला आहे. यासंदर्भातील परिपत्रक मंगळवारी जारी केले.

**करोना साथीच्या पार्श्वभूमीवर निर्णय**

राज्यात करोनाग्रस्तांची संख्या वाढत चालल्याने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या दोन परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. आयोगाने २२ मार्च रोजी एक परिपत्रक जारी करत ५ एप्रिलला होणारी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्वपरीक्षा २६ एप्रिल रोजी आणि ३ मे रोजी होणारी संयुक्त पूर्व परीक्षा १० मे रोजी होणार असल्याचे म्हटले होते. मात्र राज्यात करोनाग्रस्तांची संख्या वाढत चालल्याने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आता या नियोजित तारखाही पुढे ढकलल्या आहेत.

'करोना विषाणूचा वाढत प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुरू असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अनुषंगाने २२ मार्च परिपत्रकानुसार ठरविलेली २६ एप्रिल रोजी होणारी राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० व १० मे रोजी होणारी महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट ब, संयुक्त पूर्व परीक्षा २०२० या दोन्ही सार्वजनिक हितास्तव पुढे ढकलण्यात येत आहेत. नवे वेळापत्रक पुढील परिस्थिती लक्षात घेवून वेबसाइटवर जाहीर करण्यात येईल व संबधित विद्यार्थ्यांना एसएमएस पाठवण्यात येईल,' असे आयोगाने म्हटले आहे.

**Maharashtra Times: 8.4.2020**

---

सकाळ

# शिक्षकांच्या कामाचे ऑनलाइन मूल्यमापन

## अभियांत्रिकी, तंत्रनिकेतनसाठी 'वर्क फ्रॉम होम' करणाऱ्यांची अहवालात होणार नोंद

**पुणे, ता. ७ : अभियांत्रिकी महाविद्यालये आणि तंत्रनिकेतनमधील शिक्षकांनो, वर्क फ्रॉम होम करीत असाल, तर तंत्र शिक्षण संचालनालय त्याचे मूल्यमापन ऑनलाइन पद्धतीने करणार आहे. तसेच, केलेल्या कामाचा तपशीलही द्यावा लागणार आहे. शिक्षकांच्या या कामाची दखल गोपनीय अहवालात घेतली जाणार आहे.**

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सर्व तंत्रशिक्षण संस्थांमधील कामकाज 'वर्क फ्रॉम होम' पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार शिक्षकांनी ऑनलाइन अभ्यासक्रमास प्रवेश घेणे आणि तो पूर्ण करणे, विद्यार्थ्यांना ऑनलाइन अभ्यासक्रमांची माहिती पुरविणे, त्यांना विषयनिहाय व्हिडिओ इ-मेल वा व्हॉट्सॲपद्वारे उपलब्ध करून देणे, ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा अध्ययनासाठी शिक्षकांनी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी वापर करावा, असे सांगितले होते.

**शिक्षकांना सुचविले होते पर्याय**

ऑनलाइन व्हिडिओ एडिटिंग प्रणालीचा वापर करून शिक्षकांनी स्वतः विषयनिहाय व्हिडिओ क्लीप तयार करून विद्यार्थ्यांना पुरविणे, व्हॉट्सॲप समूहाद्वारे असाईनमेंट देणे, पुढील सत्राचे शैक्षणिक नियोजन विभागास सादर करणे, प्रश्नांची बॅंक तयार करणे, व्हॉट्सॲप समूहाद्वारे शंका निरसन करणे इत्यादी अनेक पर्याय सुचविले होते. त्याचा जास्तीत जास्त वापर करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, असे सूचित केले होते.

> **शिक्षकांच्या मूल्यमापनासाठी ॲप तयार केला आहे. त्यात शिक्षकांनी वर्क फ्रॉम होम काळात केलेल्या कामाची माहिती अपलोड करायची आहे. ती सबमिट केल्यानंतर प्राचार्य त्यावर ऑनलाइन शेरा मारतील. पुढे ही माहिती संचालनालयाकडे येईल. त्याआधारे शिक्षकांच्या गोपनीय अहवालात नोंदी केल्या जातील.**
> – डॉ. अभय वाघ, तंत्र शिक्षण संचालक

**काय झाला विद्यार्थ्यांना फायदा?**

आता यापुढील टप्प्यात सर्व संस्थांचा आढावा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे तंत्रशिक्षण संचालनालयाने ठरविले आहे. सर्व संस्था आणि शिक्षक यांना गुगल फॉर्म पाठवून त्यांनी वर्क फ्रॉम होम करताना कोणकोणते पर्याय वापरले, त्यांची परिणामकारकता काय, किती विद्यार्थ्यांना याचा फायदा झाला आदी बाबी तपासणार आहेत. त्यासाठी सर्व विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालक आणि प्राचार्य यांना जबाबदारी दिली आहे. हे कामही ॲपद्वारे करण्यात येणार आहे.

**३६० डिग्री फीडबॅक संकल्पना**



अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनमधील शिक्षकीय पदांना सातवा वेतन आयोग लागू करताना शासनाने शिक्षकांची कामगिरी तपासण्यासाठी ३६० डिग्री फीडबॅक संकल्पना अनिवार्य केली आहे. या अनुषंगाने शिक्षकांचे वार्षिक गोपनीय अहवाल आणि मूल्यमापन करताना त्यांनी वर्क फ्रॉम होम अंतर्गत केलेल्या कामाचे मूल्यमापन समाविष्ट असेल. लॉकडाउन कालावधीत विद्यार्थ्यांचे कमीतकमी शैक्षणिक नुकसान होईल, यासाठी ही उपाययोजना केली आहे, असे तंत्र शिक्षण संचालक डॉ. अभय वाघ यांनी स्पष्ट केले.

Pune, Main
08/04/2020 Page No. 4

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

लोकमत

# सर्व शैक्षणिक संस्था १५ मेपर्यंत बंद ठेवाव्यात

## मंत्रिगटाची शिफारस; धार्मिक कार्यक्रमांवर निर्बंध?

**नवी दिल्ली :** देशव्यापी २१ दिवसांच्या लॉकडाउनला सरकार मुदतवाढ देवो किंवा न देवो, १५ मेपर्यंत सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवाव्यात, तसेच धार्मिक सामूहिक कार्यक्रमांवर निर्बंध घालावेत, अशी शिफारस कोविड-१९ वरील मंत्रिगटाने केली आहे, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिगटाच्या बैठकीत गृहमंत्री अमित शहा, वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांचा सहभाग होता. यात असे मत व्यक्त करण्यात आले की, सध्याचा लॉकडाउन १४ एप्रिल रोजी संपणार असला तरी १४ एप्रिलपासून किमान चार आठवडे धार्मिक ठिकाणे, शॉपिंग मॉल्स आणि शैक्षणिक संस्थांना नेहमीप्रमाणे कामकाज सुरु करण्याची मुभा देऊ नये.

उन्हाळी सुट्ट्या मे महिन्याच्या मध्यात सुरु होत असल्याने शाळा आणि महाविद्यालये जूनअखेरपर्यंत बंद ठेवण्याबाबत सरकार विचार करीत आहे.

कोरोनाचा संसर्ग पसरू नये म्हणून खबरदारीसाठी सर्व धार्मिक संघटनांना १५ मेपर्यंत कार्यक्रम घेण्याची परवानगी देऊनये, अशी शिफारस केली आहे. स्थितीवर नियंत्रणासाठी उपायोजनांबाबत पंतप्रधानांना शिफारस करण्याचे काम मंत्रिगटावर सोपविले आहे. मंत्रिगटाने संसर्गाच्या चाचणीसाठी प्रयोगशाळांतील तपासणी सुविधा वाढविण्यासाठी उपाय योजण्याचीही शिफारस केली आहे. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, रामविलास पासवान, धर्मेंद्र प्रधान, नरेंद्रसिंह तोमर, रमेश पोखरियाल निशंक, डी.व्ही. सदानंद गौडा, स्मृती इराणी, गजेंद्र सिंह शेखावत यांचीही बैठकीला उपस्थिती होती. (वृत्तसंस्था)

Pune Main
Page No. 1 Apr 08, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

### दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंगचाही पर्याय

# बारावीची पुस्तके संकेतस्थळावर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे/ मुंबई :** टाळेबंदीमुळे बालभारतीने बारावीची नव्या अभ्यासक्रमाची पुस्तके 'पीडीएफ' स्वरूपात संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ई-साहित्यही उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षण विभाग प्रयत्न करत आहे.

राज्यमंडळाचा बारावीचा अभ्यासक्रम येत्या शैक्षणिक वर्षापासून (२०२०-२१) बदलणार आहे. नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी नवी पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध होतात. यंदाही बालभारतीने मार्चअखेरीस






"विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. टाळेबंदीबाबत पुढील निर्णय झाल्यानंतर आगामी दिशा ठरवणे शक्य होईल. मात्र, विविध शक्यतांचा विचार करून पर्याय शोधण्यात येत आहेत. दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास एप्रिलपासूनच सुरु होतो. यंदा आधीच बारावीची नव्या अभ्यासक्रमाची पुस्तके वितरणापूर्वी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

– वर्षा गायकवाड, शालेय शिक्षणमंत्री

बारावीची सर्व पुस्तके दुकानांमध्ये उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले. मात्र, टाळेबंदी न हटल्यास विद्यार्थ्यांना दुकानांमध्ये पुस्तके उपलब्ध होणे शक्य नाही. त्यामुळे आता बारावीची पुस्तके बालभारतीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचा विचार शिक्षण विभाग करत आहे. पहिली ते अकरावीचा अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने गेल्यावर्षीपर्यंत बदलण्यात आला. या अभ्यासक्रमाची पुस्तके संकेतस्थळावर पूर्वीपासूनच उपलब्ध आहेत.

त्याचबरोबर दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ई-साहित्य उपलब्ध करून देण्यासाठीही प्रयत्न करण्यात येत आहेत.

टाळेबंदी न हटल्यास पुढील शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक कोलमडणार आहे. तोपर्यंत विद्यार्थ्यांना त्यांचा अभ्यास सुरू करता यावा, यासाठी विविध पर्यायांची पडताळणी विभाग करत आहे.

लोकसत्ता
Wed, 08 April 2020
https://epaper.loksatta.com/c/50743784

---

सकाळ

# विद्यार्थ्यांनो, प्लेसमेंटची चिंता नको

## 'ऑफर' कायम ठेवण्यासाठी महाविद्यालयांचा कंपन्यांशी संवाद सुरू

**पुणे, ता. ७ :** महाविद्यालयात जानेवारी-फेब्रुवारीमध्ये झालेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये तुमची निवड झालीय, आणि तुम्हाला ऑफर लेटरही मिळलंय! परंतु लॉकडाउनमुळे तुम्हाला मिळालेली नोकरी राहणार की नाही असा प्रश्न पडलाय ना? पण चिंता नका करू. तुमच्या महाविद्यालयांतील संबंधित समन्वयक नोकऱ्या देणाऱ्या कंपन्यांच्या संपर्कात आहेत आणि विद्यार्थ्यांना मिळालेली नोकरीची संधी लॉकडाउननंतरही कायम राहावी, या प्रयत्नात ते आहेत.

पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाला असणाऱ्या विद्यार्थ्यांना या काळात वेध लागतात ते नोकरीचे. कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून हजारो

**"नोकऱ्या मिळालेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांतील बहुतांश विद्यार्थ्यांना ऑगस्टपासून कंपन्यांमध्ये रूजू होण्यास सांगितले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी काळजी करण्याचे कारण नाही. त्याशिवाय संबंधित कंपन्यांशी लॉकडाउननंतर पुन्हा संपर्क साधण्यात येणार आहे.**

**– डॉ. निवेदिता एकबोटे,** उपसचिव, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी



विद्यार्थ्यांना फेब्रुवारी-मार्चमध्ये नोकरी मिळाल्याचे पत्र मिळते. हे विद्यार्थी एरवी निवांत असतात. परंतु यंदा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सध्या सुरू असलेल्या लॉकडाउनमुळे विद्यार्थ्यांना ऑफर लेटरप्रमाणे नोकरी आता राहणार का? अशी चिंता सतावू लागली आहे.

याबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर म्हणाले, "विद्यार्थ्यांचे ऑफर लेटर मागे घेण्यासंदर्भात कोणत्याही कंपन्यांनी अद्याप संपर्क साधलेला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी निर्धास्त राहावे. यापूर्वी झालेल्या प्लेसमेंटवर लॉकडाउनमुळे फारसा परिणाम होईल, असे वाटत नाही. परंतु विद्यार्थ्यांना दिलेल्या पॅकेजमध्ये आणि कामावर रूजू होण्याचा कालावधीत बदल होऊ शकतो."

भारती अभिमत विद्यापीठाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद भालेराव म्हणाले, "यंदा जवळपास १२० कंपन्यां नोकरी देण्यासाठी महाविद्यालयात येणार होत्या. त्यापैकी ८६ कंपन्या यापूर्वी येऊन गेल्या आहेत. उर्वरित ३४ कंपन्यांनी लॉकडाउननंतरही नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव कायम ठेवावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत."

Pune, Main
08/04/2020 Page No. 4

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

लोकमत

सेंटर फॉर पब्लिकेशन एथिक्स : युजीसी'कडून सुधारित यादी प्रसिद्ध

# निकषानूसार नसलेली ७१ नियतकालिके वगळली

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : विद्यापीठे व महाविद्यालयांमधील प्राध्यापकांचे संशोधनकार्य प्रसिद्ध करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) 'युजीसी-केअर'अंतर्गत संशोधन नियतकालिकांची (रीसर्च जरनल्स) यादी दर तीन महिन्यांनी सुधारित केली जाते. काही नियतकालिके युजीसी केअरच्या निकषानुसार नसल्याने त्यांना वगळले आहे. तर भारतीय भाषांमधील आणि आंतरराष्ट्रीय अशा १९८ संशोधन नियतकालिकांचा त्यात नव्याने समावेश केला आहे.

पूर्वी काही प्राध्यापकांकडून त्यांचे संशोधन प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या नियतकालिकांपैकी काही नियतकालिके अप्रमाणित पद्धतीने चालवली जात होती.तसेच त्यात काही गैरप्रकार होत होता. त्यामुळे संशोधनाचा दर्जाही सुमार होत चालला होता. या पार्श्वभूमीवर 'युजीसी - केअर'अंतर्गत अशा नियतकालिकांची प्रथम सूची जून २०१९ मध्ये 'सेंटर फॉर पब्लिकेशन एथिक्स' या केंद्राने केली. तसेच संशयास्पद ७१ नियतकालिके वगळली.



### गट एकमध्ये भारतीय भाषांतील संशोधन

- 'गट एक' मध्ये सर्व भारतीय भाषांमधील दर्जेदार संशोधनात्मक नियतकालिके आणण्याचा प्रयत्न केला आहे. या तिमाहीमध्ये ३८ नियतकालिके नव्याने समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यापैंकी ८ इंग्रजी आहेत, इतर ३० भारतीय भाषांमधील आहेत.

### गट दोनमध्ये एमएलए मधील माहिती

- 'गट दोन' मध्ये जगभरातील मान्यताप्राप्त अशा अमेरिकेतील मॉडर्न लँग्वेज असोसिएशन (एम.एल.ए.) या प्रसिद्ध डेटाबेसमधील १६० नियतकालिके नव्याने समाविष्ट केली आहेत.तसेच ह्यागट दोनह्र मध्ये आधीच समाविष्ट असलेल्या जगभरातील दोन मान्यताप्राप्त डेटाबेसमधील (वेब ऑफ सायन्स आणि स्कोपस) नियतकालिकांबद्दल यूजीसीकडे तक्रारी आल्या होत्या. त्यांची सर्वांगीण पडताळणी केल्यानंतर स्कोपस या डेटाबेस मधील अप्रमाणित ७१ नियतकालिके आता या यादीतून वगळली आहेत.

संशोधन नियतकालिकांच्या महत्वाच्या कामासाठी युजीसीने एक विशेष कक्ष प्रस्थापित केला आहे. कक्षाचे मुख्य कार्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात केले आहे. या कामासाठी देशातील इतर चा विद्यापीठे व २५ राष्ट्रीय संस्था यांचे सहाय्य घेऊन दर्जेदा नियलकालिकांची यादी तयार केल जाते. ही यादी दर तीन महिन्यांन सुधारित करून युजीसी केअ समितीची मान्यता घेऊन प्रसिद्ध केली जाते. यादीत सुधारणा करून एप्रिल २०२० रोजी सुधारित याद प्रसिद्ध केली आहे, अशी माहित 'सेंटर फॉर पब्लिकेशन एथिक्स केंद्राच्या समन्वयक डॉ. शुभद नगरकर यांनी दिली.

दर्जेदार नियतकालिकांची याद दोन गटात विभागलेली आहे. गट एक मध्ये चार विद्यापीठे व इतर २ संस्थांनी निर्देशित केलेली व केअ निकषानुसार मान्य झालेल नियतकालिके आहेत, तर गट दो मध्ये जगमान्य डेटाबेसमधील नियतकालिके यांचा समावेश आहे याबाबत अधिक माहितीसाठ ugc.journalcell@gmail.com या ई-मेलवर सपर्क साधावा, अस आवाहन करण्यात आले आहे.

Hello Pune
Page No. 2 Apr 08, 2020
Powered by: erelego.com

# संशयास्पद ७१ नियतकालिके वगळली

### 'यूजीसी'ची सुधारित यादी प्रसिद्ध

म. टा. प्रतिनिधी, पुणे

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) 'युजीसी-केअर'अंतर्गत संशोधन नियतकालिकांची (रिसर्च जरनल्स) यादी दर तीन महिन्यांनी सुधारित केली जाते. यंदा प्रकाशित केलेल्या सुधारित यादीत ७१ नियतकालिके वगळण्यात आली आहेत, तर १९८ संशोधन नियतकालिकांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे.

विद्यापीठे व महाविद्यालयांमधील प्राध्यापकांचे संशोधनकार्य प्रसिद्ध करण्यासाठी काही नियतकालिके 'यूजीसी केअर'च्या निकषानुसार नसल्याने वगळण्यात आली आहेत, तर भारतीय भाषांमधील आणि आंतरराष्ट्रीय अशी सुमारे १९८ संशोधन नियतकालिकांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. ही यादी http://ugccare.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### सुधारित यादीची ठळक वैशिष्ट्ये अशी...

- 'गट एक'मध्ये सर्व भारतीय भाषांतील दर्जेदार संशोधनात्मक नियतकालिके आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या तिमाहीत ३८ नियतकालिके नव्याने समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यापैकी ८ इंग्रजी आहेत, इतर ३० भारतीय भाषांतील आहेत.
- 'गट दोन'मध्ये जगभरातील मान्यताप्राप्त अशा अमेरिकेतील मॉडर्न लँग्वेज असोसिएशन (एम.एल.ए.) या प्रसिद्ध डेटाबेसमधील १६० नियतकालिके नव्याने समाविष्ट करण्यात आली आहेत.
- 'गट दोन'मध्ये आधीच समाविष्ट असलेल्या जगभरातील दोन मान्यताप्राप्त डेटाबेसमधील (वेब ऑफ सायन्स आणि स्कोपस) नियतकालिकांबद्दल यूजीसीकडे तक्रारी आल्या होत्या. त्यांची सर्वांगीण पडताळणी केल्यानंतर 'स्कोपस' या डेटाबेसमधील अप्रमाणित ७१ नियतकालिके आता या यादीतून वगळण्यात आली आहेत.



पूर्वी काही प्राध्यापकांकडून त्यांचे संशोधन प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या नियतकालिकांपैकी काही अप्रमाणित पद्धतीने चालवली जात असत, त्यात काही गैरप्रकार होत; तसेच त्यामुळे संशोधनाचा दर्जाही सुमार राहात असे. या पार्श्वभूमीवर 'यूजीसी-केअर'अंतर्गत अशा नियतकालिकांची प्रथम सूची जून २०१९ मध्ये 'सेंटर फॉर पब्लिकेशन एथिक्स' या केंद्राने केली. या महत्त्वाच्या कामासाठी यूजीसीने एक विशेष कक्ष प्रस्थापित केला आहे. या केंद्राचे मुख्य कार्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आहे. या कामासाठी देशातील इतर चार विद्यापीठे व २५ राष्ट्रीय संस्था यांचे साह्य घेऊन दर्जेदार नियलकालिकांची यादी तयार केली जाते. ही यादी दर तीन महिन्यांनी सुधारित करून, यूजीसी केअर समितीची मान्यता घेऊन प्रसिद्ध केली जाते. यादीत सुधारणा करून १ एप्रिल २०२० रोजी सुधारित यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे, अशी माहिती 'सेंटर फॉर पब्लिकेशन एथिक्स' केंद्राच्या समन्वयक डॉ. शुभदा नगरकर यांनी दिली. ही यादी दोन गटांत विभागलेली आहे. 'गट एक'मध्ये चार विद्यापीठे व इतर २५ संस्थांनी निर्देशित केलेली व केअर निकषानुसार मान्य झालेली नियतकालिके आहेत, तर दुसऱ्या गटात जगमान्य डेटाबेसमधील नियतकालिके यांचा समावेश आहे. याबाबत अधिक माहितीसाठी ugc.journalcell@gmail.com या ई-मेलवर सपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**Maharashtra Times: 8.4.2020**

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

### राज्यपालांच्या कुलगुरूंना सूचना

# राज्यात सर्व विद्यापीठांच्या सामायिक परीक्षा घेण्याचा विचार करावा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**मुंबई-** करोना साथरोगाच्या फैलावामुळे राज्यातील सर्व विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या आहेत. त्यात वेळ बराच गेला आहे. त्यामुळे करोना स्थितीचा आढावा घेऊन, राज्यातील सर्व विद्यापीठांच्या सामायिक म्हणजे एकाच वेळी परीक्षा घेता येतील का, याचा विचार करावा, अशा सूचना राज्यपाल तथा कुलपती भगत सिंह कोश्यारी यांनी कुलगुरूंना केल्या आहेत.

करोना साथरोगामुळे पुढे ढकलण्यात आलेल्या विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षांचे काय करायचे, याबाबत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी त्यांच्या विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे विद्यापीठांच्या कुलगुरूंशीही त्यांनी चर्चा केली. त्यानंतर करोनाच्या स्थितीचा आढावा घेऊन विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षांचे नियोजन, नियंत्रण व नवे वेळापत्रक तयार करणे, यासाठी कुलगुरूंची व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक समिती स्थापन केली. ही समिती सर्व परिस्थितीचा अभ्यास करून विभागाला अहवाल सादर करणार आहे.

करोना साथरोगाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या रखडलेल्या परीक्षा तसेच विद्यापीठ स्तरावरील इतर प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी राज्यपालांनीही मंगळवारी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला व विविध विषयांवर चर्चा केली. त्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे राज्यपालांनी कुलगुरूंना सांगितले. विद्यापीठांच्या स्थगित केलेल्या परीक्षा सामायिक पद्धतीने घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी देखील व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या या बैठकीत सहभाग घेतला. राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा सामायिकपणे घेता येतील का, याचा अभ्यास करून शासनाला अहवाल सादर करण्यासाठी मुंबई, पुणे, कोल्हापूर तसेच एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरूंची समिती गठीत केली असून समिती लवकरच आपला अहवाल सादर करणार असल्याची माहिती त्यांनी या वेळी दिली.

**विद्यापीठांची सामाजिक जबाबदारी**

विद्यापीठांनी आपल्या आकस्मिक निधीचा वापर करोना परीक्षण प्रयोगशाळा सुरू करणे, मास्क व सॅनिटायझर निर्मिती तसेच इतर समाजोपयोगी साहित्य तयार करण्यासाठी करावा, असे राज्यपालांनी सांगितले. व्हर्च्युअल क्लास रूम तसेच तंत्रज्ञानावर आधारित इतर ऑनलाइन सुविधांच्या मदतीने विद्यापीठांनी अध्यापनाचे कार्य सुरू ठेवावे, तसेच प्रत्येक विद्यापीठाने आपापल्या परिसरामध्ये स्थलांतरित कामगार, बेघर व निराश्रित लोकांना भोजन सुविधा देण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना त्यांनी केल्या. विद्यापीठांच्या कुलगुरूंनी आपल्या वेतनाचा काही भाग शासनाला योगदान म्हणून देता येईल का, याचा विचार करावा असे आवाहन राज्यपालांनी केले.

लोकसत्ता Thu, 09 April 2020
https://epaper.loksatta.com/c/50763380

---

लोकमत

### बँक फेडरेशनचे आवाहन : सुरक्षारक्षकांच्या राहण्या-जेवण्याची व्यवस्था करावी

# विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनासाठी विद्यापीठाची ‘ऑनस्क्रीन’ वाटचाल

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षांचा निकाल लवकर जाहीर करता यावा, यासाठी मूल्यमापन पद्धतीमध्ये पुढील काळात बदल केला जाणार असून ऑनस्क्रीन मूल्यमापनावर अधिकाधिक भर दिला जाणार आहे, असे विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी संगितले.

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय व संशोधन संस्थाची संख्या सुमारे एक हजार आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या विविध परीक्षा आयोजित करुन त्यांचा निकाल जाहीर करण्याची मोठी जबाबदारी परीक्षा विभागावर आहे. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार परीक्षेनंतर ४५ दिवसांत निकाल जाहीर करावा लगतो. मात्र, वाढती विद्यार्थिसंख्या आणि अपुरे प्राध्यापक यामुळे अनेक परीक्षांचा निकाल जाहीर करण्यास काही वेळा उशीर होतो. त्यातच पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी क्रेडिट सिस्टीम लागू झाल्यामुळे मूल्यमापनाचे काम अधिक वाढले ाहे.

सध्या कोरोनामुळे परीक्षा रद्द कराव्या लागल्या. विद्यापीठ स्तरावर परीक्षांच्या स्वरुपात बदल करण्याचा विचार सुरु आहे. कोरोनाचे सावट दूर झाल्यानंतर होणाऱ्या विविध विषयांच्या परीक्षांचे मूल्यमापन करावे लागणार आहे. प्राध्यापकांना उत्तरपत्रिका तपासणीसाठी एकत्र यावे लागणार आहे. त्यामुळे कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीतून आता सर्व विद्यापीठांना धडा घ्यावा लागणार आहे. तसेच, मूल्यमापन प्रक्रियेत सुधारणा कराव्या लागणार आहेत.

त्यामुळे विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताणही कमी होईल आणि परीक्षा विभागाचा व प्राध्यापकांचा वेळही वाचू शकेल.

**अभियांत्रिकी व पदव्युत्तर पॅटर्न यशस्वी**

- काही वर्षांपासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभियांत्रिकी व विज्ञान पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका ऑनस्क्रीन अर्थात संगणकावर तपासल्या जातात.
- परिणामी, वेळेची बचत होत असून या अभ्यासक्रमांचा निकाल लवकर जाहीर करणे शक्य झाले आहे. त्यामुळे पुढील काही वर्षांत सर्व अभ्यासक्रमांच्या व सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन ऑनस्क्रीन करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाकडून पाऊल उचलले जाणार आहे.



“ विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील लाखो विद्यार्थ्यांचा विविध परीक्षांचा निकाल नियोजित कालावधीत जाहीर करावा लागतो. नवीन विद्यापीठ कायद्यात मूल्यमापनाबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत. तसेच अपवादात्मक परिस्थीतीत मूल्यमापन कसे करावे, याबाबतही माहिती दिली आहे. सध्या अभियांत्रिकी व विज्ञान पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका ऑनस्क्रीन मूल्यमापन केले जाते. परंतु, पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने सर्व परीक्षेचे ऑनस्क्रीन मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने पाऊल टाकले जाईल. त्यासाठी प्राध्यापक व महाविद्यालयांना विश्वासात घेतले जाईल.

**- डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Main
Page No. 2 Apr 09, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

पुढारी

# बारावीची पीडीएफ पुस्तके बालभारतीच्या संकेतस्थळावर

## लॉकडाऊनमुळे पुस्तकांच्या वितरणात अडथळा

**मुंबई :** यंदा बारावीच्या अभ्यासक्रमाची पुस्तके बदलली आहेत. मात्र, कोरोनाच्या संकटामुळे ती अद्यापही बाजारात उपलब्ध होऊ शकली नाहीत. राज्य पाठ्यपुस्तक मंडळाने (बालभारती) ही पुस्तके आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहेत. सर्व माध्यमांची पुस्तके पीडीएफ स्वरूपात आहेत. शाळांनी तसेच विद्यार्थ्यांना ती डाऊनलोड करून घेता येणार आहेत.

शालेय शिक्षण विभागाने दहावीनंतर (२०१९-२०) अकरावी आणि आता २०२०-२१ या वर्षात बारावीची पुस्तके बदलली आहेत. राज्यातील प्रवेश परीक्षांची रचना, राष्ट्रीय प्रवेशपरीक्षा असे अनेक बदल दरम्यानच्या काळात झाले. त्यानुसार राज्य मंडळाने विद्यार्थ्यांना स्पर्धा व गुणवत्तेच्या अनुषंगाने परीक्षेच्या आराखड्यातही काही बदल केले. नवी पुस्तके ही राष्ट्रीय प्रवेश परीक्षा नजरेसमोर ठेवून तयार केली आहेत. या नव्या अभ्यासक्रमामुळे राष्ट्रीय प्रवेश परीक्षा देताना मदत होणार आहे. संकेतस्थळावर माध्यमनिहाय पुस्तके आहेत.

**इथे मिळतील ऑनलाइन पुस्तके :**



http://ebalbharati.in/main/publicHome.aspx....

Pune Edition
9 Apr, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ देऊ नका

## राज्यपालांची विद्यापीठांना सूचना : परिस्थितीचा सर्वंकष आढावा

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ८** - करोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी बुधवारी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंशी विविध विषयांवर चर्चा केली.



सध्याच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांचे कुठलेही शैक्षणिक नुकसान होणार नाही, तसेच विद्यापीठांच्या उन्हाळी परीक्षा सामायिक पद्धतीने घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, अशी सूचना राज्यपालांनी कुलगुरूंना केली. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या या बैठकीत उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनीदेखील सहभाग घेतला.

विद्यापीठांनी आपल्या आकस्मिक निधीचा वापर करोना परीक्षण प्रयोगशाळा सुरू करणे, मास्क आणि सॅनिटायझर निर्मिती तसेच इतर समाजोपयोगी साहित्य तयार करण्यासाठी करावा, अशीही सूचना राज्यपालांनी केली. व्हर्च्युअल क्लास रूम तसेच तंत्रज्ञानावर आधारित इतर ऑनलाइन सुविधांच्या मदतीने विद्यापीठांनी अध्यापन सुरू ठेवावे. प्रत्येक विद्यापीठाने स्थलांतरित कामगार, बेघर आणि निराश्रीत लोकांना भोजन सुविधा देण्याचा प्रयत्न करावा, अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. सर्व कुलगुरूंनी आपल्या वेतनाचा काही भाग शासनाला योगदान म्हणून देता येईल का याचा विचार करावा, अशीही सूचना राज्यपालांनी यावेळी केली.

> राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा सामायिकपणे घेता येतील का, याचा अभ्यास करून सरकारला अहवाल सादर करण्यासाठी मुंबई, पुणे, कोल्हापूर तसेच एसएनडीटी महिला विद्यापीठांच्या कुलगुरूंची समिती गठीत केली असून समिती लवकरच आपला अहवाल सादर करणार आहे. विद्यापीठांमध्ये करोना टेस्टिंग लॅब सुरू करण्याबाबत तसेच कमी किंमतीचे व्हेंटिलेटर निर्माण करण्याबाबत विद्यापीठांच्या प्रयत्नांना सरकार सर्वतोपरी मदत करेल.
>
> **- उदय सामंत,** उच्च शिक्षणमंत्री.

प्रभात Thu, 09 April 2020
epaper.eprabhat.net/c/50790491

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# परीक्षांसाठी विद्यापीठाकडून शासनाला अहवाल

### ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याचाही पर्याय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : राज्यातील संचारबंदीचा कालावधी वाढणार की नाही, या बाबत अद्याप अनिश्चितता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची परीक्षा कोणत्या पद्धतीने घ्यायची याची चाचपणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. मात्र, परीक्षा कोणत्या पद्धतीने घ्याव्यात याबाबतचा अहवाल तयार करून राज्य सरकारला सादर करण्यात येणार असून, त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार आहे. परीक्षा घेण्यासाठीच्या पद्धतींमध्ये ऑनलाइन पद्धतीचाही समावेश आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी ही माहिती दिली. विद्यापीठाच्या परीक्षांचे नियोजन करण्याबाबत डॉ. करमळकर यांनी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थांचे संचालक, अभ्यास मंडळाचे सदस्य यांची ऑनलाईन बैठक घेतली. त्यात सध्याच्या संचारबंदीसंदर्भातील विविध शक्यता गृहीत धरून नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच प्राचार्य, संचालक, अभ्यास मंडळ सदस्यांनी परीक्षा घेण्यासाठीचे विविध पर्याय सुचवले. 'परीक्षा रखडण्याची समस्या राज्यातील सर्वच विद्यापीठांसमोर आहे. त्यामुळे परीक्षा कधी घ्यायच्या, कोणत्या पद्धतीने घ्यायच्या हा प्रश्न आहे. विद्यापीठाच्या परीक्षांबाबतचे विविध पर्याय समोर येत आहेत. त्यात ऑनलाइन पद्धतीचाही समावेश आहे. आता परीक्षा घेण्यासाठीच्या पर्यायांचा अहवाल तयार करून राज्य शासनाला सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर शासनाकडून निर्णय घेतला जाईल. या अहवालातील नियोजन अन्य विद्यापीठांनाही मार्गदर्शक ठरू शकेल,' असे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

लोकसत्ता Sat, 11 April 2020
https://epaper.loksatta.com/c/50845148

# प्रथम, द्वितीय वर्षासाठी एमसीक्यू परीक्षांचा पर्याय

### प्राचार्यांशी चर्चा । अद्याप अंतिम निर्णय नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे : महाविद्यालयीन** विद्यार्थ्यांच्या परीक्षांबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विविध पर्यायांचा विचार केला जात असून, त्याबाबत पणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांमधील महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कल्पना देण्यात आली आहे. लॉकडाऊन संपल्यानंतर बहुपर्यायी प्रश्न (एमसीक्यू) देऊन परीक्षा घेण्यासह इतर काही पर्याय पुढे आले आहेत. मात्र, त्यावर अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या. परंतु, लॉकडाऊन व जमावबंदी हटवल्यानंतर परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. त्यामुळे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सर्व कुलगुरूंची ऑनलाईन पद्धतीने बैठक घेतली होती. तसेच राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनीसुद्धा कुलगुरूंची बैठक घेऊन एक समिती स्थापन केली. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी ५५० प्राचार्यांशी ऑनलाईन पद्धतीने चर्चा केली. त्यात परीक्षांचे स्वरूप बदलण्याबाबत प्राचार्यांची मते जाणून घेतली. त्यात प्रथम व द्वितीय वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा एमसीक्यू प्रश्न देऊन घ्याव्यात. परंतु, तृतीय वर्षाच्या परीक्षा पूर्वीच्या आहे त्याच पद्धतीने घ्यावात, असे मत काही प्राचार्यांनी मांडले. त्यामुळे परीक्षेचे स्वरूप बदलणार असले तरी ते कसे असेल; याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही, असे या चर्चेतून समोर आले.

> सर्वच विद्यार्थ्यांच्या नेहमीसारख्या परीक्षा घेऊन त्यांचा निकाल लावणे शक्य नाही. त्यामुळे केवळ तृतीय वर्षाच्या व पदव्युत्तर पदवीच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षा नेहमीप्रमाणे घ्याव्यात इतर परीक्षांच्या स्वरुपात बदल करावा, अशी चर्चा या बैठकीत झाली. परंतु, लॉकडाऊन केव्हा उठवले जाणार यावरच परीक्षा कशा घ्याव्यात हे ठरवता येईल. त्यामुळे परीक्षांबाबत केवळ चर्चा झाली. अद्याप अंतिम निर्णय झाला नाही.
>
> **- डॉ. व्ही. गायकवाड, प्राचार्य,**
> के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक

> विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी प्राचार्यांशी संवाद साधून परीक्षा कोणत्या पद्धतीने घेता येईल, याचा आढावा घेतला. लॉकडाऊन केव्हा उठविणार त्यानंतर परीक्षा घेता येईल, या बाबतचे चित्र स्पष्ट होईल.
>
> **- डॉ. के. सी. मोहिते,**
> प्राचार्य, सी.टी.बोरा कॉलेज, शिरूर

> विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.नितीन करमळकर यांनी ऑनलाईन पद्धतीने घेतलेल्या बैठकीत माझ्यासह अनेक प्राचार्यांनी सहभाग घेतला. त्यात प्रात्यक्षिक परीक्षा महाविद्यालयाच्या वरिष्ठ प्राध्यापकाच्या नियंत्रणाखाली घेण्याबाबत भूमिका मांडण्यात आली. विद्यार्थ्यांना होम असाईन्मेंट देण्यात याव्यात. तसेच त्यातही २५ टक्के इंटरनल व २५ टक्के एक्सटर्नल याचा विचार करावा. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना मानसिक आधाराची गरज असून त्यावरही उपाय करणे गरजेचे असल्याचे या बैठकीतून समोर आले.
>
> **- डॉ. दिलीप शेठ**, प्राचार्य, स.प.महाविद्यालय

**Lokmat: 12.4.2020**

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

लोकमत

## एम.फिल., पीएचडीची मौखिक परीक्षा ऑनलाइन घेण्याचे यूजीसीचे निर्देश

राहुल शिंदे।
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व विद्यापीठांनी एम.फिल., पीएच.डी, च्या विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षा (व्हायवा) ऑनलाईन पद्धतीने घ्याव्यात, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील सर्व विद्यापीठांना दिले आहेत. त्यामुळे संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कोरोनामुळे नुकसान होणार नाही.

कोरोनाने जगभर थैमान घातले आहे. त्यामुळे विद्यापीठांना, महाविद्यालयांना सुटी देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना घरी बसूनच आपल्या विषयाचा अभ्यास करावा लगत आहे. कोरोनाचा फैलाव होऊ नये, यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. तसेच महाविद्यालय व विद्यापीठांकडून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले जात आहे. परंतु, संशोधन करणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी आपले शोधप्रबंध विद्यापीठाकडे जमा केले आहेत. तसेच लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर काही विद्यार्थी आपली संशोधन प्रक्रिया पूर्ण करणार आहेत. त्यांना एम. फिल., पीएच.डी.पदवी मिळण्यास अडचण येण्याची शक्यता विचारात घेऊन यूजीसीने याबाबत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार विद्यापीठांना ऑनलाईन 'व्हायवा' घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच शोधप्रबंध जमा केल्यानंतर सहा महिन्यांच्या आत विद्यार्थ्याला सर्व प्रक्रिया पूर्ण करुन पदवी देण्याची व्यवस्था करावी, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे. विद्यापीठांनी झूम, गूगल क्लास रुम आदी ऑनलाईन माध्यमांचा उपयोग करावा, असेही यूजीसीने म्हटले आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध विभागांत या पूर्वी ऑनलाईन व्हायवा घेण्यात आल्या आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर एका वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्याने गेल्या महिन्यात परदेशातून पीएच.डी.ची मौखिक परीक्षा दिली होती. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला ऑनलाईन व्हायवा घेण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

Pune Main
Page No. 1 Apr 12, 2020
Powered by: erelego.com

## परीक्षा शुल्क माफ करण्याची मागणी

**पुणे** : लॉकडाउनच्या काळात परीक्षांसंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आहे. त्याचप्रमाणे लॉकडाउनमुळे अनेकांची आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली आहे. त्यामुळे राज्यातील सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.

करोनाच्या पार्श्वभूमीवर देशभरासह राज्यातही लॉकडाउन घोषित करण्यात आला आहे. या काळात 'अभाविप'च्या वतीने राज्यातील विद्यार्थी आणि नागरिकांना मदत करण्यात येत आहे. जीवनावश्यक वस्तू, रक्तदान शिबिरे, नागरिकांना; तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या सोडवण्याच्या हेतूने सर्व जिल्हा स्तरावर हेल्पलाइन सुविधा सुरू करण्यात आली आहे. त्याच दरम्यान, राज्यातील सर्व विद्यार्थ्यांमध्ये परीक्षांसदर्भात संभ्रमावस्था असल्याचे दिसून आले आहे. अनेक विद्यापीठे आणि महाविद्यालये परीक्षा अर्ज भरून घेत आहेत. त्याच वेळी विद्यार्थ्यांना शुल्क भरण्याचा आग्रह करत आहेत, असा आरोप 'अभाविप'चे प्रदेश महामंत्री स्वप्नील बेगडे यांनी केला आहे. राज्यात अनेक कुटुंबांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. त्यामुळे सरसकट परीक्षा शुल्क माफ करावे, अशी मागणी 'अभाविप'च्या वतीने बेगडे यांनी मुख्यमंत्री ठाकरे यांच्याकडे केली आहे.

Maharashtra Times: 12.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

### HRD Ministry asked to roll out single education platform

RITIKA CHOPRA
NEW DELHI, APRIL 11

WITH SCHOOLS and universities staring at a more protracted shutdown to contain the spread of COVID-19, Prime Minister Narendra Modi has asked the HRD Ministry to roll out a common learning platform for students of Class I up to postgraduation, *The Sunday Express* has learned.

According to ministry sources, schools and higher education institutions are likely to remain closed until June end. India had announced a countrywide classroom shutdown on March 16 as one of the measures to contain the outbreak. Chief Ministers of most states who attended a meeting with the Prime Minister on Saturday were in favour of extending the nationwide lockdown beyond April 14. According to sources, whenever the lockdown is lifted, it will be done in phases, and educational institutions will be among the last to reopen. Hence, online learning will replace brick-and-mortar classes for a couple of months at least. The HRD Ministry has a week to launch the platform.

"All higher education institutions have been asked to consult stakeholders and pitch in their ideas. Meetings to discuss these ideas will be held starting Monday," said a ministry official, who did not wish to be identified. It's against the backdrop of the PM's order that the HRD Ministry on Friday sought public feedback on ways to make online learning more effective.

Currently, there is an institutional push for online learning during the shutdown, but the government's resource are scattered across different platforms such as Swayam (India's MOOC platform), Swayam Prabha (DTH educational channels) and National Digital Library, among others.

"The outbreak had led to a novel experiment in the largest online learning exercise ever...we will have to keep a lot of things in mind since not all students can access online resources," said the director of an IISER.

**Indian Express: 12.4.2020**

### विद्यार्थी भारतीतर्फे सामंत यांचा निषेध

#### परीक्षा न घेता उत्तीर्ण करण्याची मागणी

मुंबई, ता. ११ (बातमीदार) : कोरोनाचे संकट दिवसेंदिवस वाढत असताना शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या कोणत्याही परिस्थितीत परीक्षा होणारच, या वक्तव्याचा विद्यार्थी भारतीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे निषेध व्यक्त केला आहे.

तसेच कोरोनाचे संकट लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या परीक्षा रद्द करण्यात याव्यात व सरसकट सर्वच विद्यार्थ्यांना पास करण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

सध्या विद्यार्थी खूपच तणावाखाली आहेत. लॉकडाउनमुळे काही गरीब विद्यार्थ्यांच्या घरात खायला मिळेलच याची शाश्वती नाही. अनेक विद्यार्थ्यांचा जगण्याचा संघर्ष चालू असल्याचे विद्यार्थी भारतीच्या राज्य अध्यक्षा मंजिरी धुरी यांनी सांगितले.

तसेच काही महाविद्यालयांत ऑनलाईन परीक्षा राबवण्याचा प्रयत्न सुरू आहे, परंतु ज्या विद्यार्थ्यांकडे इंटरनेटची सोय नाही, ते विद्यार्थी यापासून मुकले जातील. त्यामुळे मागील गुणपत्रिकेच्या आधारे विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करावे, असे राज्य कार्यवाह श्रेया निकाळजे म्हणाल्या. परीक्षा रद्द करण्याची मागणी ईमेलच्या माध्यमातून राज्यपाल, मुख्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू यांच्याकडे केली असल्याचे विद्यार्थी राज्य संघटक शुभम राऊत यांनी सांगितले.

### ऑनलाइन परीक्षेऐवजी अन्य पर्यायांचा विचार

#### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांची माहिती

**पुणे, ता. ११ : 'कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी राज्य सरकारने लॉकडाऊन वाढविला असल्याने विद्यापीठाच्या प्रलंबित परीक्षांचे नियोजन करताना कमी वेळात अधिक प्रभावीपणे परीक्षा कशा घेता येतील, असा विचार करण्यात येईल. ऑनलाईन परीक्षा घेण्याचा पर्याय सोईस्कर आहे. परंतु, सरसकट सर्वत्र हा पर्याय वापरणे शक्य होणार नाही. त्यामुळे परीक्षा पद्धतीसाठी विविध पर्याय विचारात घेतले जात आहेत,' अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.**

**या पर्यायांचा होतोय विचार**

- ऑनलाइन परीक्षा
- एक-एका तासाची ऑफलाइन परीक्षा
- स्काईपद्वारे
- प्रकल्प सादरीकरण



विद्यापीठाच्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी कुलगुरू करमळकर यांनी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थांचे संचालक, अभ्यास मंडळाचे सदस्य यांची बैठक घेतली. या बैठकीत सध्याची परिस्थिती लक्षात घेता परीक्षा घेण्यासाठीच्या विविध पर्यायांवर विचार झाला. या संदर्भातील अंतिम अहवाल राज्याच्या उच्च शिक्षण विभागाकडे दोन दिवसांत सादर केला जाणार आहे. यापूर्वी १४ एप्रिलपर्यंत लॉकडाऊन जाहीर झाला होता. तो रद्द झाला असता तर, मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून परीक्षा घेण्याचे नियोजन केले असते. मात्र, आता लॉकडाऊनचा कालावधी वाढविला आहे. त्यानुसार ३० एप्रिलनंतर लॉकडाऊन रद्द झाल्यास त्यानंतर काही दिवसांनी परीक्षा घेण्यात येतील", असे डॉ. करमळकर यांनी नमूद केले.

**"परीक्षा कधी घ्यायच्या, कशा पद्धतीने घ्यायच्या याबाबत सर्वच विद्यापीठांपुढे प्रश्नचिन्ह आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे याबाबत घेतलेल्या बैठकीचा अहवाल तयार केला जात आहे. हा अहवाल राज्य सरकारला सादर केला जाईल. जेणेकरून इतर विद्यापीठांनाही हे नियोजन मार्गदर्शक ठरेल. परंतु, सध्या लॉकडाऊन वाढल्याने प्रत्यक्षात परीक्षेसाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने देखील परीक्षा कशा पद्धतीने घ्याव्यात यावर विचार करण्यासाठी समिती नेमली आहे. या समितीच्या अहवालातून विद्यापीठांना मार्गदर्शक सूचना मिळतील.**

**- डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

## विद्यापीठ परीक्षांच्या नियोजनाबाबत हालचालींना वेग



**कुलगुरूंच्या प्राचार्य, संस्थाचालक, अभ्यास मंडळ सदस्यांना सूचना**

**करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर विविध शक्यतांवर विचार**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ११ -** करोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांनी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थांचे संचालक, अभ्यास मंडळाचे सदस्य यांची बैठक घेतली. त्यात सध्याच्या लॉकडाऊनबाबत विविध शक्यता गृहित धरून नियोजन करण्यात आले आणि सर्वांना सूचना देण्यात आल्या. ही बैठक 'झूम'द्वारे घेण्यात आली.

करोना विषाणूच्या संसर्गामुळे संपूर्ण राज्यात १४ एप्रिलपर्यंत लॉकडाऊन जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा होऊ शकल्या नाहीत. १४ एप्रिलनंतर सरकारकडून काय निर्णय जाहीर केला जातो, याबाबतही नेमकेपणाने काही सांगता येत नाही. या अनिश्चिततेच्या परिस्थितीत पुढचे नियोजन कसे करायचे, याबाबत कुलगुरू प्रा. करमळकर यांनी झूम या सुविधेद्वारे बैठक घेतली. गुरुवारी नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील संबंधितांशी संवाद साधला, तर शुक्रवारी पुण्यातील प्राचार्य, संस्थांचे संचालक यांची अशाच प्रकारे झूमद्वारे बैठक घेण्यात आली. या बैठकीत लॉकडाउन कालावधीबाबत विविध शक्यता गृहित धरून प्रा. करमळकर यांनी संबंधितांना सूचना केल्या. यावेळी उपस्थित प्राचार्य, संस्थांचे संचालक व अभ्यास मंडळाच्या सदस्यांनी विविध पर्यायही सुचवले.

परीक्षा रखडण्याची समस्या सर्वच विद्यापीठांसमोर आहे. त्यामुळे परीक्षा कधी घ्यायच्या, कशा पद्धतीने घ्यायच्या याबाबत सर्वच विद्यापीठांपुढे प्रश्नचिन्ह आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने याबाबत घेतलेल्या बैठकीतून ठरलेल्या नियोजनाचा अहवाल तयार केला जाईल. हा अहवाल राज्य सरकारला सादर केला जाणार आहे, जेणेकरून इतर विद्यापीठांनाही हे नियोजन मार्गदर्शक ठरेल, अशी माहिती प्रा. करमळकर यांनी दिली.

**Prabhat: 12.4.2020**

## प्रथम, द्वितीय वर्षासाठी एमसीक्यू परीक्षांचा पर्याय

### प्राचार्यांशी चर्चा । अद्याप अंतिम निर्णय नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे : महाविद्यालयीन** विद्यार्थ्यांच्या परीक्षांबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विविध पर्यायांचा विचार केला जात असून, त्याबाबत पणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांमधील महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कल्पना देण्यात आली आहे. लॉकडाऊन संपल्यानंतर बहुपर्यायी प्रश्न (एमसीक्यू) देऊन परीक्षा घेण्यासह इतर काही पर्याय पुढे आले आहेत. मात्र, त्यावर अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या. परंतु, लॉकडाऊन व जमावबंदी हटवल्यानंतर परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. त्यामुळे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सर्व कुलगुरूंची ऑनलाईन पद्धतीने बैठक घेतली होती. तसेच राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनीसुद्धा कुलगुरूंची बैठक घेऊन एक समिती स्थापन केली. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी ५५० प्राचार्यांशी ऑनलाईन पद्धतीने चर्चा केली. त्यात परीक्षांचे स्वरुप बदलण्याबाबत प्राचार्यांची मते जाणून घेतली. त्यात प्रथम व द्वितीय वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा एमसीक्यू प्रश्न देऊन घ्याव्यात. परंतु, तृतीय वर्षाच्या परीक्षा पूर्वीच्या आहे त्याच पद्धतीने घ्यावात, असे मत काही प्राचार्यांनी मांडले. त्यामुळे परीक्षेचे स्वरुप बदलणार असले तरी ते कसे असेल; याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही, असे या चर्चेतून समोर आले.

> सर्वच विद्यार्थ्यांच्या नेहमीसारख्या परीक्षा घेऊन त्यांचा निकाल लावणे शक्य नाही. त्यामुळे केवळ तृतीय वर्षाच्या व पदव्युत्तर पदवीच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षा नेहमीप्रमाणे घ्याव्यात इतर परीक्षांच्या स्वरुपात बदल करावा, अशी चर्चा या बैठकीत झाली. परंतु, लॉकडाऊन केव्हा उठवले जाणार यावरच परीक्षा कशा घ्याव्यात हे ठरवता येईल. त्यामुळे परीक्षांबाबत केवळ चर्चा झाली. अद्याप अंतिम निर्णय झाला नाही.
>
> **- डॉ. व्ही. गायकवाड,** प्राचार्य, के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक

> विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी प्राचार्यांशी संवाद साधून परीक्षा कोणत्या पद्धतीने घेता येईल, याचा आढावा घेतला. लॉकडाऊन केव्हा उठविणार त्यानंतर परीक्षा घेता येईल, या बाबतचे चित्र स्पष्ट होईल.
>
> **- डॉ. के. सी. मोहिते,** प्राचार्य, सी.टी.बोरा कॉलेज, शिरूर

> विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.नितीन करमळकर यांनी ऑनलाईन पद्धतीने घेतलेल्या बैठकीत माझ्यासह अनेक प्राचार्यांनी सहभाग घेतला. त्यात प्रात्यक्षिक परीक्षा महाविद्यालयाच्या वरिष्ठ प्राध्यापकाच्या नियंत्रणाखाली घेण्याबाबत भूमिका मांडण्यात आली. विद्यार्थ्यांना होम असाईन्मेंट देण्यात याव्यात. तसेच त्यातही २५ टक्के इंटरनल व २५ टक्के एक्सटर्नल याचा विचार करावा. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना मानसिक आधाराची गरज असून त्यावरही उपाय करणे गरजेचे असल्याचे या बैठकीतून समोर आले.
>
> **- डॉ. दिलीप शेठ,** प्राचार्य, स.प.महाविद्यालय

**Lokmat: 12.4.2020**

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# SPPU explores online exams with 70% multiple choice questions

Swati Shinde Gole
@timesgroup.com

**Pune:** Savitribai Phule Pune University (SPPU) authorities are exploring the option of online examinations for its graduate and postgraduate students on the basis of 70% multiple choice questions, while the remaining 30% would be internal marks.

At a recent meeting held through video conferencing with heads of colleges affiliated to SPPU, university vice-chancellor Nitin Karmalkar overruled any promotion of students without examinations because of the lockdown in the wake of the Covid-19 outbreak.

A college head said the probability of online exams was explored during the meeting and the proposal for multiple choice questions (MCQ) was submitted to the state government. He said the meeting emphasized that the new term in colleges should start from July 1-7.

When contacted on Wednesday, Karmalkar refused to comment on the MCQ pattern for the exams. He told **TOI** that the university was awaiting the University Grants Commission's guidelines that were expected within three-four days.

Sir Parshurambhau College principal Dilip Sheth said the MCQ pattern has never been used in college and university exams. "All exams conducted by the university are of traditional methods, such as descriptive and one line answers and fill-in-the-blank format. After our college attained autonomy this year, we introduced 20 marks MCQs for first-year," he said.

University officials said students, particularly in remote areas, unable to write the online exams due to poor connectivity would have to appear for the papers after the lockdown exit. The officials said the exams would be conducted following the state's approva and held in SPPU's all three divisions — Pune, Nashik and Ahmednaga.

SPPU controller of examination, Mahesh Kakade said, "The governor appointed committee, headed by the SPPU vice-chancellor, will decide how to conduct the examinations."

File photo



The meeting also emphasized that the new term should start from July 1-7

Times of India: 16.4.2020

लोकमत

# एमसीए सीईटी परीक्षा स्थगित

## ३० एप्रिलला होती परीक्षा : लॉकडाऊनमुळे सीईटी सेलचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** देशातील वाढवलेल्या लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर ३० एप्रिल २०२० रोजी घोषित करण्यात आलेली एमसीए सीईटी पुन्हा पुढे ढकलण्याचा निर्णय राज्याच्या सीईटी सेलकडून घेण्यात आला आहे. त्यासंदर्भातील सूचना सीईटी सेलच्या संकेतस्थळावर देण्यात आली असून पुढील सुधारित तारखेसाठी विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर लक्ष ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सीईटी परिक्षेच्या वेळी परीक्षा केंद्रावर मोठ्या प्रमाणात गर्दी होऊ शकते म्हणून २८ मार्च रोजी होणारी एमसीए सीईटी पुढे ढकलण्याचा आणि ३० एप्रिल रोजी घेण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबत विद्यार्थ्यांनी काळजी करु नये, त्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही अशी प्रतिक्रिया उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. मात्र लॉकडाऊन कालावधी वाढवून तो ३ मे करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत सीईटी परीक्षा घेणे शक्य नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

### सीईटीच्या नोंदणीला मुदतवाढ द्यावी

इंजिनीअरिंग, फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी होणारी एमएचटी - सीईटी पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही परीक्षा मे महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. सध्या सीईटी परीक्षा पुढे ढकलल्याने ही परीक्षा देण्यासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना नोंदणी करण्याची संधी मिळावी, अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.

Pune Main
Page No. 7 Apr 16, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

### ‘भारत पढे ऑनलाइन’ मोहिमेसाठी सूचना पाठवण्याचे आवाहन

**पुणे :** संचारबंदीमुळे शैक्षणिक प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने कार्यरत असताना आता केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने ऑनलाइन शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी भारत पढे ऑनलाइन ही मोहीम सुरू केली आहे. भारतातील ऑनलाइन शिक्षणाचा प्रचार, प्रसार, वापर कशा पद्धतीने वाढवता येईल, याबाबतच्या सूचना मागवण्यात आल्या आहेत.

करोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी देशात अभूतपूर्व अशी संचारबंदी लागू करण्यात आली. त्यामुळे शाळा, महाविद्यालयांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या. शैक्षणिक कामकाज थांबले. मात्र, त्यावर पर्याय म्हणून ऑनलाइन पद्धतीने अध्यापन-अध्ययन सुरू झाले. झूम, गुगल क्लासरूम, स्काईप अशी विविध व्यासपीठे वापर शिक्षण प्रक्रिया नियमित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, अडचणीतून निर्माण झालेला ऑनलाइन शिक्षणाचा प्रयोग आता सातत्याने आणि कायमस्वरूपी राबवण्याची केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाची कल्पना आहे. त्यासाठी भारत पढे ऑनलाइन मोहीम हाती घेतली आहे. शिक्षण क्षेत्रातील घटकांकडून त्यांच्या कल्पना, सूचना १६ एप्रिलपर्यंत मागवण्यात आल्या आहेत. या सूचना, कल्पना tbharatpadheonline.mhrd@gmail.com. या ईमेलवर पाठवता येतील, असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डी. पी. सिंग यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता Thu, 16 https://

### ऑनलाइन स्वयम् अभ्यासक्रमांची कक्षा रुंदावण्याचे नियोजन

#### यूजीसीकडून तज्ज्ञांची समिती नियुक्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** स्वयम् संकेतस्थळावरील विविध ऑनलाइन अभ्यासक्रमांची कक्षा रुंदावण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) तज्ज्ञांची समिती नियुक्त केली आहे. स्वयम्चे पदवी अभ्यासक्रम तयार करणे, उदयोन्मुख क्षेत्रातील अभ्यासक्रम विकसित करण्यासह स्वयम् अभ्यासक्रमांचे श्रेयांक विद्यापीठांनी स्वीकारणे बंधनकारक करणे, सध्या असलेली २० श्रेयांक गुणांची मर्यादा वाढवण्यासाठीच्या नियमांत बदल करणे अशा विविध मुद्द्यांवरील आपल्या शिफारसी या समितीकडून सादर केल्या जातील.

> “स्वयम् संकेतस्थळावरील अभ्यासक्रमांची गुणवत्ता वृद्धी करण्यासह काही नवे अभ्यासक्रम विकसित करण्याची आवश्यकता आहे. स्वयम्च्या माध्यमातून परीक्षा घेऊन त्याचे श्रेयांक गुण विद्यापीठांनी मान्य करणे याबाबतचा अभ्यास समिती करणार आहे.
>
> – डॉ. नितीन करमळकर, समिती सदस्य

करोना विषाणू संसर्गामुळे लागू कराव्या लागलेल्या संचारबंदीमुळे शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक बदल होऊ घातले आहेत. ऑनलाइन अभ्यासक्रम शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे ठरत आहेत. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने विकसित केलेल्या स्वयम् या संकेतस्थळावरील अभ्यासक्रम कोणालाही करता येतात. विशेषतः विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीचे स्वयम्मधील अभ्यासक्रम पूर्ण केल्यास त्यांना श्रेयांक गुण प्रदान केले जातात. या पार्श्वभूमीवर संचारबंदीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता स्वयम् अभ्यासक्रमांच्या अद्ययावतीकरणासह काही महत्त्वपूर्ण बदल अपेक्षित आहेत.

लोकसत्ता Thu, 16 April 2020 https://epaper.loksatta.com/c/51002131

### दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना निकाल लांबण्याचे टेन्शन

#### लॉकडाऊननंतरच शिक्षकांकडे उत्तरपत्रिका तपासणीसाठी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १५ -** राज्यात करोनाचा प्रादुर्भाव वाढत चालल्याने लॉकडाऊन ३ मे पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. हा लॉकडाऊन उठल्यावरच इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका शिक्षकांना तपासणीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याबाबतचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने जारी केला आहे.

राज्यातील विविध ठिकाणी करोना विषाणूचा प्रभाव गेल्या महिन्यापासून वाढतोच आहे. त्यामुळे शासनाने आधी संचारबंदी लागू केली. त्यानंतर १४ एप्रिल पर्यंत लॉकडाऊन करण्यात आले. त्यानंतर त्यात आता पुन्हा वाढ करण्यात आली आहे. गेल्या महिन्यापासून शाळा व महाविद्यालयेही बंद ठेवण्यात आली आहेत. शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव राजेंद्र पवार यांनी नुकतेच नवीन आदेशाचे पत्र जारी केले आहे. हे पत्र शिक्षण आयुक्त, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक,



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अध्यक्ष यांना पाठविले आहे.

दहावी व बारावीच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका घरी बसून तपासणीस पूर्वीच परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र, काही विषयाच्या उत्तरपत्रिका या शाळांच्या कस्टडीत, मॉडरेटरकडेच पडून आहेत. तसेच तपासलेल्या उत्तरपत्रिका विभागीय शिक्षण मंडळाकडे सबमिशन करण्यातही अडचणी येत आहेत. शिक्षकांना घराबाहेर पडणे अवघड झाले आहे. त्यामुळे उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज वेगाने होण्यात अडथळे निर्माण झाले आहेत ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यामुळे लॉकडाऊन संपल्यावरच शिक्षकांना उत्तरपत्रिका तपासणीसाठी देण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. तर, दहावीचा भूगोल व कार्यशिक्षण या विषयाचीही परीक्षा रद्द करण्यात आली आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या प्रचलित व विहित कार्यपद्धती नुसार या दहावीच्या रद्द झालेल्या विषयी गुण देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. २०१९-२० या चालू शैक्षणिक वर्षात १४ एप्रिल नंतर ही पुन्हा शाळा सुरु करण्यात येऊ नयेत, असे उपसचिव पवार यांनी पत्रात नमूद केले आहे.

**९वी व ११वीचे विद्यार्थी पुढच्या वर्गात...**

इयत्ता पहिली ते आठवीच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. इयत्ता नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या द्वितीय सत्राच्या परीक्षा न घेता प्रथम सत्र परीक्षेतील तसेच चाचण्या, प्रात्यक्षिक व अंतर्गत मुल्यमापनातील प्राप्त गुणांचा विचार करुन त्या आधारे विद्यार्थ्यांना वर्गोन्नती देण्यात येणार आहे.

प्रभात Thu, 16 April 2020 epaper.eprabhat.net/c/51002676

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# How to take care of your mental-health during the COVID-19 pandemic?

iStock

Saptaparna.Biswas@timesgroup.com

The rising cases, panic, information overload, fake messages etc are enough to overwhelm any individual. Realising the need, many psychologists and psychiatrists have come together to form online support groups for those seeking professional help. Celebs like Alia Bhatt, Richa Chadha, Sachin Tendulkar and more have come forth to address the issue. And the University Grants Commission (UGC) has directed universities and colleges to set up helplines to address psychosocial needs of students. Now, with the lockdown extended till May 3, the need to focus on mental health will be equally important to taking care of your physical wellbeing.





In a post on World Health Day a while ago, Richa Chadha (left) wrote, "Like so many people, I had been waking up with ANXIETY in the first week of this lockdown." She added, "I felt , I could tap into the energy of the universe and it was so heavy. So I made it a habit to get up and #meditate every day... and of course I am using comedy to alleviate stress all around... ! Today is #WorldHealthday and a lot of people will speak about #coronavirus , as they should... But this #lockdown, #socialdistancing, #selfisolating is not going to be easy for our #MENTALHEALTH" (sic).

### THE IMPORTANCE OF MENTAL WELLBEING DURING QUARANTINE

On the surface it may seem that a lot of people may be becoming more productive during lockdown, but experts point out that the feeling of isolation grows on you and has a detrimental effect on mental health. "The number of people showing signs of anxiety and panic has risen significantly. The fear of the uncertainty has created noticeable psychological impact on people," says psychiatrist Dr Srikant Reddy.

### SUPPORT COMES ONLINE

In such times, it can be helpful to reach out for support through and online platforms. According to Neerja Birla, founder and chairperson Mpower, an online mental health platform, they received over 2000 calls within the first five days of launching the platform. Dr Nyrnat Chadha, a psychologist from Mumbai who has been providing such support on social media through the page Let's Talk Mental Health, shares that the most prominent question that is creating anxiety is 'What if I test positive?' To this, Nagpur-based consultant psychiatrist Dr Abhishek Manmarde, who has been appointed by the government to counsel people in quarantine, says, "A lot of factors have mentally isolated people, including loss of wages, misinformation, over-information and more. So, I keep recommending everyone to be socially online." In Nagpur, a social media group, MOTG_Go Corona, has a few counsellors who are available to consult at any time of the day.

**IT IS REALLY IMPORTANT TO THINK ABOUT MENTAL HEALTH AS PART OF THE PUBLIC HEALTH RESPONSE TO COVID-19**

— Alysha Malik, Technical officer Mental Health and Substance Use Department, WHO

### GET YOUR FACTS RIGHT

The counsellors believe that psychosocial support can help relieve stress from people's minds. Dr Manmarde adds, "Post Traumatic Stress Disorder (PTSD) and Obsessive Compulsive Disorder (OCD) are commonly diagnosed among those who have an unpleasant time while in quarantine. Alleviating their stressors by listening and providing them right information may reduce such instances."

—With inputs from Preeti.Atulkar@timesgroup.com

sachintendulkar




Sachin Tendulkar shared the mental health helpline number

### PSYCHOSOCIAL SUPPORT HELPLINES IN INDIA

- NIMHANS: 08046110007
- Mpower, in collaboration with the Maharshtra govt: 18001202050
- Wellbeing Volunteer United: 18001210980

### STRESSORS IN TIMES OF THE COVID-19 PANDEMIC

- Misinformation and information overload
- Lack of transparency during quarantine
- Social isolation
- Guilt of being a possible cause of infection for other
- Getting stigmatised on the basis of ethnicity, travel history or symptoms

### POINTERS TO STAY MENTALLY HEALTHY DURING PANDEMIC

- Stay connected through chats, video calls
- Join virtual reading, cooking or other clubs
- Avoid watching continuous news cycles
- Seek professional help, if needed
- Focus on the positives, like recovered cases

Times of India: 16.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

Lokmat: 17.4.2020

### राज्यपाल नियुक्त समितीही यूजीसीच्या नियमावलीच्या प्रतीक्षेत

## यूजीसी देणार महाविद्यालयीन परीक्षांबाबत निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. मात्र या परीक्षांबाबत सोशल मीडियावर उलट-सुलट चर्चा केली जात आहे. परंतु, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) समितीकडून यासंदर्भात अभ्यास केला जात असून, या समितीने दिलेल्या अहवालानंतर यूजीसीकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार सर्व परीक्षा घेतल्या जाणार आहेत.

कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी देशातील शाळा, महाविद्यालयांना व विद्यापीठांना सुट्टी दिली असून, पहिली ते अकरावीपर्यंतच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षा कोणत्या पद्धतीने व कशा घ्याव्यात, यावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. परंतु, विद्यापीठ व महाविद्यालयांच्या परीक्षा कशा घ्याव्यात, याबाबत अहवाल देण्यासाठी राज्यपालांच्या सूचनेनुसार मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमाळकर, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरु शशिकला वंजारी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कुलगुरु देवानंद शिंदे, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने यांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीने ऑनलाइन परीक्षा घेण्याबाबत अहवाल दिल्याची अफवा सोशल मीडियावर पसरली आहे. परंतु, अद्याप या समितीने असा कोणताही अहवाल तयार केलेला नाही. तसेच यूजीसीकडून पुढील काळात परीक्षा कशा घ्याव्यात, याबाबतचे निर्देश प्राप्त होणार असल्याने या समितीने आपले काम काही कालावधीसाठी थांबवले असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले आहे.

परिणामी महविद्यालयीन परीक्षा विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार किंवा एखाद्या समितीच्या अहवालानुसार होणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन विद्यापीठातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने केले आहे.

### ऑनलाइन परीक्षेचा विचार नको : अडसूळ

- विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षेचा विचार करु नये, असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. अरुण अडसूळ यांनी केले आहे. कारण ऑनलाइन परीक्षा घेण्यास विद्यापीठाकडे पायाभूत सुविधा उपलब्ध नाही. तसेच ऑनलाइन परीक्षेसाठी आपला अभ्यासक्रम पूरक नाही. एक वेळ राज्यपाल किंवा शासन आदेशानुसार काही तडजोड करुन परीक्षा घेणे शक्य आहे. परंतु, ऑनलाइन परीक्षा योग्य नाही, असेही अडसूळ म्हणाले.




### शैक्षणिक वर्ष केव्हापासून यावर चर्चा

- राज्यपाल नियुक्त समितीने दिलेला अहवाल आणि यूजीसीकडून परीक्षेबाबत प्राप्त होणाऱ्या सूचना यात विरोधाभास निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे यूजीसीकडून प्राप्त होणाऱ्या नियमावलीनुसारच परीक्षा घेतल्या जाणार आहेत. तसेच, पुढील शैक्षणिक वर्ष केव्हा सुरु केले पाहिजे, यावरही यूजीसी काम करत आहे, असेही सूत्रांनी सांगितले.

---

### प्राचार्य महासंघ : परीक्षेच्या माहितीसाठी महाविद्यालयांशी साधा संपर्क

## विद्यार्थ्यांनो गोंधळून जाऊ नका

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे:** महाविद्यालयीन परीक्षा ऑनलाइन घेतल्या जातील, बहुपर्यायी प्रश्नांवर (एमसीक्यू) घेतल्या जातील, अशा कोणत्याही गोष्टींवर विद्यार्थ्यांनी विश्वास ठेवू नये, तसेच गोंधळून जाऊ नये, परीक्षेबाबतच्या माहितीसाठी महाविद्यालयांची संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य महासंघातर्फे करण्यात आले आहे.

प्राचार्य महासंघाच्या वतीने पुणे, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, गडचिरोली, नागपूर, जळगाव, मुंबई आदी जिल्ह्यांसह कोकण, मराठवाडा व विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमधील प्राचार्यांची बैठक गुरुवारी 'झूम' ॲप द्वारे घेण्यात आली. त्यात १०० हून अधिक महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सहभाग नोंदवला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व प्राचार्य डॉ. संजय चाकणे,डॉ. सुधाकर जाधवर, प्राचार्य महासंघाचे प्रा. नंदकुमार निकम, ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. अरुण अडसूळ यांनी या चर्चेमध्ये मनोगत व्यक्त केले.परीक्षांबरोबरच काही प्रशासकीय बाबींवर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

> प्रत्येक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर परीक्षा विभागातील प्राध्यापकांचे दूरध्वनी क्रमांक प्रसिद्ध केले जाणार आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षेसंदभार्तील माहितीसाठी महाविद्यालयाशी संपर्क साधावा. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.
>
> - डॉ.संजय चाकणे, व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना परीक्षा न घेता पुढील वर्गात प्रवेश देणे संयुत्तिक होणार नाही. त्यामुळे लॉकडाऊन संपल्यानंतर विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन त्यांचा निकाल जाहीर करावा.शैक्षणिक वर्ष काही दिवस उशिरा सुरु झाले. तरी खूप मोठा फरक पडणार नाही .
>
> - डॉ.अरुण अडसूळ, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

> राज्यातील विद्यापीठांचा अभ्यासक्रम आणि शिकवण्याची पद्धती ऑनलाइन परीक्षेची सुसंगत नाही.तसेच महाविद्यालयांना ऑनलाइन परीक्षा घेणे शक्य नाही. विद्यार्थ्यांनी त्यासाठी आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांची संपर्क साधावा. तसेच महाविद्यालयातील महत्त्वाच्या कामासाठी प्राचार्य आणि काही कर्मचाऱ्यांना जिल्हा प्रशासनाने पास देण्याची गरज आहे.
>
> - प्रा. नंदकुमार निकम, प्राचार्य महासंघ.

Lokmat: 17.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

### यूजीसीच्या शिफारशींनंतर परीक्षांचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : विद्यापीठ परीक्षांबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) केंद्र शासनाला शिफारशी सादर केल्यानंतर त्या शिफारशी आणि राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशी यांच्या आधारे राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षांबाबतचा निर्णय घेतला जाणार आहे. तसेच पुढील शैक्षणिक वर्षाच्या नियोजनाबाबतही धोरण ठरवले जाणार आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी ही माहिती दिली. करोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी टाळेबंदी जाहीर झाल्यामुळे देशभरातील विद्यापीठांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. या परीक्षांबाबत निर्णय घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने समिती नेमली आहे. तसेच राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षांसंदर्भात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ (एसएनडीटी) या विद्यापीठांचे कुलगुरू, उच्च शिक्षण संचालक आणि तंत्रशिक्षण संचालक यांची समिती नेमली आहे. ही समिती राज्य शासनाला परीक्षांसंदर्भातील अहवाल देणार आहे. अद्याप हा अहवाल शासनाला सादर करण्यात आलेला नाही. दरम्यान विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशी आणि राज्य शासनाने नेमलेली समिती यांच्या शिफारशींच्या आधारे परीक्षा आणि पुढील शैक्षणिक वर्षाच्या नियोजनाचा निर्णय घेतला जाईल.

लोकसत्ता Sat, 18 https://



### परीक्षेवरून गोंधळून जाऊ नका

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १७ - महाविद्यालयीन परीक्षा ऑनलाइन घेतल्या जातील, बहुपर्यायी प्रश्नांवर घेतल्या जातील, अशा कोणत्याही गोष्टींवर विद्यार्थ्यांनी विश्वास ठेवू नये तसेच गोंधळून जाऊ नये, परीक्षेबाबतच्या माहितीसाठी महाविद्यालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य महासंघाने विद्यार्थ्यांना केले आहे.

प्राचार्य महासंघाच्या वतीने पुणे, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, गडचिरोली, नागपूर जळगाव, मुंबई या जिल्ह्यांसह कोकण, मराठवाडा व विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमधील प्राचार्यांची बैठक गुरुवारी झूम ॲपद्वारे घेण्यात आली. यात १०० पेक्षा अधिक महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सहभाग नोंदवला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व प्राचार्य डॉ. संजय चाकणे डॉ. सुधाकर जाधवर, प्राचार्य महासंघाचे प्रा. नंदकुमार निकम, ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. अरुण अडसूळ यांनी या चर्चेमध्ये मनोगत व्यक्त केले. परीक्षांबरोबरच काही प्रशासकीय बाबींवर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

करोनाच्या पार्श्वभूमीवर देशातील व महाराष्ट्रातील विद्यापीठ व महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली आहेत, त्यामुळे सर्व परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या आहेत. मात्र, यूजीसी राज्य शासनाने

#### प्राचार्य महासंघाचे विद्यार्थ्यांना आवाहन

परीक्षेसंदर्भात निर्णय घेण्यासाठी समिती स्थापन केली आहे. या समितीचा अहवाल अद्याप तयार झालेला नाही. मात्र, तरीही महाविद्यालयीन परीक्षे संदर्भात सोशल मीडियावर अफवा पसरल्या आहेत; परंतु विद्यार्थ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता परीक्षेच्या माहितीसाठी महाविद्यालयातील परीक्षा विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

“ प्रत्येक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर परीक्षा विभागातील प्राध्यापकांचे दूरध्वनी क्रमांक प्रसिद्ध केले जाणार आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षेसंदर्भातील माहितीसाठी महाविद्यालयाशी संपर्क साधावा. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.

- डॉ. संजय चाकणे, व्यवस्थापन परिषद सदस्य

प्रभात Sat, 18 April 2020 epaper.eprabhat.net/c/51065346

### पोलिसांकडून मिळणारा पास; निकाल लवकर लागण्याची शक्यता

# शिक्षकांना उत्तरपत्रिका घेऊन जाण्यास सवलत

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : इयत्ता दहावी बारावीच्या उत्तरपत्रिका शाळा व महाविद्यालयांमधून घरी घेऊन जाण्यासाठी शिक्षकांना संचारबंदी मधून विशेष सवलत देण्यात आली आहे. ऑनलाइन पास मिळवूण शिक्षकांना या उत्तरपत्रिका घरी घेऊन येता येणार आहेत. त्यामुळे इयत्ता दहावी-बारावीचा निकाल लवकर लागण्याची शक्यता निर्माण झाली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शाळा महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली. तसेच केंद्र व राज्य शासनातर्फे संचारबंदी लागू करण्यात आली.मात्र, यामुळे दहावी व बारावीच्या उत्तरपत्रिका शाळा-महाविद्यालयांमध्ये अडकून पडल्या. शिक्षकांना घरी उत्तरपत्रिका तपासण्याची सवलत देण्यात आली होती. परंतु, संचार बंदीमुळे या उत्तरपत्रिका घरी घेऊन जाणे शक्य होत नव्हते. त्यामुळे पुणे विभागीय राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने पोलीस प्रशासनाकडे याबाबत पत्रव्यवहार केला. इयत्ता दहावी बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणाऱ्या शिक्षकांना संचारबंदीतून विशेष सवलत मिळावी, असे पत्र पुणे विभागीय शिक्षण मंडळाचे सचिव बबन दहिफळे यांनी पोलिसांना दिले होते.

बबन दहिफळे म्हणाले, शाळांमधून उत्तरपत्रिका घेऊन जाण्यासाठी तसेच तपासलेल्या उत्तरपत्रिका मॉडरेटर कडे देण्यासाठी शिक्षकांनी पोलिसांकडून दिला जाणारा डिजिटल पास घ्यावा. त्यासाठी www.punepolice.in या संकेतस्थळावर जाऊन डिजिटल मास मिळण्याबाबतची आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी.

#### विद्यार्थ्यांच्या ८० टक्के उत्तरपत्रिका तपासल्या

“ पुणे विभागात इयत्ता बारावीचे सुमारे अडीच लाख विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांच्या सुमारे ८० टक्के उत्तरपत्रिका तपासून झाले आहेत. तर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे २ लाख ७५ हजार एवढी आहे. या विद्यार्थ्यांच्या ७० ते ८० टक्के उत्तरपत्रिका तपासून झाल्या आहेत. इतिहास विषय वगळता बहुतांश विषयाच्या उत्तरपत्रिका तपासण्याची प्रक्रिया पूर्ण होत आली आहे.

- बबन दहिफळे, सचिव, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभाग

Lokmat: 18.6.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

महाराष्ट्र टाइम्स । नाशिक । मंगळवार, १४ एप्रिल २०२०

### परीक्षा होणारच; पण स्वरूप बदलणार

#### यूजीसीतर्फे स्वतंत्र समितीची नियुक्ती

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

एप्रिल महिना परीक्षांचा काळ असला तरी, करोनाच्या सावटामुळे इतर विद्यापीठांसह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षांचे नियोजनच कोलमडले आहे. परीक्षा होणार की नाही येथपासून, परीक्षा झाल्या तर कशा पद्धतीने होतील, असे अनेक प्रश्न त्यामुळे विद्यार्थ्यांसमोर उभे राहिले आहेत. मात्र, परीक्षा होणार हे निश्चित असून लॉकडाऊननुसार परीक्षेचे स्वरुप बदलण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

करोनाचा फटका इतर सर्व क्षेत्रांप्रमाणेच शैक्षणिक क्षेत्रावरही मोठ्या प्रमाणात झाला आहे. शाळांपासून कॉलेज, विद्यापीठापर्यंत सर्वच नियोजन कोलमडले आहे. या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या मनात अनेक शंका निर्माण होत आहेत. त्यामुळे साहजिकच चर्चेलाही उधाण येत आहे. या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी पुणे, मुंबई, कोल्हापूर, एसएनडीटी विद्यापीठांच्या कुलगुरुंची समिती नियुक्त केली. तर परीक्षा कशा पद्धतीने घ्यायची यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वतंत्र समिती नियुक्त केली. तसेच प्राचार्यांशी चर्चा करण्यात आली.

यामध्ये परीक्षांचे स्वरुप बदलण्याबाबत विविध प्राचार्यांची मतेही जाणून घेण्यात आली. त्यानुसार लॉकडाऊनच्या कालावधीनुसार परीक्षेच्या स्वरुपात बदल करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे प्राचार्यांकडून सांगण्यात येत आहे. परीक्षेत ५० टक्के एमसीक्यू, २० टक्के एका वाक्यात उत्तरे व ३० टक्के गुण अंतर्गत मूल्यांकनावर आधारित असणार आहे. लॉकडाऊन १५ मेपर्यंत वाढवल्यास परीक्षा १०० टक्के एमसीक्यूनुसार घेण्यात येईल, असेही सांगण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे प्रोजेक्ट, प्रॅक्टिकल, याचे मूल्यांकन संस्थांच्या अंतर्गत व्यवस्थेकडून केली जाणार आहे.

Maharashtra Times: 19.4.2020

### 'यूजीसी'च्या आदेशानंतर परीक्षा

#### उच्च शिक्षण संचालनालयाची माहिती

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

देशातील विद्यापीठांच्या आणि महाविद्यालयांच्या परीक्षांबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) केंद्र सरकारला शिफारशी सादर केल्यानंतर त्या शिफारशी; तसेच राज्य सरकारने परीक्षांबाबत नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशी यांच्या आधारे राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षांबाबतचा निर्णय घेतला जाणार आहे. या सोबतच पुढील शैक्षणिक वर्षाच्या नियोजनाबाबतही धोरण ठरवले जाणार आहे, अशी माहिती उच्च शिक्षण संचालनालयाने दिली आहे.

करोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी लॉकडाउन जाहीर झाल्यामुळे देशभरातील विद्यापीठांच्या परीक्षा अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आल्या आहेत. या परीक्षांबाबत निर्णय घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने तज्ज्ञांची समिती नेमली आहे. यासोबतच राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षांसंदर्भात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ (एसएनडीटी) या विद्यापीठांचे कुलगुरू, उच्चशिक्षण संचालक आणि तंत्रशिक्षण संचालक यांची समिती नेमली आहे. ही समिती राज्य सरकारला परीक्षांसंदर्भातील अहवाल देणार आहे. दरम्यान, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशी आणि राज्य सरकारने नेमलेली समिती यांच्या शिफारशींच्या आधारे परीक्षा आणि पुढील शैक्षणिक वर्षाच्या नियोजनाचा निर्णय घेतला जाणार आहे, अशी माहिती उच्चशिक्षण संचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात दिली आहे.



#### यूजीसीची शिफारस महत्त्वाची

राज्य सरकारच्या समितीच्या अहवालाप्रमाणे परीक्षा घेण्याचा निर्णय झाल्यावर, यूजीसीचा परीक्षा घेण्याबाबतचा वेगळा निर्णय आल्यास परीक्षा पध्दतीबाबत तफावत निर्णय होऊ शकतो. याशिवाय यूजीसी ही शिखर संस्था असल्याने, त्या संस्थेचा निर्णय राज्य सरकारला बंधनकारक आहे. त्यामुळे यूजीसीची परीक्षांबाबतची नियमावली जाहीर झाल्यानंतर विद्यापीठांच्या परीक्षांचा मार्ग मोकळा होणार आहे.

Maharashtra Times: 21.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

### विद्यापीठ अनुदान आयोगाचे स्पष्टीकरण

## स्वत:च्याच शोधनिबंधातील मजकुराचा पुनर्वापर हे वाङ्मयचौर्यच!

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** प्रबंध किंवा शोधनिबंधात स्वतःच्याच पूर्वलिखित मजकुरातील भाग वापरणे किंवा शोधनिबंधातील मजकूर पुन्हा जसाच्या तसा वापरणेही वाङ्मयचौर्य म्हणून गृहीत धरण्यात येणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबत स्पष्टीकरण दिले आहे.

स्वतःच्या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधातील मजकूर नव्या निबंधात किंवा प्रबंधामध्ये वापरण्यावरून अनेक वाद विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमध्ये निर्माण झाले आहेत. एकापेक्षा अधिक प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या शोधनिबंधातील मजकुराचा अनेकांनी प्रबंधासाठी वापर करणे, जुन्या शोधनिबंधात जुजबी बदल करून नवे संशोधन असल्याचा दावा करणे अशा घटना संशोधन संस्थांमध्ये वारंवार समोर येतात. आपल्याच शोधनिबंधातील मजकुराचा पुनर्वापर वैध आहे की नाही यावरून सुरू असलेल्या वादांवर आता विद्यापीठ अनुदान आयोगाने काहीसा पडदा टाकला आहे. संशोधकाने त्याच्या शोधनिबंधातील मजकुराचा नव्या शोधनिबंधासाठी पुनर्वापर केला तर ते वाङ्मयचौर्य म्हणून ग्राह्य धरण्यात येईल असे आयोगाने स्पष्ट केले आहे. संदर्भ आणि श्रेय न देता मजकुराचा पुनर्वापर करण्यात आला असल्यास शोधनिबंध स्वीकारला जाणार नाही, असेही आयोगाने म्हटले आहे. त्याबाबत स्वतंत्र नियमावलीही तयार करण्यात येत आहे.



**स्ववाङ्मयाचे चौर्य कसे?**

- लेखकाने किंवा संशोधकाने पूर्वी लिहिलेला मजकूर पूर्ण किंवा त्यातील काही भाग नव्या शोधनिबंधासाठी वापरल्यास
- प्रकाशित झालेला शोधनिबंध दुसऱ्या संशोधनपत्रिकेत प्रकाशित केल्यास
- अभ्यासातील काही भाग स्वतंत्रपणे वापरून त्याला नव्या शोधनिबंधाचे स्वरूप देणे
- संदर्भ आणि श्रेय न देता मजकुराचा पुनर्वापर केल्यास

**स्वत:च्याच शोधनिबंधाचे श्रेयांक नाहीत**

शोधनिबंध प्रकाशित झाल्यानंतर त्याचा इतर संशोधक संदर्भासाठी किती वापर करतात त्यानुसार शोधनिबंधाचा उल्लेख निर्देश (सायटेशन इंडेक्स) ठरवला जातो. अधिक उल्लेख निर्देश असलेल्या शोधनिबंधासाठी अधिक श्रेयांक असतात. त्याचे अधिक महत्त्व असते. एखाद्या संशोधकाने त्याच्या शोधनिबंधाचा संदर्भ पुढील शोधनिबंधासाठी वापरल्यास त्याचे श्रेयांक ग्राह्य धरण्यात येणार नाहीत, असे आयोगाने स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता Wed, 22 April 2020
https://epaper.loksatta.com/c/51178479

## महाविद्यालयीन परीक्षा घेणे अशक्य

### महाराष्ट्र स्टुडंट्स युनियनचे पुणे विद्यापीठाला पत्र

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. २१ : कोरोना विषाणूचा सर्वाधिक फटका महाराष्ट्राला बसला. मुंबई, नागपूर, ठाणे, नाशिक, पुणे शहरात रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे ३ मेस लॉकडाउन उघडले तरी लगेचच परीक्षा घेणे हे कठीणच नव्हे तर अशक्य आहे, असे पत्र महाराष्ट्र स्टुडंट्स युनियनने पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंना दिले.

'सकाळ'च्या माध्यमातून ११ एप्रिलला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी विविध संस्था-संघटनांकडून सूचना मागविल्या होत्या. त्याअनुषंगाने संघटनेने हे मागणीचे पत्र दिले.



पुणे विद्यापीठ ऑनलाइन परीक्षा, एका तासाची ऑफलाइन परीक्षा, स्काईपद्वारे आणि प्रकल्प सादरीकरण या पर्यायांचा विचार करीत आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थांचे संचालक, अभ्यासमंडळाचे सदस्य यांची बैठक झाली. मात्र, अजूनही बऱ्याच महाविद्यालयांत अभ्यासक्रम अपूर्ण आहे. पुणे विद्यापीठात पुण्याच्या बाहेरील शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे; परंतु लॉकडाउनच्या धर्तीवर असंख्य विद्यार्थी पुणे सोडून त्यांच्या मूळगावी परतलेले आहेत.

काही महाविद्यालये ऑनलाइन अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत. परंतु या ऑनलाइन शिकवणीत ज्या निवडक मुलांकडे सोयी-सुविधा उपलब्ध आहेत, तीच मुले सहभाग घेत आहेत. महाविद्यालये सर्वच विद्यार्थ्यांपर्यंत पोचू शकत नाही, यावरून हे निष्पन्न होते. अशा परिस्थितीत लॉकडाउन ३ मेस उघडले तरी लगेचच परीक्षा घेणे कठीणच नव्हे तर अशक्य आहे. कोरोना विषाणूच्या अटकावासाठी ट्रेन, बस अशी सार्वजनिक वाहतूकही पुढील काही महिने बंद राहण्याची चिन्हे दिसत आहेत. अशा स्थितीत विद्यार्थी परीक्षा केंद्रापर्यंत येणार तरी कसे त्यामुळे विद्यापीठाने सुचविलेले ऑनलाइन परीक्षा, एकेका तासाची ऑफलाइन परीक्षा, स्काईपद्वारे आणि प्रकल्प सादरीकरण असे पर्याय सध्याच्या परिस्थितीत उचित ठरत नाहीत.

> **परीक्षा महत्त्वाच्या नाहीत तर त्यानंतर प्रश्नपत्रिकेचे मूल्यांकन, निकाल घोषित करणे व पुढील वर्षासाठी प्रवेश हेही महत्त्वाचे आहेत, तर त्याअनुषंगाने परीक्षेची प्रक्रिया आणि पारदर्शकता जाणून घेण्याचा प्रत्येक विद्यार्थ्याचा हक्क आणि अधिकार आहे.**
> **- सिद्धार्थ तेजाळे,** विभागप्रमुख, महाराष्ट्र स्टुडंट्स युनियन

Sakal: 22.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

### विद्यापीठ परीक्षा रखडण्याची शक्यता

**विद्यापीठ परीक्षांसंदर्भात अद्याप निर्णय नाही**

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

राज्यातील करोनाची सध्याची परिस्थिती पाहता विद्यापीठ आणि कॉलेजांच्या परीक्षेसंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना प्राप्त झाल्यानंतरच निर्णय घेण्यात येईल. विद्यार्थ्यांनी चुकीच्या माहितीवर आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले आहे. सामंत यांनी आज सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंशी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून संवाद साधला आणि विद्यापीठीय परीक्षेसंदर्भात गठीत समितीचा आढावा घेतला.

विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षेसंदर्भात समिती नेमली आहे, आयोगाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतरच समितीच्या अहवालावर तत्काळ निर्णय घेण्यात येईल, असे सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले. सर्व विद्यापीठांची आपापल्या पातळीवर परीक्षा घेण्याची तयारी झालेली आहे. ऑनलाइन अध्यापन सध्या सुरू असून ऑनलाइन परीक्षासंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. तसेच एकाही विद्यार्थ्यांना वंचित राहू देणार नाही असेही सामंत यांनी स्पष्ट केले. दरम्यान, करोनाच्या टेस्टिंग प्रयोगशाळा सर्व विद्यापीठांमध्ये सुरू करण्यात येणार आहेत. आतापर्यंत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे ही प्रयोगशाळा सुरू झाली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील प्रयोगशाळेचे काम अंतिम टप्प्यात आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कोरोना विषाणूशी लढा देण्यासाठी व्हेंटिलेटर तयार केले असून ते पाच रुग्णालयांत वापरले जाणार आहेत.

Maharashtra Times: 25.4.2020

### विद्यापीठांचे नवे शैक्षणिक वर्ष सप्टेंबरमध्ये?

**विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीची शिफारस**

**मुंबई :** करोना संक्रमणामुळे रखडलेल्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर पुढील शैक्षणिक वर्ष जून-जुलैऐवजी सप्टेंबरपासून सुरू करण्याची शिफारस विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीने केली आहे. त्याबाबत सोमवारी आयोगाचा अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

आयोगाच्या त्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षांबाबत निर्णय होईल. टाळेबंदीत देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांचे कामकाज मार्चपासून बंद आहे. केंद्रीय शिक्षण मंडळाच्या परीक्षा, वैद्यकीय, अभियांत्रिकीसह विविध प्रवेश परीक्षा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात आल्या आहेत. टाळेबंदीमुळे यंदाच्या परीक्षा आणि नव्या शैक्षणिक वर्षाच्या वेळापत्रकाबाबत संदिग्धता निर्माण झाली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने शैक्षणिक वेळापत्रक आणि परीक्षा याबाबत अभ्यास करून उपाय सुचवण्यासाठी समित्या नेमल्या होत्या. या समित्यांनी त्यांचे अहवाल आयोगाला सादर केले आहेत.

**'परीक्षा शक्यतो ऑनलाइन घ्या'**

वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा जूनमध्ये घेता येतील का, याचा आढावा प्राधिकरण घेत आहे. या परीक्षा आणि विद्यापीठांच्या त्यांच्या स्तरावरील परीक्षा झाल्यनंतर शैक्षणिक वर्ष सुरू होऊ शकेल. वर्ष उशिरा सुरू झाल्यामुळे साधारण ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणारी पहिल्या सत्राची परीक्षाही पुढे जाणार आहे. विद्यापीठांनी परीक्षा शक्यतो ऑनलाइन घ्याव्यात, अशी शिफारसही करण्यात आली आहे.

लोकसत्ता Sun, 26 April 2020
https://epaper.loksatta.com/c/51321091

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# कॉलेजांची सुरुवात सप्टेंबर महिन्यात?

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

उच्च शिक्षण संस्था, कॉलेज आणि विद्यापीठांचे नवे शैक्षणिक वर्ष जुलैऐवजी सप्टेंबरमध्ये सुरू होऊ शकेल, असे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) नेमलेल्या समितीने म्हटले आहे. तसेच परीक्षा ऑनलाइन घेण्याची सूचनाही केली आहे. मात्र, त्यासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध नसेल, तर लॉकलाउन संपण्याशिवाय गत्यंतर नसल्याचे म्हटले आहे.

शैक्षणिक वर्षात झालेले नुकसान आणि ऑनलाइन शिक्षणाबाबत आढावा घेण्यासाठी आयोगाकडून दोन समित्यांची नियुक्ती करण्यात आली होती. हरियाणा विद्यापीठाचे कुलगुरू आर. सी. कुहाद यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे परीक्षा कशा घ्याव्यात आणि शैक्षणिक वर्षांचे पर्यायी नियोजन कसे करता येईल, याबाबत स्पष्टता आणण्याची जबाबदारी होती. तर दुसऱ्या समितीकडे ऑनलाइन परीक्षेच्या नियोजनाची जबाबदारी होती. इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटीचे कुलगुरू नागेश्वर राव या समितीचे अध्यक्ष होते. या समित्यांनी शुक्रवारी त्यांचा अहवाल सादर केला.

या दोन्ही समित्यांच्या अहवालाचा अभ्यास करून मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून पुढील आठवड्यात याबाबत अंतिम अधिसूचना निघण्याची शक्यता आहे.

### प्रवेश परीक्षेचे काय?

'नीट', 'जेईई' या प्रवेश परीक्षा जूनमध्ये घेण्याचे नियोजन आहे. मात्र, सध्याची देशातील करोनास्थिती लक्षात घेऊन निर्णय घ्यावे लागतील, असे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. सीबीएसईने केवळ २९ आवश्यक विषयांची परीक्षा घेतली जाईल, असे यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

# विद्यापीठे सप्टेंबरमध्ये सुरु करण्याची शिफारस

नवी दिल्ली, ता. २५ (वृत्तसंस्था) : कोरोना महामारीची सध्याची स्थिती पाहता विद्यापीठ आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील सत्र जुलैपेक्षा सप्टेंबरमध्ये सुरू करावे, अशी शिफारस एका समितीने विद्यापीठ अनुदान मंडळाला (यूजीसी) केली आहे.

शैक्षणिक नुकसान आणि ऑनलाइन शिक्षण अशा मुद्यांचा अभ्यास करण्यासाठी यूजीसीने दोन समित्या स्थापन केल्या. हरियाणा विद्यापीठाचे कुलगुरु आर. सी. कुहाड यांच्या अध्यक्षतेखालील समितीला परिक्षा घेण्याचे मार्ग आणि पर्यायी शैक्षणिक वर्ष हे मुद्दे हाताळायचे होते. दुसरी समिती इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे (इग्नोउ) कुलगुरू नागेश्वर राव याच्या अध्यक्षतेखाली स्थापण्यात आली. ऑनलाइन शिक्षणाचे मार्ग सुधारण्याचे उपाय हा विषय त्यांच्याकडे होता. दोन्ही समित्यांनी शुक्रवारी अहवाल सादर केले.

मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले की, एका समितीने शैक्षणिक सत्र सप्टेंबरमध्ये सुरू करण्याची शिफारस केली. दुसऱ्या समितीने सांगितले की पायाभुत सुविधा आणि माध्यम असेल तर विद्यापीठे ऑनलाइन परीक्षा घेऊ शकतात. अन्यथा लॉकडाउन संपण्याची वाट पाहवी लागेल आणि त्यानंतर पारंपरिक पद्धतीने लेखी परीक्षा घेण्याची तारीख ठरविता येईल.

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# सरकार आमच्याकडे लक्ष देणार का?

## विद्यार्थ्यांचा प्रश्न; संघटनांकडून मिळणाऱ्या मदतीलाही मर्यादा

**पुणे, ता. २५ :** कोटा येथे अडकलेले विद्यार्थी महाराष्ट्रात परतण्याची शक्यता आहे. त्याचवेळी पुण्यात रहाणाऱ्या विद्यार्थीनी सरकार आमच्यासाठी काही करणार की नाही असा प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच गेल्या महिन्यापेक्षा जास्त कालावधीपासून जेवण पुरविणाऱ्या संघटनांची क्षमताही संपत आल्याने या विद्यार्थांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

पुण्यात स्पर्धा परीक्षा व इतर शिक्षण घेणारे सुमारे ३ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी अडकून पडले आहेत. पुण्यातील कोरोनाची स्थिती गंभीर होत असल्याने लॉकडाउन केव्हा संपेल याचा अंदाज नाही. ज्या संस्था विद्यार्थ्यांना गेल्या महिनाभरापासून दोनवेळा जेवण पुरवत होत्या, त्यांची ही आर्थिक क्षमता संपत आली आहे. ३ मे पर्यंतचे त्यांचे नियोजन आहे. यासाठी बाहेरून मदत मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे राज्य सरकारने ३ मे पर्यंत पुण्यात अडकलेल्या विद्यार्थ्यांना गावाकडे जाण्यासाठी व्यवस्था करावी अशी मागणी केली जात आहे.

दरम्यान, राजस्थानात कोटा येथे 'जेईई' व 'नीट'च्या प्रवेश परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात परत आणण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि अशोक गेहलोत यांच्यात चर्चा झाली आहे. त्यामुळे लवकरच हे विद्यार्थी स्वगृही परत येतील. एकीकडे ही तयारी सुरू असताना पुण्यात रहाणाऱ्या विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष का असा प्रश्न विद्यार्थी विचारत आहेत.

व्हिडिओ पाहा

**अनेक विद्यार्थी पुण्यात अडकलेले आहेत, त्यांना गावाकडे जाण्यासाठी सरकारने व्यवस्था केली पाहिजे. पुण्यात स्थिती गंभीर होत असल्याने कधी कोणाला संसर्ग होईल, याची शाश्वती नाही.**
**- प्रिया मुंढे,** विद्यार्थिनी

**आम्ही पुण्यात अडकल्याने घरचे चिंतेत आहेत. पुण्यातून आरोग्य तपासणी केल्यानंतर गावाकडे गेल्यावर १५ दिवस सक्तीचे करण्यास आम्ही तयार आहोत. कोटाचे विद्यार्थी येऊ शकतात, तर सरकारने आमची ही व्यवस्था केली पाहिजे.**
**- बबन दाडगे,** विद्यार्थी

**विद्यार्थ्यांसाठी जेवण पुरविण्यासाठी ३ मे पर्यंतचे नियोजन आहे. पण यापुढे मदत करणे अवघड जात आहे. सरकारने विद्यार्थ्यांची जबाबदारी घ्यावी. जसे कोटाचे विद्यार्थी स्वगृही परत येत आहेत, तसे या विद्यार्थांची सोय करावी.**
**- महेश बडे,** एमपीएससी स्टुडंट्स राईट्स

**विद्यार्थ्यांना महिनाभर जेवण पुरविले आहे. यापुढे जेवण देताना त्यात काटकसर करावी लागेल. विद्यार्थ्यांचे हाल होऊ नयेत यासाठी राज्य सरकारने या विद्यार्थ्यांची गावकडे जाण्याची सोय केली पाहिजे.**
**- कल्पेश यादव,** शहराध्यक्ष, मनविसे

## मजूर मदतीच्या प्रतीक्षेत



एकीकडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रत्येक विद्यार्थ्याला १० कुटुंबाची जबाबदारी घेण्याचे आवाहन केलेले असताना दुसरीकडे पुणे विद्यापीठात बांधकाम साइटवर अडकून पडलेल्या कामगार व त्यांच्या कुटुंबीयांचे हाल सुरु असल्याचा प्रकार समोर आला आहे.

पुणे विद्यापीठाच्या आवारात वसतिगृह, विभागांच्या इमारती, पाण्याची टाकी, क्रीडांगण यासह अनेक ठिकाणी बांधकामे सुरू होती. तेथे १०० पेक्षा जास्त मजूर काम करत होते. लॉकडाउन सुरु झाल्यानंतरही हे कामगार तेथेच रहात आहेत. विद्यापीठ प्रशासनाला हे लक्षात आल्यानंतर त्यांनी विद्यापीठातील आरोग्य केंद्रात कामगार व त्यांच्या कुटुंबीयांची तपासणी करून घेतली. सर्वांची तब्येत व्यवस्थित आहे. हे कामगार महिनाभरापासून कामाविना रहात आहेत. सुरुवातीला त्यांच्याकडे असलेला किराणा संपत आला आहे. यातील सुमारे २० कामगारांकडे तर सध्या खाण्यासाठी काहीच नाही. आम्हाला केवळ तांदूळ व डाळ दिली तर बस आहे, अशी मागणी या कामगारांनी विद्यापीठातील काही कर्मचाऱ्यांकडे केली आहे.

**विद्यापीठात बांधकाम साईटवर रहाणार्या कामगारांच्या सुरक्षेच्या कारणास्तव आरोग्य तपासणी करून घेतली आहे. यातील काहींना काम देण्याचा प्रयत्न आम्ही केला. विद्यापीठ आवारात रहाणारे कामगार उपाशी रहाणार नाहीत याची काळजी घेऊ.**
**- डॉ. प्रफुल्ल पवार,** कुलसचिव

# 'University and college exams to take place'

■ **ST CORRESPONDENT**
reporters@sakaaltimes.com



**PUNE:** "We are thinking about the pattern including both online and offline examinations for colleges and we will take the students into consideration before reaching any decision," said pro-vice-chancellor of SPPU NS Umrani.

He further said, "The academic and administrative work of the university is going on. We have recently received the guidelines regarding the examination and starting of the new academic year from University Grants Commission (UGC)."

We are working on these guidelines. The university examinations will take place both online and offline. The students should stay in contact with their teachers," he said.

Sakaal Times: 27.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# विद्यापीठाच्या परीक्षा केव्हाही झाल्या तरी विद्यार्थ्यांना तयारीसाठी पुरेसा वेळ देणार

## कुलगुरूंनी फेसबुक लाइव्हद्वारे विद्यार्थ्यांशी साधला संवाद

भात वृत्तसेवा

णे, दि. २६- विद्यापीठ व हाविद्यालयीन परीक्षा केव्हा तील, याबाबत स्थापन करण्यात ालेली यूजीसीची समिती अहवाल ईल. त्यानुसार व राज्य सरकारच्या चनांनुसार परीक्षांबाबत निर्णय ाहीर केला जाईल. पण, परीक्षा व्हाही झाल्या तरी विद्यार्थ्यांना यारीसाठी पुरेसा वेळ दिला ाईल. परीक्षेची पद्धती नेमकी शी असेल याबाबतही योग्य । निर्णय घेतला जाईल. त्यामुळे द्यार्थ्यांनी कोणतेही दडपण



घेऊ नये, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी आज सांगितले.

पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमांतर्गत कोविड १९ आपत्ती व्यवस्थापन अभियान राबविण्यात येत आहे. त्यात सहभागी विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी कुलगुरू प्रा. करमळकर यांनी शनिवारी फेसबुक लाइव्हद्वारे संवाद साधला.

यावेळी प्रा. करमळकर यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. या अभियानात आतापर्यंत ५८ हजार ३०५ स्वयंसेवक सहभागी झाले. त्यांनी तब्बल ८ लाखांहून अधिक मास्क तयार केले आहेत. ५३२० लिटर सॅनिटायझरची निर्मिती करण्यात आली आहे, तर २,१०,३०५ इतक्या कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. आतापर्यंत ३१,०५० रक्तदात्यांची नोंदणी करण्यात आली आहे. येत्या काळात समाजाशी असलेले नाते अधिक दृढ करायला हवे, असेही कुलगुरू म्हणाले.

**Prabhat: 27.4.2020**

# 'प्राध्यापकांनी स्वत:ला अद्ययावत करावे'

## विद्यापीठातर्फे आंतरराष्ट्रीय वेबिनार

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'कोव्हिड-१९ सारख्या विषाणूमुळे पारंपरिक शिक्षण प्रक्रिया थांबली असून, अशा वेळी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या आधारे नवीन शैक्षणिक पद्धतीचे व ऑनलाइन शिक्षणाचे धडे मिळत आहेत, ही निश्चितच अभिमानास्पद गोष्ट आहे. पारंपरिक शिक्षणाबरोबर शिक्षणाच्या नवीन वाटा शोधून तंत्रज्ञानाचा वापर करून प्राध्यापकांनी स्वतःला अद्ययावत करावे,' असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी व्यक्त केले.

पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखा आणि बीएमसी सोल्युशन्स यांच्या वतीने वाणिज्य व व्यवस्थापन विभागातील प्राध्यापकांसाठी आयोजित 'टीचिंग व लर्निंगमधील मुडलचा वापर' या विषयावर झूम ॲपवर आयोजित एक दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारचे उद्घाटन डॉ. उमराणी यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सहसचिव ए. एम. जाधव, प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, व्याख्याते दत्ता मांदळे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. काळकर यांनी वेबिनारचे आयोजन करण्यामागचा उद्देश व महत्त्व स्पष्ट केले. मांदळे यांनी अतिशय सोप्या पद्धतीने मुडलचा परिणामकारक वापर ऑनलाइन लर्निंग व टीचिंग प्रक्रियेमध्ये कसा करता येईल, हे उपस्थितांना विविध प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितले. या आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व वाणिज्य विभागाचे प्राचार्य, व्यवस्थापन शाखा संचालक, अभ्यास मंडळ अध्यक्ष, प्राध्यापक अशा सुमारे ५०० जणांनी सहभाग घेतला.

**परीक्षांचे पर्याय**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा ऑफलाइन व ऑनलाइन या दोन्ही पर्यायांचा विचार आहे. लॉकडाउन संपल्यावर सरकारच्या आदेशानुसार परीक्षांबाबत स्पष्टीकरण दिले जाईल. परीक्षा पद्धतीत विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घेतली जाईल. त्यातही विद्यार्थ्यांची सोय पाहिली जाईल, असेही मत डॉ. उमराणी यांनी व्यक्त केले.

**Maharashtra Times: 27.4.2020**

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

पुढारी

# १ जुलैपासून विद्यापीठांच्या परीक्षा

## शैक्षणिक वर्ष सप्टेंबर ते जुलै; शैक्षणिक वेळपत्रक समितीची शिफारस

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठांच्या रखडलेल्या परीक्षा १ ते ३१ जुलै या कालावधीत आयोजित कराव्यात. याचबरोबर अंतर्गत मूल्यमापनांसाठी आवश्यक प्रकल्प १६ ते ३० मे या कालावधीत पूर्ण कराव्या अशा शिफारशी विद्यापीठ अनुदान आयोगाने परीक्षा आणि शैक्षणिक वर्ष वेळापत्रक तयार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने केल्या आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने हरयाणा येथील केंद्रीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. आर. सी. कुहाड यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची स्थापना केली होती. या समितीने १५ मेपर्यंत ई-लर्निंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात यावे. यानंतर १६ ते ३१ मे या कालावधीत प्रोजेक्ट वर्क, ई-लॅब्ज, अभ्यासक्रमाची पूर्तता, अंतर्गत मूल्यमापन आदी बाबी पूर्ण करण्यात याव्यात. यानंतर जून महिन्यात उन्हाळी सुटी असेल ही सुटी संपल्यावर १ ते १५ जुलै या कालावधीत टर्मिनल सेमिस्टर परीक्षांचे आयोजन करून त्याचा निकाल ३१ जुलैपर्यंत जाहीर करावा. तर १६ ते ३१ जुलै इंटरमीडिएट सेमिस्टर परीक्षांचे आयोजन करून त्याचा निकाल १४ ऑगस्टपर्यंत जाहीर करावा अशा शिफारशी करण्यात आल्या आहेत.

परीक्षा घेताना विद्यापीठांनी बहुपर्यायी, ओएमआर आधारित परीक्षा, ओपन बुक परीक्षा, प्रकल्पाधारीत परीक्षा या पर्यायांचा वापर करावा असेही सूचित करण्यात आले आहे. परीक्षा घेताना ७०:३०चे सूत्र वापरावे. म्हणजे ७० गुणांची परीक्षा विद्यापीठ घेईल तर ३० गुणांची परीक्षा अंतर्गत मूल्यमापनाद्वारे घ्यावी अशी शिफारसही यात करण्यात आली आहे. याचबरोबर विद्यापीठ त्यांच्यास्तरावर विविध संकल्पनांचा वापर करून परीक्षांचे नियोजन करू शकतात असेही समितीने सुचित केले आहे.

एकाचवेळी जास्त विद्यार्थ्यांना न बोलावता दिवसभरात दोन वेळा एकाच इयत्तांचा परीक्षांचे आयोजनही करता येऊ शकेल. याच पद्धतीचा वापर अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठीही होऊ शकतो असेही समितीने म्हटले आहे.

### अन्य शिफारशी

- शैक्षणिक वर्षाचे नियोजन करताना २५ टक्के अभ्यासक्रम ऑनलाईन तर ७५ टक्के अभ्यासक्रम ऑफलाईन पूर्ण करावा.
- कर्मचाऱ्यांना तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण द्यावे
- विद्यापीठांनी ई-कंटेंट, ई-लॅब्ज तयार करून वेबसाईटवर अपलोड करावेत.
- प्रत्येक शैक्षणिक संस्थेने व्हर्च्युअल क्लासरूम स्थापन करावेत.



### सप्टेंबरपासून नवीन शैक्षणिक वर्ष

दुसऱ्या वर्षापासून पुढील इयत्तांचे शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून सुरू होईल. तर प्रथम वर्ष पदवीचे प्रवेश १ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत करून १ सप्टेंबरपासून प्रथम वर्षाचे वर्ग सुरू करावेत. याची परीक्षा १ जानेवारी ते २५ जानेवारी या कालावधीत पार पडतील. तर अंतिम परीक्षा १ ते ३१ जुलै २०२१ या कालावधीत पार पडतील. यामुळे यापुढे सप्टेंबर ते जुलै असे शैक्षणिक वर्ष राहील, अशी शिफारसही समितीने केली आहे.

Mumbai Edition
29 Apr 2020 Page No. 2

# ऑनलाइन परीक्षेस संघटनेचा विरोध

## सोयी-सुविधा उपलब्ध नाहीत; विद्यार्थ्यांवर होईल अन्याय

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावरील परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधा आपल्याकडे उपलब्ध नाहीत.तसेच ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेतल्या जाणार असल्याचे गृहीत धरून वर्षभर शिकवल्यानंतर अचानक ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेणे हे विद्यार्थ्यांवर अन्याय केल्यासारखे होईल, त्यामुळे ऑनलाईन परीक्षेत प्राचार्य व प्राध्यापक संघटनेकडून विरोध दर्शविला जात आहे.

कोरोनामुळे देशातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालय, शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा रद्द करून पुढे ढकलल्या. परंतु ,महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांच्या बाबतीत असा निर्णय घेणे संयुक्तिक नसल्याचे शिक्षण तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे. प्रथम वर्षासह द्वितीय वर्षाच्या परीक्षा सुद्धा महाविद्यालयांकडे देता येऊ शकतात. त्यामुळे तृतीय वर्षाच्या व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा निकाल लावण्याची जबाबदारी विद्यापीठांवर येईल. परीक्षांचा निकालही पंधरा दिवसांमध्ये लावता येईल. त्यामुळे ऑफलाईन परीक्षांचा विचार करू नये असे प्राचार्य व प्राध्यापक संघटनेकडून सांगितले जात आहे.

“ परीक्षा कशा घ्याव्यात याबाबत कायद्यामध्ये स्पष्टपणे सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कायद्याची चौकट मोडता येणार नाही. आदिवासी भागातील व गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षा सोयीची नाही. लॉक डाऊन संपल्यानंतर ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेता येतील.

- प्रा. नंदकुमार निकम, अध्यक्ष, प्राचार्य महासंघ, पुणे

“ सध्या ऑनलाईन परीक्षांचा पर्याय चांगला वाटत असला तरी विद्यापीठ व महाविद्यालय यांची ऑनलाइन परीक्षा घेण्याची तयारी नाही. निकालासाठी ऑनलाइन प्रणाली वापरल्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुंना राजीनामा द्यावा लागला होता, हे विसरुन चालणार नाही. परीक्षा घेण्याबद्दल वेगळा विचार करणे योग्य असून त्यावर चर्चाही झाली पाहिजे. परंतु, ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेणेच संयुक्तिक आहे.

- प्रा. एस. पी. लवांडे, सरचिटणीस, एम फुक्टो

“ ऑफलाइन पद्धतीने परीक्षा होणार हे गृहीत धरून विद्यार्थ्यांनी वर्षभर अभ्यास केलेला आहे. अचानक त्यांना ऑनलाईन परीक्षांना सामोरे जाण्याची वेळ आली तर विद्यार्थी तणावाखाली येऊ शकतात. विद्यापीठाने 100 गुणांऐवजी 50 गुणांची लेखी परीक्षा घेतल्यास पंधरा ते वीस दिवसांमध्ये सर्व परीक्षा घेतात येतील.

- डॉ. एस. एम. राठोड, अध्यक्ष, पुटा पुणे

“ प्रथम वर्षाप्रमाणे द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांकडे वर्ग करता येतील. त्यामुळे तृतीय वर्ष व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दहा ते पंधरा दिवसांमध्ये घेणे शक्य होईल. ऑनलाइन परीक्षा घेण्यास मर्यादा आहेत. ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी काही कायदेशीर बाबींची पूर्तता करावी लागेल. त्याऐवजी काही महिने शैक्षणिक वर्ष पुढे गेले तरी चालेल; पण ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेणे योग्य ठरेल.

- डॉ. संजय खरात, सरचिटणीस प्राचार्य महासंघ, पुणे

Lokmat: 29.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# सर्वांना पुढील वर्गात प्रवेश!

## शैक्षणिक वेळापत्रक बिघडल्याने विद्यापीठांसाठी 'यूजीसी'च्या समितीची शिफारस

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** सर्व अभ्यासक्रमांतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील सत्रात प्रवेश देण्यात यावेत, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना यंदा परीक्षेची अतिरिक्त संधी देण्यात यावी, अशी शिफारस विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीने केली आहे. यंदा सर्व प्रवेश प्रक्रिया ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचेही आयोगाने सुचवले आहे.

करोनाच्या संसर्गाला आळा घालण्यासाठी देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांचे कामकाज मार्चपासून बंद करण्यात आले. विद्यापीठ अनुदान आयोगाने शैक्षणिक वेळापत्रक आणि परीक्षा यांबाबत अभ्यास करून उपाय सुचवण्यासाठी समित्या नेमल्या होत्या. या समित्यांनी त्यांचे अहवाल आयोगाला सादर केले आहेत. त्यानुसार परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थी, अनुपस्थित राहिलेल्या विद्यार्थ्यांनाही पुढील सत्रासाठी प्रवेश देण्यात यावा, अशी शिफारस या समितीने केली. मात्र, विद्यापीठ ज्यावेळी पुढील परीक्षा घेईल, त्यावेळी विद्यार्थ्यांना आधीच्या सत्राच्या राहिलेल्या विषयांमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. विद्यार्थ्यांना गुणवाढीसाठी अतिरिक्त परीक्षेची संधी देण्याचेही या समितीने सुचवले आहे.

**प्रवेश प्रक्रियेसाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत**

यंदा विद्यापीठांच्या परीक्षा जुलैमध्ये घेण्यात याव्यात. परीक्षेपूर्वी किमान आठ दिवस विद्यार्थ्यांना कल्पना देण्यात यावी. विद्यापीठांच्या परीक्षांचे निकाल १४ ऑगस्टपर्यंत जाहीर करण्यात यावेत. परीक्षांसाठी आवश्यक त्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घ्याव्यात, मात्र या सर्व परीक्षा, निकाल यांसह प्रवेश प्रक्रिया ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करावी. गरज असल्यास तात्पुरता प्रवेश देण्याचा मार्ग अवलंबावा. त्यानंतर परीक्षांचे निकाल आणि आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून (पान २ वर)

### परीक्षा कशी?

कमीतकमी वेळेत आणि गर्दी होणार नाही, अशा पद्धतीने परीक्षा घेण्यात याव्यात, असे सुचवण्यात आले आहे. लघुत्तरी, बहुपर्यायी प्रश्नपत्रिका देणे, परीक्षेत पुस्तक बाळगण्याची मुभा (ओपन बुक टेस्ट), लेखी परीक्षेऐवजी सादरीकरण करण्यास सांगणे, पन्नास टक्के अंतर्गत मूल्यमापन ग्राह्य धरून पन्नास टक्क्यांसाठी प्रकल्प करण्यास सांगणे, असे पर्याय समितीने सुचवले आहेत. लेखी परीक्षा ही साधारण अडीच ते तीन तास असते, त्याऐवजी कमी वेळात परीक्षा घेण्याचे पर्याय विद्यापीठांनी शोधून काढावेत, असे आवाहनही समितीने केले आहे. एमफील, पीएचडीसह इतर अभ्यासक्रमांच्याही तोंडी परीक्षा किंवा मुलाखती ऑनलाइन प्रणालीच्या माध्यमातून घेण्यात याव्यात, अशी शिफारस करण्यात आली आहे.

# सर्वांना पुढील वर्गात प्रवेश!

**(पान १ वरून)** ३० सप्टेंबरपर्यंत प्रवेश निश्चित करण्यात यावेत, असे समितीने सुचवले आहे.

**आता पावसाळी सुट्टी**

यंदाचे शैक्षणिक वर्ष पुढे गेल्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षही (२०२१-२२) उशिरा सुरू होणार आहे. साधारण एप्रिल-मे महिन्यात अनेक अभ्यासक्रमांच्या परीक्षा संपून सुट्टी लागते. आता मात्र उन्हाळ्याऐवजी पावसाळ्यात शैक्षणिक वर्षाअखेरीची सुट्टी मिळणार आहे. सुरू असलेल्या शैक्षणिक वर्षाची सुट्टी १ ते ३० जून या कालावधीत, तर येत्या शैक्षणिक वर्षाची (२०२०-२१) सुट्टी १ ते ३० जुलै २०२१ या कालावधीत देण्याची शिफारस आयोगाच्या समितीने केली आहे.

### वेळापत्रक कसे असेल?

१६ ते ३१ मे - प्रकल्पाची पूर्तता
१ ते ३० जून - वार्षिक सुट्टी (उन्हाळी सुट्टी)
१ ते ३१ जुलै - विद्यापीठांच्या परीक्षा
१ ऑगस्ट - जुन्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात
१४ ऑगस्टपर्यंत - विद्यापीठांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करणे
३१ ऑगस्ट - पुढील वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मुदत
१ सप्टेंबर - नव्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात
३० सप्टेंबर - तात्पुरते प्रवेश निश्चित करण्यासाठी मुदत
१ ते २५ जानेवारी २०२१ - पहिली सत्र परीक्षा
२७ जानेवारी २०२१ - दुसऱ्या सत्राची सुरुवात
२६ मे ते २५ जून २०२१ - दुसरी सत्र परीक्षा
१ ते ३० जुलै २०२१ - वार्षिक सुट्टी
२ ऑगस्ट २०२१ - नव्या शैक्षणिक वर्षाची (२०२१-२२) सुरुवात

**Loksatta: 29.4.2020**

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाइन नकोत

**अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेची मागणी**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'विद्यापीठांच्या ऑनलाइन परीक्षांचा निर्णय हा वंचित, कष्टकरी, भटक्या विमुक्त, आदिवासी मुलांवर अन्यायकारक ठरून, ही मुले शिक्षण प्रवाहाच्या बाहेर फेकली जातील. त्यामुळे अखिल भारतीय समाजवादी शिक्षणहक्क आणि अध्यापक सभेचा या पर्यायाला विरोध असून, विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या लेखी परीक्षा घेण्यात याव्यात,' अशी मागणी सभेच्या वतीने करण्यात आली आहे.

सभेचे संघटक डॉ. शरद जावडेकर म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या परीक्षा रखडल्या आहेत. शिक्षण क्षेत्रापुढील या आव्हानाला तोंड देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रा. आर. सी. कुहाड आणि प्रा. नागेश्वर राव यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षा; तसेच पुढील शिक्षणासंबंधी दोन समित्या नेमल्या होत्या. त्यामध्ये ऑनलाइन शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासंबंधी या समितीचा अहवाल दोन्ही समित्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर केला आहे.

ऑनलाइन शिक्षणाला कोणाचीही हरकत असण्याचे कारण नाही. मात्र, यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा, संगणक किंवा स्मार्टफोन, इंटरनेट, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, वीजपुरवठा त्याचबरोबर प्रशिक्षित शिक्षक, शैक्षणिक ऑडिओ, व्हिडिओ, मुद्रण साहित्याचे डिजिटायझेशन असणे गरजेचे आहे. ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय निवडताना संगणक/ स्मार्ट फोन, इंटरनेट, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, यासाठी साधने वंचित, कष्टकरी, भटक्या विमुक्त, आदिवासींना परवडणार का. त्यामुळे विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या लेखी परीक्षा योग्य ती काळजी घेऊन घेतल्या गेल्या पाहिजेत, अशी मागणी सभेचे अध्यक्ष जयवंतराव ठाकरे यांनी केली आहे.

Maharashtra Times: 29.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Education

# अकरावी प्रवेशाला करोनाची ‘बाधा’

## प्रवेश प्रक्रिया लांबणार : यंदा नवीन एजन्सीची नेमणूक

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८ -** राज्यात करोनाचा प्रादुर्भाव वाढत चालल्याने इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. यामुळे लॉकडाऊनची परिस्थिती पाहून इयत्ता अकरावीची केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियाही पुढे ढकलण्यात येणार आहे.

यंदा नवीन एजन्सीमार्फत प्रवेश प्रक्रिया होणार आहे. राज्यात गेल्या महिन्यापासून शाळा व महाविद्यालय बंद आहेत. लॉकडाऊन कालावधी वाढतो आहे. दहावी परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणी व सबमिशनच्या कामकाजातही अडचण येत आहे. याचा फटका अकरावी प्रवेशाला बसणार आहे. राज्यात पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महापालिका हद्दीत अकरावी प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन पद्धत राबविण्यात येते. उर्वरित भागांत ऑफलाइनद्वारे प्रवेश देण्यात येतात. गेल्या वर्षी ८ जून रोजी दहावीचा निकाल जाहीर झाला होता. अकरावी प्रवेश अर्जाचा भाग-१ भरण्यासाठीची ऑनलाइन सुविधा २७ मेपासून उपलब्ध करून दिली होती. जून महिन्यात प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले होते.

सप्टेंबरपर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरूच होती. राज्य मंडळांच्या शाळांच्या दहावीच्या निकालाबरोबरच सीबीएसई, सीआयएसई,आयजीसीएसई, आयबी, एनआयओएस मंडळाच्या परीक्षाचे निकाल कधी लागतात यावर अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक अवलंबून आहे.

### यंदा ‘तलिष्मा’ या एजन्सीला प्रवेशाचे काम



यंदा ‘तलिष्मा’ या एजन्सीला काम देण्यात आले आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी पोर्टल विकसित करण्यात येणार आहे. त्याचे कामकाज पूर्ण करण्यात येणार आहे. प्रवेशासाठी संभाव्य वेळापत्रकही तयार करून ठेवण्यात येणार आहे. मात्र दहावीच्या निकालाच्या तारखेचा विचार करून वेळापत्रक अंतिम करावे लागणार आहे. लॉकडाऊन उठल्यानंतरच प्रत्यक्षात प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. प्रवेश प्रक्रियेत एकसूत्रता, पारदर्शकता आणण्यासाठी योग्य ते नियोजन करून त्याची अंमलबजावणी करण्याला प्राधान्य देण्यात येणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक दिनकर पाटील यांनी दिली आहे.

### ‘नायसा’कडून काढून घेतले काम

मागील तीन वर्षांपासून अकरावी ऑनलाइन प्रवेशाचे कामकाज ‘नायसा’ या कंपन्यामार्फत करण्यात आले. मात्र या कंपनीच्या कामकाजाबाबत शिक्षण विभागातील अधिकारी, पालक, विविध संघटना यांनी अनेकदा नाराजी व्यक्त करत तक्रारी करण्यात आल्या होत्या. प्रवेश प्रक्रियेचा अहवालही त्यांनी कधीच वेळेत दाखल केला नव्हता. त्यामुळे या कंपनीवर लाखो रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे आता प्रवेशासाठी जुन्या कंपनीला बाजूला करत नवीन कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभात Wed, 29 April 2020
epaper.eprabhat.net/c/51413307

# News Paper Clippings During April 2020

## Section : Contribution of Institutions towards the Society

## Contribution of *Progressive Education Society*

### प्रोग्रेसिव्ह संस्थेकडून ५० लाखांची मदत

पुणे : 'कोरोना'चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य सरकारला मदत म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे ५० लाख रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे व संस्थेच्या पदाधिकारी यांनी सर्वानुमते संस्थेत कार्यरत असलेल्या प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी एक दिवसाचे वेतन व संस्थेशी संबंधित व्यवसायिकांकडून ठराविक रक्कम अशी एकूण ५० लाख रूपये मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात शाळा महाविद्यालय पूर्ववत सुरू झाल्यानंतर विद्यार्थी व पालकांना देखील आर्थिक मदत देण्यासाठी आवाहन करण्यात येणार आहे.

Sakal: 2.4.2020

### पीईएसकडून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : केंद्र व राज्य सरकारकडून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले जात असून, त्यासाठी मोठा आर्थिक खर्च होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकतेर कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देण्याचा निर्णय घण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आर्थिक मदतीचे आवाहन केले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मदतीसाठी आवाहन केल्यानंतर पुण्यातील प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने आर्थिक मदतीचा हात पुढे केला आहे. त्यामुळे संस्थेकडून सुमारे ५० लाखांचा निधी दिला जाणार आहे.

Hello Pune
Page No. 4 Apr 01, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2020

## Section : Contribution of Institutions towards the Society

### Contribution of Savitribai Phule Pune University, Pune

## SPPU design innovation centre makes face covers for health workers, police

**EXPRESS NEWS SERVICE**
PUNE, APRIL 6

EVEN AS innovation centres across the country are working on solutions to help fight the coronavirus pandemic, the Design Innovation Centre of Savitribai Phule Pune University at Pabal has designed a face protection cover against the virus.

Production of the face cover has already begun and it will be made available to health workers and police personnel, said SPPU authorities.

It will be used by doctors, nurses in health centres, health workers in laboratories and police.

To create it, the best open source design available was used and production of a few face covers was done on an experimental basis. Work is now underway to distribute the mask to health centres.



**Production of the mask has already begun.** *Express*

To manufacture the masks on a large scale, procurement of raw materials was started urgently and currently, 3,500 face covers have been put in production. As per need, the number of covers can be increased, said Dr Arvind Shaligram.

The Indian EXPRESS Tue, 07 Apri https://epap

AWARENESS DRIVE

## SPPU's NSS volunteers to reach 6 lakh families

**EXPRESS NEWS SERVICE**
PUNE, APRIL 6

REACHING SIX lakh families within the next few days is the target that the Savitribai Phule Pune University (SPPU) authorities have set before student volunteers of the National Service Scheme (NSS), in a bid to spread awareness and ensure compliance of restrictions imposed to prevent the spread of the novel coronavirus.

A meeting was chaired via audio-conferencing by SPPU Vice-Chancellor Dr Nitin Karmalkar on this issue, along with the NSS heads of colleges affiliated to SPPU in Pune, Ahmednagar and Nashik districts.

A committee has been set up under the leadership of Rajesh Pande, member of the management council, along with other members such as Sanjay Chakne, Bhagyashri Manthalkar and Prabhakar Desai, SPPU's NSS department head. The committee will send regular updates to the VC on measures being taken by the university on disaster management for coronavirus.

According to the instructions of the vice-chancellor, 60,000 student volunteers of NSS (wherever they are in lockdown) will be asked to reach out to 10 families each. Students will use social media as well as phones to contact families and will be expected to spread awareness, counsel families as well as conduct a survey of the difficulties being faced by people under lockdown.

The volunteers will conduct a survey on whether essential items like ration, fruits, vegetables, milk and banking services were available. If they find that help is needed, the volunteers will contact local district administration or police to make the services available. This is being done to ensure that people do not step out of their homes to avail these services.

Meanwhile, even as non-essential surgeries have been put off, blood banks are facing a shortage as blood donation camps can't be held. To overcome this problem, student volunteers of NSS will make a directory of 50,000 blood donors, and it will be cover areas in the taluka, village and district level. This is to ensure that blood donors are contactable and available in emergencies.

The Indian EX

# News Paper Clippings During April 2020

## Section : Contribution of Institutions towards the Society

### विद्यापीठात १०० जणांची विलगीकरणाची व्यवस्था

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'ॲकेडमीक गेस्ट हाऊस' मध्ये १०० जणांची व्यवस्था केली आहे. हे गेस्ट हाऊस प्रशासनाच्या ताब्यात दिले आहे. महाराष्ट्रात 'कोरोना'चे रुग्ण सापडण्यामध्ये मुंबई नंतर पुण्याचा क्रमांक लागत आहे. रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने महापालिकेच्या नायडू रुग्णालयाची क्षमता संपत आली आहे. नायडूमध्ये १०० खाटांची क्षमता असून, सध्या तेथे ८५ जणांवर उपचार सुरू आहेत. त्यामुळे रुग्णांवर उपचार करण्यासाठी व विलगीकरणासाठी पर्यायी जागांचा शोध सुरू आहे. राज्य सरकारने राज्यातील सर्व वसतीगृह बंद करून ते प्रशासनाच्या ताब्यात देण्याचे आदेश दिले होते. त्यात खासगी संस्थांच्या वसतीगृहांसह पुणे विद्यापीठाचाही समावेश होता. पुणे विद्यापीठातील विद्यार्थी व विद्यार्थिनींचे वसतीगृह बंद असले तरी ते ताब्यात देण्यात आलेले नाहीत. विलगीकरण कक्षासाठी विद्यापीठाचे 'गेस्ट हाऊस' उपलब्ध करून दिले आहे. तेथे १०० खाटांची सोय आहे, मात्र अद्याप तेथे विलगीकरणासाठी कोणालाही ठेवण्यात आलेले नाही, असे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना अचानक वसतीगृह रिकामे करावे लागले.

Kesari: 7.4.2020

लोकमत

### रासेयो कोरोनासाठी तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचणार

#### आपत्ती व्यवस्थापन : ६० हजार विद्यार्थी स्वयंसेवक, प्रत्येकी १० कुटुंबांपर्यंत पोहोचणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग कोरोना महामारी आपत्तीचा सामना करण्यासाठी संकल्परत झाला आहे. या काळात लोकांच्या सहकार्यासाठी रासेयोच्या ६० हजार विद्यार्थी स्वयंसेवकांना (ते आता जिथे कोरोना लॉकडाऊनमुळे स्थानबद्ध आहेत तिथूनच) किमान प्रत्येकी १० कुटुंबांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी विद्यापीठ पातळीवरील आपत्कालीन ऑडिओ बैठक घेऊन यासंदर्भात मार्गदर्शन केले. त्यानुसार पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील रासेयो महाविद्यालयातील रासेयो कक्ष आपली भूमिका व कर्तव्य बजावण्यासाठी सज्ज झाला आहे. याअंतर्गत प्रत्येक विद्यार्थी फोनच्या किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून १० कुटुंबांपर्यंत पोहोचणार आहे. त्या कुटुंबातील सदस्य कोरोना लॉकडाऊनमुळे कोणत्या समस्यांना सामोरे जात आहेत, याची पाहणी करेल. त्यांचे समुपदेशन करेल आणि त्या कुटुंबास धान्य, औषधे, बँकिंगसेवा, दूध, भाजीपाला आदी आवश्यक गोष्टी आणून देण्यासाठी स्थानिक प्रशासन व पोलिसांची मदत घेऊन सेवा पोहोचवेल. यामुळे अत्यावश्यक गरजांसाठी नागरिक बाहेर पडणार नाहीत. ज्येष्ठ नागरिकांना या सेवा अत्यधिक उपयोगी ठरणार आहेत. व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. संजय चाकणे, अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर व राष्ट्रीय सेवा योजना विभाग संचालक डॉ. प्रभाकर देसाई अशा सदस्यांची विशेष नियोजन व अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात आली आहे. याबाबत जिथे विद्यार्थी स्थानिक प्रशासनाच्या साहाय्याने बाहेर पडतील, तिथे सर्व प्रकारची सुरक्षितता कशी घ्यायची, याबाबत त्यांना कार्यक्रम अधिकारी व प्रशासनामार्फत प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच एका ॲपअंतर्गत सर्व स्वयंसेवकांचा समावेश करून प्रशिक्षण देण्याचे नियोजनसुद्धा अंतिम टप्प्यात आहे.

विद्यापीठ रासेयो विभागास या नियोजनात महाराष्ट्र रोसेयो कक्ष, विभागीय रासेयो संचालनालय, विभागीय संचालक कार्तिकेयन व राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य अतुल साळुंखे यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन लाभत आहे.

#### ५० हजार रक्तदात्यांची डिरेक्टरी



कोरोना विषाणूजन्य महामारी परिस्थितीमध्ये जरी विविध शस्त्रक्रिया लांबणीवर टाकण्यात आल्या असल्या तरी आकस्मिक शस्त्रक्रियांसाठी रक्तदान अत्यावश्यक आहे. तसेच रक्त कमी प्रमाणात लागणार असले तरी प्लेटलेट्स मात्र नियमितपणे उपलब्ध करणे गरजेचे आहे. यादृष्टीने विद्यापीठ रासेयो विभाग गाव, शहर, महाविद्यालय, परिसंस्था, तालुका, जिल्हा व विद्यापीठ पातळीवर सर्व रोसेयो स्वयंसेवक, रासेयो कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मिळून किमान ५० हजार रक्तदात्यांची रक्तगट डिरेक्टरी तयार करणार आहे. यामुळे त्या त्या परिसरातील विशेषत: शासकीय रक्तपेढ्यांत विशिष्ट रक्तगटाचे रक्त व प्लेटलेट्स सहज उपलब्ध होणे शक्य होईल.

Pune Main
Page No. 2 Apr 08, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2020

## Section : Contribution of Institutions towards the Society

लोकमत

### आयुष मंत्रालयाच्या टास्क फोर्सच्या अध्यक्षपदी डॉ. भूषण पटवर्धन

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार फोर्सची निर्मिती**

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयुष मंत्रालयाच्या संशोधन आणि विकास प्रकल्पांना चालना देण्यासाठी आणि कोव्हीड १९ विषाणूला रोखण्यासाठी आयुष



मंत्रालयातर्फे इंटरडिसिप्लिनरी आयुष रीसर्च आणि डेव्हलपमेंट टास्क फोर्स स्थापन करण्यात आला असून या टास्क फोर्स अध्यक्षपदी विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांची नियुक्तीकेली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार हा टास्क फोर्स तयार केला आहे. या टास्क फोर्समध्ये एकूण १७ विविध संशोधन संस्थांशी निगडित तज्ज्ञ असून, अध्यक्षपदी डॉ. पटवर्धन आहे. डॉ. पटवर्धन हे मूळचे पुण्याचे असून, त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आरोग्यशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहिले आहे. तसेच सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे कुलगुरु म्हणून काम पाहिले आहे.

> काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या सूचनेनुसार टास्क फोर्सची स्थापना झाली आहे. येत्या काही दिवसात संशोधनाबाबत ठोस माहिती जाहीर करण्यात येईल.
> **- डॉ. भूषण पटवर्धन,** अध्यक्ष टास्क फोर्स आणि उपाध्यक्ष यूजीसी

देशात करोनाचा प्रादुर्भाव वाढल्यानंतर मोदी यांनी २८ मार्च रोजी आयुष मंत्रालयाशी निगडित सर्व घटकांची बैठक घेतली. या बैठकीत मोदी यांनी भारतीय पारंपरिक औषधींचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासोबतच पारंपरिक वैद्यकीय पद्धतींची माहिती जगाला पटवून देण्यासाठी आयसीएमआर, सीएसआयआर आणि इतर संशोधन संस्थांना एकत्रित येऊन उत्तम संशोधन पुराव्यानिशी जगासमोर मांडण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले होते.

या संशोधनामुळे करोनासारख्या विषाणुजन्य आजारावर उपचार पद्धती मिळाली तर देशासोबतच संपुर्ण जगासाठी महत्त्वाची आणि समाधानाची बाब असणार आहे. हीच बाब लक्षात घेऊन आयुष मंत्रालयाने टास्क फोर्स स्थापन केला आहे. या टास्क फोर्सद्वारे होणाऱ्या महत्त्वाच्या निर्णयांची माहिती डॉ. पटवर्धन थेट मोदी यांना देणार आहे.

Pune Main
Page No. 2 Apr 09, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

### एनएसएस उपक्रमांसाठी करणार मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोना विरुध्दच्या लढ्यात उतरणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कोणती कामे करावीत याबाबतचा आराखडा तयार करण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या निर्देशानुसार विशेष नियोजन व अंमलबजावणी समिती स्थापन केली आहे. पुढील काळात रासेयोचे स्वयंसेवक कोणती भूमिका बजावतील या बाबतचा आराखडा वेळोवेळी ही समिती कुलगुरूंना सादर करणार आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे हे या विशेष समितीचे अध्यक्ष असून व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. संजय चाकणे, अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई या समितीचे सदस्य आहेत.

आकस्मिक शस्त्रक्रियांसाठी रक्त अत्यावश्यक आहे. तसेच रक्त कमी प्रमाणात लागणार असले तरी प्लेटलेट्स नियमितपणे उपलब्ध करणे गरजेचे आहे. या दृष्टीने विद्यापीठ रासेयो विभाग गाव, शहर, महाविद्यालय, तालुका, जिल्हा व विद्यापीठ पातळीवर सर्व रासेयो स्वयंसेवक, रासेयो कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या रक्तगटाची डिरेक्टरी तयार करणार आहे.

Pune Main
Page No. 2 Apr 09, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2020

## Section : Research

hindustantimes

MISSING LINK

### Astronomers find best evidence for mid-sized black hole

WASHINGTON: Astronomers have found the best evidence for a black hole of an elusive class known as "intermediate-mass", using the combined power of two X-ray observatories and the NASA's Hubble Space Telescope.

Weighing about 50,000 times the mass of Sun, the black hole is smaller than the supermassive black holes (at millions or billions of solar masses) that lie at the core of large galaxies, but larger than stellar-mass black holes formed by the collapse of a massive star, according to the study published in The Astrophysical Journal Letters.

These so-called intermediate-mass black holes (IMBHs) are a long-sought "missing link" in black hole evolution.

Though there have been a few other IMBH candidates, researchers consider these new observations the strongest evidence yet for mid-sized black holes in the universe.

"Intermediate-mass black holes are very elusive objects, and so it is critical to carefully consider and rule out alternative explanations for each candidate. That is what Hubble has allowed us to do for our candidate," said Dacheng Lin of the University of New Hampshire in the US, the principal investigator of the study.

Lin and his team used Hubble to follow up on leads from NASA's Chandra X-ray Observatory and the European Space Agency's X-ray Multi-Mirror Mission (XMM-Newton). In 2006 these satellites detected a powerful flare of X-rays, but they could not determine whether it originated from inside or outside of our galaxy. AGENCIES



The "intermediate mass" black hole is smaller than the supermassive black holes, but larger than stellar-mass black holes. REPRESENTATIVE IMAGE/ NASA UNIVERSE TWITTER

**Hindustan times: 2.4.2020**




Image Courtesy: Google Images

# News Paper Clippings During April 2020

## Section : Research

# इतिहास संशोधनाला 'भांडारकर' संस्थेचे बळ

### शताब्दीनंतर विविध कार्यांचे नवीन पर्व सुरू

Chintamani.Patki
@timesgroup.com
Tweet : @chintamanipMT

**पुणे** : हस्तलिखितसंग्रहाची जपणूक आणि देवघेव, इतिहासाचे संशोधन, ग्रंथप्रकाशन आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महाभारतावर संशोधन या कार्याला वाहिलेली संस्था म्हणून भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेचा लौकिक आहे. शताब्दी साजरी झाल्यानंतर संस्थेचे नवीन पर्व सुरू झाले असून, शंभर वर्षांतील कामाची जपणूक, कामाचा योग्य अन्वयार्थ लावणे आणि काम पुढे नेत नवनवीन संशोधन कार्याला बळ देण्यासाठी संस्था पुन्हा उत्साहाने सक्रिय झाली आहे.



भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेची इमारत.

> भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेने नवीन वर्षात विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. भागवतपुराणाची संदर्भसूची, हस्तलिखितांची सूची, प्राकृत कोशाचा आठवा खंड आणि कदंब राजवंशाचे अभिलेख अशा प्रकल्पांचा त्यात समावेश आहे. महाभारताच्या सांस्कृतिक सूचीच्या तिसऱ्या खंडाच्या दुसऱ्या भागाचे प्रकाशन झाले आहे. महाभारतातील सर्वांत प्रमुख योद्धा असणाऱ्या अर्जुनाविषयीचे संदर्भ या भागात आहेत. संस्थेच्या संशोधन-पत्रिकेचा ९६वा खंड आणि फिरोदिया ट्रस्टच्या आर्थिक साह्याने सुरू असलेल्या प्राकृत कोशाचा आठवा खंडही लवकरच प्रकाशित होणार आहे. इन्फोसिस फाउंडेशनकडून संस्थेला विविध संशोधन प्रकल्पांसाठी भरघोस आर्थिक साह्य देण्यात आले आहे. फिरोदिया ट्रस्टच्या साह्याने भांडारकर संस्थेत देखण्या ॲम्फी थिएटरची निर्मिती करण्यात आली आहे.
>
> \- प्रा. सुधीर वैशंपायन, मानद सचिव

### ओळख संस्थांची

पुण्याचे भूषण असलेली भांडारकर ही आंतरराष्ट्रीय कीर्तीची प्राच्यविद्या संशोधन संस्था आहे. संस्कृत आणि भारतविद्येचे महर्षी डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्याविषयी आदर व्यक्त करण्याच्या हेतूने, त्यांचे शिष्य आणि मित्र यांनी ६ जुलै १९१७ मध्ये, भांडारकरांच्या ८०व्या वाढदिवशी या संस्थेची स्थापना केली. डॉ. भांडारकरांनी आपल्या ग्रंथांचा आणि संशोधनपत्रिकांचा अनमोल संग्रह संस्थेला दिला. पुढील वर्षी तत्कालीन मुंबई इलाक्याच्या सरकारने आपल्याजवळचा संस्कृत-प्राकृत हस्तलिखितांचा संग्रह आणि संस्कृत-प्राकृत ग्रंथमाला संस्थेकडे दिली. १९१९ मध्ये संस्थेने स्वतःची संशोधनपत्रिका, महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीचा प्रकल्प, अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेची योजना आणि स्नातकोत्तर अध्ययन आणि संशोधन विभाग ही चार कार्ये सुरू केली.

सरकारकडून मिळालेल्या हस्तलिखितांमध्ये संस्थेच्या स्वतःच्या, खासगी संस्था वा व्यक्ती यांनी दान दिलेल्या विविध भाषेतील पोथ्यांची भर पडून हा हस्तलिखाताचा संग्रह २५ हजारांपेक्षा अधिक झाला आहे.

संस्थेचे ग्रंथालय भारतीय आणि प्राच्यविद्येच्या अभ्यासाच्या दृष्टीने समृद्ध असून, साठ हजारांपेक्षा अधिक ग्रंथ उपलब्ध आहेत. या ग्रंथांचे डिजिटायझेशन करण्याचा प्रकल्प सुरू आहे.

अध्ययन-संशोधनासाठी भारताच्या कानाकोपऱ्यांतून आणि जगातील अनेक देशांतून अभ्यासक येथे येतात. महाभारताच्या सांस्कृतिक बृहतसूचीचे काम अनेक वर्षे सुरू आहे. संस्थेतर्फे पावणेदोनशे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्यात संस्थेची वार्षिके, त्यांचा हीरकमहोत्सवी हजार पृष्ठांचा खंड (१९७८), महाभारताची चिकित्सक पाठावृत्ती (१९ खंड, २२ पुस्तके), हरिवंश (२ खंड), महाभारत-श्लोकचरणसूची (६ खंड) आणि इतर प्रकाशनांत म. म. डॉ. काणे यांचा हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र (५ खंड), सर्वदर्शनसंग्रह, न्यायकोश, जिनरत्नकोश, पालीग्रंथ, बौद्ध ग्रंथांवरील चिनी टीका असे ग्रंथ आहेत.

संस्थेच्या सभासदांमधून त्रैवार्षिक निवडणुकीने ३९ सदस्यांचे नियामक मंडळ आणि ७ सदस्यांचे कार्यकारी मंडळ निवडून येते. संस्थेचा कारभार मानद सचिव कार्यकारी मंडळाच्या मदतीने पाहतात. संस्थेचे बहुतांश काम देणग्यांवर चालते.

# News Paper Clippings During April 2020

## Section : Research

# संशोधकांनी शोधली ग्रीन पीट

### सालझर असे या नवीन प्रजातीचे नाव

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

### 'अशा प्रकारच्या संशोधनाला चालना मिळेल'

'निसर्गाचा वरदहस्त असलेल्या या प्रदेशामध्ये आणखीही दडलेली काही गुपिते समोर येतील. जिथे माणूस अजूनही पोहोचलेला नाही, तेथील प्रजातींबद्दल माहिती समोर येईल. या संशोधनामुळे अशाच प्रकारच्या सापाच्या प्रजाती इतर ठिकाणी आहे का या संशोधनालाही चालना मिळेल. या तरुणांशी शोधलेला हा साप सध्या तरी अरुणाचलमध्येच आढळल्याचे समोर आले आहे,' असे आशा भोसले यांनी व्यक्त केली.



अरुणाचल प्रदेशातील सालझर या नव्या ग्रीन पीट वायपरबद्दलचा प्रबंध (चापडा) दोन दिवसांपूर्वी झुसिस्टिमॅटिक्स अँड इव्होल्यूशन या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे. या आधी नोव्हेंबर २०१९मध्ये अरुणाचलमधील आणखी एका सापाच्या प्रजातीबद्दल प्रबंध प्रकाशित झाला होता. अरुणाचल प्रदेशासाठी ही आशादायी बाब आहे. आत्तापर्यंत ईशान्य भारत आणि अरुणाचल प्रदेशमधील जैववैविध्यावर फारसे काम झालेले नाही. त्यामुळे या निसर्गसंपन्न प्रदेशातील अनेक प्रजाती, जैवविविधता जगासमोर आलेली नाही. सध्या अरुणाचलमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे प्रस्तावित असताना ही जैवविविधता समोर आल्याने कोणत्या भागामध्ये निसर्गाचा संहार टाळता येईल, कोणत्या भागात अधिक काळजी घेता येईल याची उत्तरे मिळतील, अशी आशा निर्माण झाली आहे.

हर्षल भोसले, पुष्कर फणसाळकर, मंदार सावंत, गौरांग गोवंडे, हर्षित पटेल आणि झीशान मिर्झा या पर्यावरणप्रेमींनी अरुणाचलमधील सरीसृपांवर एक प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाअंतर्गत गेल्या वर्षी जून ते ऑगस्ट या काळामध्ये त्यांनी अरुणाचलमधील राष्ट्रीय उद्याने, व्याघ्रप्रकल्प, अभयारण्ये येथे जाऊन सखोल अभ्यास केला. या अभ्यासादरम्यान पाके व्याघ्रप्रकल्पामध्ये एका सखल ठिकाणी या चापड्याची प्रजाती त्यांना आढळली. हा चापडा त्याच्या शरीरावरील आणि डोक्यावरील तांबट केशरी आडव्या पट्ट्यांमुळे मूळ प्रजातीपेक्षा वेगळा असल्याचे त्यांना आढळून आले. डीएनएची रचना, कवटीचा आकृतीबंध यामुळे हा फरक अधिक अधोरेखित झाला. या संशोधकांना 'हॅरी पॉटर' विशेष आवडत असल्याने सालझर स्लिदरिन या पात्रावरून या सापाचे नामकरण करण्यात आले आहे.

या संशोधकांच्या टीममधील भोसले आणि सावंत हे मुंबईच्या बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीशी संलग्न आहेत, गोवंडे हे पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाशी संलग्न आहेत, फणसाळकर हे डेहराडूनच्या वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाशी संलग्न आहेत तर मिर्झा हे बंगळुरूच्या नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेसशी संलग्न आहेत. अरुणाचलमधील जैवविविधतेचा शोध घेण्याचे काम पुढील तीन वर्षे सुरू राहणार आहे. यामध्ये आणखी अनेक प्रजातींची माहिती जगासमोर येईल. सध्या आणखी चार प्रजातींचा शोध सुरू असून त्यावर अधिक संशोधन सुरू असल्याचे भोसले यांनी स्पष्ट केले. या चापड्याच्या प्रकल्पासाठी त्यांना बृहद् भारतीय समाज आणि सिंगिनावा कॉन्झर्वेशन फाउंडेशनचे श्रीपाद हळबे यांनी मदत केली.

Maharashtra Times: 18.4.2020

# News Paper Clippings During April 2020

## Section : Work of Appreciation

नवभारत

## लॉकडाउन के कारण नहीं जा पाए घर

# नगरसेविका बनी अभिभावक



पुणे, सं. कोरोना वायरस के चलते लॉकडाउन किया गया है. इससे कई लोगों का जीवन प्रभावित हो चुका है. खास तौर से अपने गांव ना जा पाए छात्रों को काफी परेशानी का सामना करना पड़ रहा हैं. ऐसे ही शहर में प्रतियोगिता परीक्षाओं का अभ्यास करने आई तीन छात्राओं को दिक्कतों का सामना करना पड़ रहा था. इस वजह से राज्य सरकार द्वारा नगरसेविका ज्योत्सना एकबोटे को दरखास्त की गई थी इन छात्राओं का ख्याल रखें. इसके अनुसार एकबोटे ने तत्काल इन छात्राओं को जीवनावश्यक सामग्री भेज दी. साथ ही उन्हें एक अभिभावक के नाते भरोसा भी दिलाया.

इस बारे में नगरसेविका ज्योत्सना एकबोटे ने कहा कि शहर में प्रतियोगिता परीक्षाओं का अभ्यास करनेवाली तीन छात्राए सदाशिव पेठ इलाके में रहती है. लेकिन लॉकडाउन की वजह से उन्हें परेशानी आ रही है. इस वजह से इन छात्राओं को जीवनावश्यक सामग्री देने के बारे में राज्य सरकार के स्वास्थ्य शिक्षा विभाग द्वारा मुझे फ़ोन आया था. मैंने तत्काल उन्हें 1 माह पर्याप्त होगी, उतनी जीवनाबश्यक सामग्री उपलब्ध कराई. साथ ही उन्हें भरोसा दिलाया कि आप की मैं अभिभावक हूं, इस वजह से घबराने की जरुरत नहीं है. ये छात्राए पंढरपुर, गोंदिया इलाके की है. एकबोटे ने आगे कहा कि प्रतियोगिता परीक्षा का अच्छी तरीके से सराव कर काबिल अधिकारी बनके दिखाओ, ऐसी अपेक्षा भी इन छात्राओं से मैंने की.

Navabharat Pune Edition
14 Apr, 2020 Page No. 3




*Other than the College Photos, Event Photos, newspaper clipping images, all other mages in this Bulletin Issue are downloaded from Google Images.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.*